म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ऋतु-प्रकाश
सं. क्र. ९५३
REFBK 0024333
REFBK-0024333

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २७३३३
(स्थळ प्रत)

# काळ्यापाण्याची निळाई

(अंदमानचे
प्रवासवर्णन)

REFBK-0024333

लेखिका
वासंती घैसास

निरंजन प्रकाशन, पुणे.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | प्रयत्ने वाळूचे | १ |
| २. | इच्छापूर्ती | ६ |
| ३. | स्वप्निल बेट : नील आयलंड | ११ |
| ४. | पोर्ट ब्लेअर : एक खडतर कारावास | २१ |
| ५. | निसर्गाच्या सानिध्यात : 'चिडीया टापू' 'कार्बिन्स कोव्ह' | ३३ |
| ६. | 'रॉस' 'वायपर' : घोस्टी आयलंडस् | ३६ |
| ७. | जारवांच्या शोधात : जिरका टांग | ४२ |
| ८. | परतीच्या वाटेवर | ५० |
| ९. | जाता-येता : 'मद्रास' 'कलकत्ता' | ५३ |
| १०. | 'अंदमान-निकोबार' विषयी थोडे काही | ६९ |

क्र. क्र. २४३३३
ता. २४।१।७
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

# प्रयत्ने वाळूचे

नेहमी नाविन्याचे शोधात फिरण्याचे हौसेपायी जन्म झाला तो अंदमान निकोबारचे ट्रीपचा. मायबाप सरकारने देऊ केलेले एल्. टी. सी. (लीव्ह ट्रॅव्हल कन्सेशन) घेऊन भूनंदनवन काश्मीरसारख्या रम्य साचीव ठिकाणा-ऐवजी खुषीने काळ्या पाण्यावर निघालेल्या आम्हाला पाहून—तेही पोराबाळांना घेऊन—अनेकांना काळेबेरे टोमणे मारून घेण्याची संधी दवडावीशी वाटली नाही.

डॉ. बाळ आगाशे कुटुंबियांची उत्साही कंपनी मिळाली. जायचे तर पटकन ठरवून टाकले, पण रहायचे कुठे ? अंदमान गव्हर्नमेंटशी सरकारी गेस्ट हाऊसमध्ये रुम्स राखून ठेवण्यासाठी मोठ्या आशेने पत्ररुपाने संपर्क साधला. एका स्नेह्यांच्या सांगण्यावरून पोर्ट ब्लेअर येथील महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री गोविंदराव हर्षे यांनाही अंदमानातील वास्तव्यासाठीचे रिझर्वेशनसाठी उत्तराची अपेक्षा न ठेवता पत्र टाकले. ओळख-पाळख नसलेला इतक्या दूरच्या मुलखातील माणूस – तोही मराठी आपल्या पत्राची साधी पोचही देणार नाही वाटत असतानाच एक दिवस पोस्टमन श्री. हर्षेकडून संदेश घेऊन आला आणि त्यात त्यांचे " दुहेरी काष्ट्याचे धोतर, कुडता, ऊंची ५ फूट ९ इंच, टक्कल या ओळखीच्या खूणा असलेला ' मी ' एअर पोर्टवर न्यायला येतोय " असे आश्वासन वाचताच सरकारी उत्तराची वाटही न पाहता सामानाच्या जुळवाजुळवीस सुरुवात केली.

८२ चे दिवाळीत – नोव्हेंबरमधे – जायचे होते तरी ऑगस्ट मधेच पुणे–कलकत्ता रेल्वे रिझर्वेशन्स करून ठेवली. कलकत्त्यात राहण्याची व्यवस्था, परतीची रिझर्वेशन्स, इत्यादी जबाबदारी डोळे मिटून डोळ्यांवरच (व्यवस्थापक, महाराष्ट्र निवास, कलकत्ता) सुपुर्त केली. आता फक्त कलकत्ता – पोर्ट ब्लेअर – कलकत्ता येवढी विमानाची तिकीटे तेवढी बाकी होती. आमच्या ट्रॅव्हल एजंटला यासंबंधी फोन करून विचारले असता " पंधरा दिवस आधी बुकींग केले तरी पुरे " असे उत्तर मिळाले. तरी उगाच आयत्या वेळी घोटाळा नको म्हणून चांगले दीड महिना आधी विमानाचेही बुकींग करून टाकले.

मोठ्या जोमाने प्रवासाची तयारी सुरू झाली. अंदमान-निकोबार बेटां-संबंधीच्या माहितीचा ओघ चारी दिशांनी वहात येत होता. काही माहिती आम्ही

मुद्दाम आपणहून गोळा करत होतो. सर्व मित्राप्तेष्टांच्या तोंडी आमच्या या अनोख्या ट्रीप विषयीचे चर्विचर्वण चालू होते. मनाने आम्ही केव्हाच अंदमानात पोहोचलो होतो. आता उडायचे तेवढे बाकी होते.

प्रवासाला केवळ तीन आठवडे राहिले असताना आमच्या ट्रॅव्हल कंपनीत बोलावले असल्याचा फोन आला. मोठ्या उत्साहात पैसे घेऊन विमानाची तिकिटे आणायला गेलो आणि कलकत्ता–पोर्ट ब्लेअर विमानाची रिझर्वेशन्स जानेवारीपर्यंत बुक झाल्याची वार्ता सांगून त्यांनी आमचे पंख झेपावण्यापूर्वीच छाटून टाकले. एकीकडे स्वप्नांचे इमले धडाधड कोसळत असल्याचे पहात असतानाच दुसरीकडून कोठून ही रिझर्वेशन्स मिळतात का बघण्यासाठी जीवाचे रान केले; पण सगळीकडून नकार घंटाच ऐकू येऊ लागल्या.

आम्हाला हा सिझन वाया घालवायचा नव्हता पुणे-कलकत्ता रेल्वे रिझर्वेशन्स जवळ होती. आंतरराष्ट्रीय विमान प्रवासाची तिकीटे आयत्यावेळी रद्द केली तरी कॅन्सलेशन चार्जेस् पडत नाहीत म्हणून शेवटपर्यंत पोर्ट ब्लेअरसाठी खटपट चालू असतानाही कलकत्त्याहून दक्षिणायना ऐवजी नेपाळचे दिशेने उत्तरायण करायचे ठरवून टाकले. अखेरपर्यंत पोर्ट ब्लेअरसाठी आटापिटा करूनही कोठेच डाळ शिजेना तेव्हा काळ्या पाण्याचे शोधात समुद्राचे सफरीवर निघालेले आम्ही शुभ्र-धवल गोठलेल्या पाण्याच्या – सागरमाथ्याच्या – कुशीत गडप झालो.

अंदमानची गलबतं नजरेसमोरून पूर्णपणे नाहीशी झालीच नाहीत. नवे साल सुरू होताच त्यांची शिडं परत खुणावू लागली. गेल्या वर्षीचा खेळ परत व्हायला नको म्हणून विमान आणि रेल्वे दोन्हीचीही कन्फर्मड्-रिझर्वेशन्स हातात आल्या-वरच श्री. गोविंदराव हर्पेना पत्र टाकले. सफरीचा पट तोच राहिला तरी साथी-दारांची प्यादी बदलली. डॉ. आगाशेंऐवजी श्री. व सौ. कवठेकर आणि डॉ. प्रदीप पटवर्धन सहाध्यायी झाले. दरम्यान इंडियन एअरलाइन्सने कलकत्त्याशिवाय मद्रासहूनही दर रविवारी पोर्ट ब्लेअरकडे विमानसेवा सुरू केली. मद्रास पुण्याहून जवळ व सोईस्कर म्हणून कलकत्त्या ऐवजी पसंत केले.

दोन महिने झाले तरी श्री. हर्पेकडून काहीच खबरबात नव्हती. "गेल्या वर्षी त्यांना हकनाक तसदी पडली म्हणून रागवले तर नसतील ना? कां आपलं पत्रच त्याना पोहोचले नसेल?" काहीच कळायला मार्ग नव्हता. यावेळीही ही ट्रीप हातो-हात निसटतेय की काय वाटू लागले. या बेचैनीतून पुण्यातील एका ट्रॅव्हल एजंटला पोर्ट ब्लेअरमधील हॉटेलचे रिझर्वेशन करण्यासाठी पैसे देऊन टाकले. काहीही करून यावर्षी अंदमान चुकवायचे नव्हते. सरकारी पातळीवर तर आनंदी आनंदच होता. मागिल आणि या दोन्हीही वर्षी दोन-दोन पत्रे पाठवूनही साधी नकारात्मक पोचही आली नव्हती. त्यामुळे हा खासगी ट्रॅव्हल एजंट टुरिस्ट होमचे बुकींग करू शकेल की नाही याबद्दल जरा शंकाच होती.

नैराश्याचे काळे कुळकुळीत ढग परत चोहो बाजूनी गोळा होऊ लागले. काय करावे काही सुचेना. आता मात्र आपण काहीतरी गंभीर गुन्हाच केला पाहिजे त्याशिवाय काही आपल्याला काळ्या पाण्यावर जाता यायचे नाही असे वाटत असतानाच एक दिवस श्री. हर्षेचे आत्मियतेने भरलेले पत्र आले आणि त्याने आम्हाला ही स्वखुषीची जन्मठेप सुकर घडवून आणण्याचे जणू वचनच दिले.

पुन्हा उत्साह ओसंडून वाहू लागला. धुमधडाक्यात परत तयारी सुरू झाली. अधूनमधून सगळ्यांच्या घरच्या लोकांच्या आजारपणाचे गालबोट लागतच होते. त्यांची आजारपण कशीबशी निस्तरतोय तोपर्यंत चार वर्षांचा निरंजन (बबडी) नेमका जायच्या आदल्या आठवड्यात तापाने फणफणला. पोरगं आजारी असताना 'जावे की नाही' च्या विचाराने झोप उडविली. आमचं अंदमान ट्रीपच गलबत परत हेलकावे खाऊ लागलं.

अंदमान विषयीच्या जबरदस्त इच्छाशक्तिने मात्र आम्हाला पैलतीरांला नेऊन आणायचे ठरवून टाकल्याचे दिसत होते. चार दिवस बेचैनीत घालविल्यावर बबडीचा ताप उतरला आणि शेवटचे दोन दिवस आवराआवरीची जीवघेणी धावपळ करून संध्याकाळी ५ वाजता पुणे स्टेशनवर पोहोचलो. आमचे सहप्रवासी कवठेकर पती-पत्नी व डॉ. पटवर्धन हेही तेवढ्यात आलेच. आम्ही काळ्या पाण्यावरील निळ्या तरंगाची स्वप्ने बघतच २८ ऑक्टोबर १९८३ रोजी दादर-मद्रास एक्स्प्रेसमध्ये चढलो.

दुसरे दिवशी संध्याकाळी मद्रासला पोहोचेपर्यंत अंधारू लागले होते. सामान आवरून खाली उतरण्याची वाट बघत असतानाच एकदम जोरदार धक्का बसला. त्याने बबडीचे कानाला थोडा मार लागला. गाडी पुढच्या बंपर्सवर आदळली होती. आमचा डबा मागे होता म्हणून किरकोळ दुखापतीवर सुटका झाली. बाहेर थोडा पाऊसही पडायला लागला होता. एकूण मद्रासने आमचे काही तितकेसे चांगले स्वागत केले नाही.

सकाळी ६ ची फ्लाईट होती; म्हणजे ५ ला तरी रिपोर्टींग करावे लागणार. मद्रास रेल्वे स्टेशनपासून मीनामबक्कम एअरपोर्ट २० कि. मी. दूर म्हणजे कमीत कमी ३॥ वाजता तरी निघायला हवे. इतक्या पहाटेचे अवेळी टॅक्सी मिळाली नाही तर... बारीक सारीक चान्सही घ्यायची आमची तयारी नव्हती. इतके हातातोंडाशी आलेले अंदमान कोणत्याही कारणासाठी निसटू द्यायचे नव्हते म्हणून रात्री हॉटेलवर मुक्काम न करता एकदम एअर पोर्टवरच जायचे ठरवून टाकले.

हमालाला सामान वेटींग रूमकडे घ्यायला सांगितले. वेटींग रुम माणसांच्या गर्दीनं ओसंडून गेली होती. एका कोपऱ्यात कसंबसं सामान टाकलं. श्री. कवठेकरांना आम्हा बायका मुलांच्या सोबतीला बसवून विजय, प्रदीप स्टेशनच्या आसपासची

हॉटेल्स धुंडाळायला गेले. पुढच्या रविवारी अंदमानहून परत आल्यावर मद्रासला दोन दिवस मुक्काम करायचा होता; त्यामुळे बुड टेकविण्यासाठी जागा शोधून ठेवणे फार महत्त्वाचे होते. मद्रास सेंट्रलचे आसपास बरीच हॉटेल्स असली तरी आगाऊ पैसे घेऊन रुम्स कोणीच राखून ठेवायला तयार नव्हते. त्यातल्या त्यात ब्ल्यू स्टार इंटरनॅशनल हे बरेच मोठे हॉटेल असल्याने की काय पण त्यांनी विनधास्त येऊन धडकायला सांगितले. त्यांच्या स्वतःच्या साईट सिईंग टूरसुद्धा होत्या.

जागेची सोय झाली म्हणताच आम्ही जेवायला पळालो रेल्वे कॅन्टीनमधे. उदरभरण झाले तरी रात्रीचे फक्त आठच वाजलेले. आता उरलेला वेळ काढायचा कसा ? अवजड सामान बरोबर असल्याने शहरात एखादी चक्कर मारुन येणेही अवघड होते. वेटींग रुममधील आवक वाढतच होती. तेथिल गुदमरायला लावणाऱ्या गर्दीत कंटाळवाणा वेळ काढण्यापेक्षा विमानतळावरील मोकळ्या वातावरणात तरी जाऊन बसावे म्हणून टॅक्सी पकडली. पुण्या-मुंबई शिवाय अन्य ठिकाणी क्वचितच मिटरप्रमाणे पैसे घेतले जातात. टॅक्सीने वाजवून ६० रु. घेतले. अर्थात मावतील तेवढी लोकं नेण्याचा बोनसही मिळतो म्हणा.

नऊ वाजताच आमच्या स्वाऱ्या मीनाम्बक्कमवर पधारल्या. सकाळपर्यंतचा वेळ कसा ढकलायचा याचे प्रश्नचिन्ह परत पिंगा घालू लागले. रेल्वे स्थानका-सारख्या झोपायला वेटींग रूम्स येथे थोड्याच असणार! मुंबईच्या विमानतळा-सारखी उतारुंची आवक-जावकही नव्हती. तुरळक लोक वगळता विमानतळावरचे राष्ट्रीय दालन रिकामेच होते. नाही म्हणायला एक कॉफी शॉप तेवढे चालू होते. तेथे सुंदर कडक, फिल्टरड् मद्रासी कॉफी मिळाली. बसायचे दालन वातानुकुलीत असल्याने थंडी वाजू लागली. फिक्सड् केलेल्या प्लास्टीकच्या खुर्च्याच सर्वत्र बसायला असल्याने रात्रभर पाठ टेकायला मिळायची आशा नव्हती. घड्याळाचा काटा कसातरी अकरा पर्यंत सरकताच पोरांना झोपायला चक्क होल्डॉल पसरून दिला आणि आमचे खुर्चीवर बसून अंदमानसाठीचे ध्यान सुरु झाले.

३० नोव्हेंबर सुरु झाला. मोठ्या काट्याला अजून सहा प्रदक्षिणा घालायच्या होत्या. कालचक्र कसं उलट फिरत होतं बघा. काळ्यापाण्याच्या शिक्षेतून सुटका मिळावी म्हणून अनेकांनी झगडा दिला आणि आम्ही ही जन्मठेप मिळावी म्हणून तपश्चर्या करत होतो. पुरुषांनी थोड्याच वेळात निद्रादेवी पुढे नमत घेऊन कोणी शालीवर तर कोणी मच्छरदाणीवर अंग टाकले. आम्ही दोघी महिषासुरमर्दिनी मात्र सामानाची राखण करत रात्र जागवत बसून राहिलो. अंदमानला जाण्यासाठी एअरपोर्टचा आगिनगाडीचा फलाट करणारी आमच्यासारखीच पुण्याची आणखी एक कंपनी होती. त्यांचेबरोबर तर ५-६ लहान मुलं होती.

कठोर तपस्या फळाला आली. ठरल्यावेळी सकाळी ६ वाजता आमच्या विमानाने आकाशात झेप घेतली. बाहेर पाऊस कोसळत होता. "बरं झालं रात्रीच

येथे मुक्कामाला आलो. पावसा–पाण्याची पहाटे टॅक्सी मिळाली नसती तर" म्हणत पट्टे आवळले. खाली अथांग बंगालचा उपसागर पसरला होता. उप असला तरी शेवटी सागरच तो. दोन तास आता जमिनीचा ठिपकाही दिसणार नव्हता. "हे चिमुरडं विमान त्याच्या पोटात पाण्याच्या एका थेंबाप्रमाणे कुठेही पटकन जाऊन बसू शकेल. काही बरं-वाईट झालं तर?" मन चिंती ते वैरीही न चिंती म्हणतात ना. या सगळ्या वुऱ्या विचारांना सुट्टी दिली गेली ते समोरचे ताजे वर्तमानपत्र पाहून. सुनील गावसकरने मोडलेल्या विक्रमांची नाण्टयाच्या साथीने पुन्हा एकदा उजळणी झाली. अजूनही खाली निळेशार पाणी त्यावर विखुरलेले ढगांचे पांढरे पुंजके यांचीच सोबत चालू होती.

एवढ्यात उजवीकडील खिडकीतून एका मोठ्या काळ्या पॅचने लक्ष वेधून घेतले. इथलं पाणी खरच काळ दिसतंय म्हणत असतानाच डावीकडेही अनेक काळे ठिपके दिसू लागले. म्हणजे हे पाणी काळ नाही तर हीच ती गर्द झाडीने भरलेली अंदमानची बेट असावीत याची जाणीव झाली तेव्हा कोलंबसला अमेरिका गवसल्याच्या आनंदाचा प्रत्यानंद मिळाला. गर्द निळ्या पाण्यावरील बेटांच्या काळ्या रांगोळीकडे भान हरपून पहात असताना विमानाची उंची कमी होऊ लागली आणि हा हा म्हणता काळ्या रंगावलीचे रुपांतर हिरव्यागार गालीच्यात झाले.

महत्प्रयासाने आलेले पाहुणे म्हणून की काय पण वरुणाला न पाठवता रविराजांची स्वारी ग्रीन कार्पेट पसरून आमच्या स्वागताला जातीने हजर होती. नाहीतर पुण्याहून निघण्याआधी रोज रेडिओ-टीव्हीवर हवामानाच्या अंदाजात "अंदमान निकोबारमे भारी वर्षा होगी" हे ऐकून आम्ही हवालदील होत होतो येवढे पैसे खर्च करून फक्त धोधो पावसात भिजून यावे लागेल की काय या भीतीने. आपल्या हवामान खात्यात बरेच योगी भरलेत की काय नकळे. हे अंदाज वर्तवणारे शीर्षासन करून हे भविष्य वर्तवत असावेत अशी मला कायमची शंका आहे. त्याचमुळे हवामानखात्याचे हे अंदाज बहुदा उलटेच निघतात.

● ●

# इच्छापूर्ती

डोंगरांच्या कुशीत लपलेल्या पोर्ट ब्लेअरच्या त्या छोटेखानी अेअरपोर्टवर सकाळी ठीक ८ वा. आमचे विमान उतरले. विमानातून बाहेर पडताच रविराजांनी ३०° सें. च्या चटक्यांनी औक्षण केले. या तापदायक उन्हात बसची वाट बघण्यापेक्षा तडक चालतच बाहेरचा दरवाजा गाठला. न्यायला आलेल्यांची गर्दी उडाली होती. त्यांत धोतरवाले हर्षेही आम्हाला चटकन दिसलेच.

सामान येईपर्यंत थांबणे भाग होते. येथे फक्त एक टपरीवजा शेड होती. बसायलाही जागा नाही. सामानाची सुरक्षितता कशी रहात असेल कोण जाणे. कोणाचे सामान कोणीही उचलून घेऊन जाऊ शकेल असे सगळे उघड्यावर होते. विमानतळ ऑफीसर श्री. व्होरा हेही मराठी भाषिकच. सामान ताब्यात मिळेपर्यंत या दोघांशी गप्पा मारण्यात रंगून गेलो. आमच्यासाठी टुरिस्ट होममधे श्री. पंडीत म्हणून कोणाचे तरी नावावर तीन रुम रिझर्व करून ठेवल्या होत्या. डिपार्टमेंट ऑफ टुरिझमची मिनी बसही आम्हाला न्यायला हजर होती. पोर्ट ब्लेअरकरांच्या या स्वागताने भारावून जाऊन हर्षे–व्होरांशी किती बोलावे, काय काय विचारावे असे होऊन गेले होते. सामान येईपर्यंत थोडा उशीर लागला. त्याबरोबर बसचा ड्रायव्हर गुरगुरला "जल्दी चलो। हमे खाली इतनाही काम नही है। और भी है" प्रेमळ गप्पांना तोडून लाल फीत आमच्या भोवती गुंडाळली जात होती.

टुरिस्ट होमकडे जाताना होणारे पोर्ट ब्लेअरचे प्राथमिक दर्शन डोळ्यांत साठवून घेत असताना मनाचा मागोवा चालला होता स्वातंत्र्यवीर सावरकरांनी वास्तव्याने पावन केलेली सेल्यूलर जेल कुठे दिसते का ते बघायला. पण निराशा झाली. पंधरा वीस मिनिटांत एका छोट्या टेकडीवर असलेल्या टुरिस्ट होममधे आमची बस येऊन थांबली. ड्रायव्हरने लगेच १८ रु. मागितले. त्याचे तिकीट, पावती काही नाही.

अमेरिकन मोटेल्सना लाजवेल असे हे टुरिस्ट होम प्रथमदर्शनीच वाटले. वीस वर्षांपूर्वी बांधलेले असूनही जुनाटपणा जाणवला नाही. निसर्गाचा वरदहस्त असल्यामुळे सगळीकडे ताजेपणा भरून राहिला होता. पादत्राणे भिरकावून द्यावी वाटणारी हिरवळ, दारातच माशांचे छोटे तळे, पक्षांचा गोड चिवचिवाट, पाठीमागे

अथांग गर्द नीळा समुद्र, शांततेला बाधा न आणता चाललेली लहान – मोठ्या जहाजांची ये – जा. खोल्या ताब्यांत घेऊन त्यांत सामान भिरकावले आणि तोंडही न धुता टुरिस्ट होमभोवती चक्कर मारून अंदमानचे हे अवर्णनीय निसर्ग-सौंदर्य पिऊन घेतले.

एवढ्यात तेथील व्यवस्थापक डॉ. पटवर्धनांच्या मागे लागले " तुम्ही एकटेच आहात तर डबल बेड रुम तुम्हाला कशी काय द्यायची. ? " त्यांना खूप समजाऊन पाहिले " त्यांची पत्नी आयत्या वेळी आजारी पडली म्हणून येऊ शकली नाही. आम्ही डबल बेडचा चार्ज द्यायला तयार आहोत. " पण त्यांना काही पटेना. त्यांचे आपले पालुपद सुरूच. " तुम अकेले डबल रुममे कैसे रहेंगे । ये नही चलता । ऑडीट ऑब्जेक्शन आता है । " शेवटी डॉक्टर पटवर्धन म्हणाले " मी डबलरुममध्ये एकटा रहाणार म्हणून तुम्हाला इतक वाईट वाटत असेल तर मी आणि डॉक्टर घैसास एका रुममध्ये रहातो. मिसेस घैसास व मुले दुसऱ्या खोलीत रहातील. " आणि त्यांनी तसे पटकन मस्टरवर लिहून दिले. त्यांना तेही पटेना. ते लगेच खवळून म्हणाले " वो अपने बिबी बच्चेंको छोडके आपके रुममें कैसे सोयेंगे ? ऐसा कभी होता है क्या ? " यावर आम्हाला हसावं कां रडावं ते कळेना. लग्नाची एक बेडी पायात असताना या हौसेच्या जन्मठेपेपायी दुसरी अडकवून घ्यायची वेळ आली. बरोबर सुपारीही नव्हती नाहीतर डॉ. पटवर्धनांना लगेच कनवटीला खोचायला देता आली असती. त्यांचेही काही नियम असतील; त्याची बांधिलकी त्यांना करायलाच हवी. या टुरिस्ट होममध्ये एकही जनता हॉल अथवा सिंगल रुम नाही. मग एकट्या माणसाने रहायचे कुठे? बऱ्याच रुम्स रिकाम्याही दिसत होत्या. हा चक्रव्युह भेदण्यासाठी मागच्या व यावर्षीच्या त्यांचेकडून पत्रोत्तर न येण्याच्या स्वानुभवावरून मी दिली ठोकून " तुम्हाला यांच्या मिसेस येऊ शकणार नाहीत म्हणून आम्ही पत्र पाठविले होते, पण तुम्ही कधी उत्तरच देत नाही. कमीत कमी एकटे आलात तर रुम मिळणार नाही असे पत्र तरी पाठवायचेत. म्हणजे ते एक तर इतक्या दूर आले तरी नसते. किंवा बाईची काहीतरी सोय करून ठेवली असती. " यावर व्यवस्थापक ताडकन विजयी मुद्रेने म्हणाले " लेटर नही आया नं ? आयेगा कैसे ? हम तो किसीको जवाब भेजते ही नही. " माझी नजर आपली पत्र बघायला कचऱ्याची टोपली शोधू लागली. पण रुममध्ये कचऱ्याची टोपली ठेवण्याची पद्धतच दिसत नव्हती. आम्ही त्यांना दाद देत नाही पाहिल्यावर " अच्छा मैं पंडीत सावको पुछुँगा " म्हणत त्यांनी काढता पाय घेतला. आम्ही ' पंडीतांचे ' गेस्ट आहोत अशी सर्वांची कल्पना झाल्याने का होईना पण आम्हाला चांगली ट्रीटमेंट मिळत होती.

व्यवस्थापकांना वाटेला लावल्यावर आता रुमच्या आंतिल रुपाकडे लक्ष गेले. चांगली स्पेशस होती. दोन बेडस्, स्पंजच्या गाद्या, मच्छरदाण्या,

ड्रेसिंग टेबल, कपाटे, पंखे, अटॅचड् बाथ; त्यात शॉवर, पुढे-पाठीमागे व्हरांडा. एवढ्या रुमला भाडे किती तर रोजी फक्त २० रु. (प्रत्येक बेडला १० रु.) यामुळेच येथे जागा मिळणे मुष्कील होत असावे. यापेक्षा थोड्या वरच्या दर्जाच्या खोल्या – मेगॅपोड नेस्ट. त्यांचा दर बेडला ४० रु. एअरकंडीशनिंग हवे असेल तर ५५ रु. सर्वात महाग म्हणजे निकोबारी कॉटेजेस्. निकोबारी आदिवासी ज्या प्रकारच्या गवताच्या झोपड्यांत रहातात तशा बाहेरुन दिसणाऱ्या वातानुकुलीत हटस्. या डोंगर उतारावर समुद्राकाठी बांधलेल्या आहेत. त्यासाठी रोजी १६० रु. मोजावे लागतात.

गरमागरम कॉफी घेऊन आंघोळी उरकल्या. आजची साईट सिंअिंग टूर तर गेलीच होती. टुरिस्ट होममध्ये असलेले अंदमान शासनाचे टुरिस्ट इन्फमेशन सेंटर रविवार असल्याने बंद होते. त्यामुळे उद्या काय, कसे पहाता येईल याची चौकशी करायला विजय ताबडतोब बाहेर पडले. वेळ थोडा सोंग फार करायची होती ना आम्हाला.

"काहीही करुन नील आयलंडला जाच." पोर्ट ब्लेअरला बरेच वर्षे राहिलेल्या पुण्याच्या मिसेस पेंढारकरांनी आवर्जून सांगितले होते. तेथे जाण्यासाठी सोमवार, बुधवार, शुक्रवार या दिवशी बोटी असून सोमवारची बोट दुसरे दिवशी परत येते तर शुक्रवारची त्याच दिवशी परतते असे कळले. या बोटींचे सेलींग प्रोग्रॅम्स निश्चित नसतात. ते लहरी हवामानानुसार अनेकदा बदलावे लागतात. समुद्र फारच खवळलेला असेल तर कधी कधी बोट मध्यातूनही परत आणली जाते. या सर्वांमुळे नील आयलंडसारख्या थोड्या दूरच्या बेटावर जाण्यासाठी पुढील दिवसांचा चान्स घेण्यापेक्षा सोमवारीच जायचे पक्के ठरवून टाकले.

ग्रेट निकोबार या अंदमान – निकोबार ग्रुप समुहातील शेवटच्या बेटावर जाण्यासाठी पोर्ट ब्लेअरपासून बोटीने चार दिवस लागत असल्याने तेथे जायचा विचार मनातून केव्हाच काढून टाकला होता. निकोबारी बेटांची झलक कार निकोबारला तरी जाऊन बघता येईल असं वाटत होते पण तेही जमेलसे वाटेना. पोर्ट ब्लेअरहून बोटीने कार निकोबारला पोचायला एकच दिवस लागत असला तरी ती बोट वाटेत थांबत थांबत ३–४ दिवसांनी पोर्ट ब्लेअरला परतते. शिवाय ती नक्की कधी निघेल याचीही शाश्वती नसते. या सर्वांमुळे निकोबार बेटांचे नादी न लागता पोर्ट ब्लेअरच्या आसपासची अंदमानची बेटेच बघून घेण्याचे ठरवावे लागले. पोर्ट ब्लेअरचे पुढे 'बोट' हेच फक्त वहातुकीचे साधन बेटा – बेटांमध्ये असल्याने तुमचा प्रोग्रॅम सर्वस्वी बोटींवरच अवलंबून ठेवावा लागतो.

टुरिस्ट होमचे प्रशस्त सिटींग लाऊंज आकर्षक रितीने सजविले होते. गुबगुबीत आरामदायक सोफा, मऊ गालीचा, मोजकीच भित्त चित्रे, झुंबरे. त्याला लागून असलेला डायनिंग हॉलंही दोन मोठ्या स्वच्छ टेबलांनी व्यापलेला होता.

तसे बेचव असले तरी गरमागरम जेवण मिळाले. शिवाय वाढताना हात आखडता न घेता आग्रहाने वाढल्याने ते अन्नही रुचकर लागले. उकड्या तांदूळाचा भात, डाळ, दोन भाज्या, पोळी – भाकरीचा काहीतरी मिश्र प्रकार, स्वीट डिश म्हणून केळी. तूप, दही – ताक मात्र नव्हते. नॉन – व्हेज. हवे असल्यास लगेच तयार. एवढ्या प्रत्येक वेळच्या जेवणाला प्रत्येकी १० रु. घेतात. ब्रेकफास्ट घेतला तर ५ रु. ज्यात डबल ऑम्लेट, भरपूर अमूल बटर, जॅम समवेत पोटभर टोस्ट, केळी. चहा वा कॉफी प्रत्येकी १ रु. म्हणजे दोन वेळचे जेवण, नाष्टचासकट माणशी रोजचा दर पडतो ३५ रु. काहीच वाईट नाही.

जेवल्यावर थोडी डुलकी घेऊन लगेच पोर्ट ब्लेअरचा अॅबर्डीन बझार हा मार्केटींग एरिआ बघण्यासाठी बाहेर पडलो. मध्यंतरीच्या काळात पावसाने शिड-कावा करून घेतल्याचे दिसत होते. टुरिस्ट होम टेकडीवर एका बाजूला असल्याने खात्रीशीर वाहन मिळत नाही. कोणी टॅक्सी घेऊन आलेच तर मिळणार. सिटी बसेस असल्या तरी त्यांचे वेळापत्रक माहित नव्हते. तंगडतोड करतोय, करतोय. टेकडी उतरल्याबरोबर आहे वाटणारा हा बाजार यायला वळणावळणांचे रस्त्याने तासभर चालावे लागले. वाटेत ' देवी कॅफे ' हे दाक्षिणात्य पद्धतीचे रेस्टॉरंट लागले. इडली, वडा, डोसा इ. पदार्थ येथे चांगले मिळत होते. कॉफी घेऊन पुढे सटकलो.

भाजी मंडईत दलदल होती. अशा गलीच्छ ठिकाणीच विक्री चालली होती. सफरचंद, केळी खूप दिसत होती. बाजारात सगळ्या कॉंक्रीटच्या नवीन इमारती (नंतर चौकशी करता कळले की जुना लाकडी घरांचा बाजार १९७४ मधे लागलेल्या प्रचंड आगीत जळून भस्मसात झाला होता. खबरदारीचा उपाय म्हणून मुद्दाम हा नवीन बाजार पूर्ण कॉंक्रीटचे इमारतींचा बांधण्यात आलेला आहे); प्लास्टीकच्या वस्तूंनी भरलेली दुकाने; विमल टेक्सटाइल्स, बाटा, इ. नावाजलेल्या कंपन्यांच्या शोरूम्स; धान्याची, हार्डवेअर्सची, मोठमोठी शॉप्स; दिव्यांचा झगमगाट; टॅक्सींची सतत ये जा हे पाहून आपण अंदमानसारख्या दूरच्या बेटावर आहोत हे विसरायला होत होते. पोर्ट ब्लेअरने तशी आमची प्रथमदर्शनी निराशाच केली. येथे यायच्या आधी वाटलं होतं " अर्धनग्न अवस्थेत शंख-शिपल्यांच्या माळा घालून आदीवासी भटकत असतील, डांस दिवसाही हल्ला चढवतील, लोकसंगीत ऐकायला मिळेल. " पण येथे तर हिन्दी चित्रपट गीतांचा धुमधडाका लागला होता. सर्वांवर शहरी मुलामा चढला होता; ज्यापासून आम्ही दूर जायला बघत होतो. सकाळी टूरिस्ट होमच्या रूम्समधील पंखे, शॉवर, कमोड, एअरकंण्डीशनिंग पाहून डॉ. पटवर्धन तर फारच वैतागले. त्यांना काहीतरी थ्रिलींग घडायला पाहिजे होते.

या शहरी वातावरणातून बाहेर पडण्यासाठी उद्याचे उद्या नील आयलंडला जायचे बेतावर बाजारातच शिक्कामोर्तब करून टाकले. तसा श्री. व्होरांना आणि ले. शिंदेना फोन केला. दुकानदाराने फोनचे पैसे घेतले नाहीत. काय ही लोकं

टुरिस्टना मान देतात. 'प्रत्येक कॉलला १ रु. पडेल' असा फलकही कुठे दिसत नव्हता. ले. शिंदेना फोन लागला नाही म्हणून दुसऱ्या दुकानातून केला. तेथेही पैसे न घेण्याचा हाच मान परत मिळाला. आपण कोणी महत्त्वाचे पाहुणे असल्या-सारखी मान ताठ झाली.

हा हा म्हणता अंधार पडला. काळोखाच्या भीतीने टुरिस्ट होमवर परता-वेसे वाटू लागले. घड्याळात पाहिले तो फक्त ६ वाजलेले. "बापरे आता एवढा वेळ कसा काढायचा." एवढ्यात वाटेत शहाळी दिसताच त्यावर तुटून पडलो; किंमत न विचारताच. १॥ रु.ला एक म्हणजे मद्रास, कलकत्त्यासारखाच भाव होता. पोर्ट ब्लेअरला महागाई इतर शहरांसारखीच वाटली. फक्त विक्रीवर सेल्स टॅक्स नसल्याने पादत्राणे, पेट्रोल, इ. गोष्टी थोड्या स्वस्त मिळतात. बहुतेक सर्वच वस्तू मुख्य भूमीवरून येतात. अगदी बटाटा, कांदा देखील. त्यामुळे कधी कधी आठ-आठ दिवस कांद्याचे दर्शनही येथे दुर्लभ होते म्हणे. अंदमानात गाई-म्हशींचे दूध जवळजवळ नाहीच म्हटलं तरी चालेल. चहा-कॉफी सर्व पावडरचे दूधाचे. त्याचमुळे दही-तुपाचा अभाव. मंडईतही गाई दिसल्या नाहीत. रस्त्यात एखादी दिसली तरी फारच रोगट. अजून एकजण सबंध बाजारात भेटला नाही; आणि तो म्हणजे 'भिकारी.'

लेफ्टनंट शिंदे फोनवर भेटले नव्हते. रॉस आयलंडला जाण्यासाठी त्यांचे-कडून परवानगी आणायची होती म्हणून टॅक्सी करून त्यांचे घरी जाण्याचा निर्णय घेतला. टॅक्सीवाल्याला त्यांचे घरी १० मि. थांबून टुरिस्ट होमवर परत सोडण्या-साठी ठरविले. तसेच उद्या पहाटे नील आयलंडला जाण्यासाठी जेट्टीवर सोडायलाही तो कबूल झाला.

काळ्या कुट्ट अंधारातील किरर् शांततेत विमानतळासमोर असलेले शिंदेंचे घर कसेबसे सापडले. पोर्ट ब्लेअरला रात्री अपरात्री फिरण्यात तसा काहीच धोका नाही म्हणतात. स्त्रियाही बिनधास्त दागदागिने (सोन्याचे) घालून मिरवताना दिसत होत्या. शिंदे पती-पत्नी फारच आगत्याचे. पहिल्या ओळखीतच सौ. शिंदे जेवून जायचा आग्रह करू लागल्या. परत एकदा जेवायला यायचे आश्वासन दिल्यावरच सुटका झाली.

रुम उघडली तो खाण्याच्या पदार्थांच्या सर्व पिशव्या मुंग्यानी भरलेल्या. अंदमानमधे लाकूड मुबलक. त्यामुळे घरे लाकडाची. मुंग्याना कायमचा आसरा. काही पदार्थ टाकून दिले; तर काही खुर्ची खोलीचे मध्यभागी ठेऊन तीवर ठेवले. जेवून परत आलो तो परत त्या खुर्चीपर्यंत मुंग्यांनी रांग लावलेली. कॉटवर टांगून ठेवलेल्या खाद्य पदार्थांपर्यंतही त्यांनी मजल मारलेली. या मुंग्या आपल्याला रात्रीत गिळून तर टाकणार नाहीत ना अशी भीती वाटत असतानाच अंदमानमधल्या पहिल्या रात्री पाठ टेकली.

● ●

# स्वप्निल बेट
# नील आयलंड

पहाटे ५॥ लाच टॅक्सीवाला कबूल केल्याप्रमाणे हजर झाला. नील आयलंडच्या बोटीचे आगाऊ रिझर्वेशन होत नसल्याने जागा मिळेपर्यंत थांबायची त्याला बोली केली होती; नाहीतर त्याच टॅक्सीतून दुसरीकडे जायचे ठरविले होते. पोर्ट ब्लेअरला अनेक जेट्टी (बोटी सुटायचे धक्के) असून नील आयलंडला जाणाऱ्या बोटी फिशरी जेट्टीवरून सुटतात.

जेट्टीवर बायका, पोरं, सामान यांची झुंबड उडाली होती. बसायला बाकं होती, पण सर्व भरलेली. अनेकांनी पथाऱ्या पसरून जागा अडविलेली दिसत होती. 'जरा सरकून घ्या' प्रथम जरा अदबीने नंतर जोरदार आवाजात म्हटल्यावर जागा झाली. बुड टेकायला मिळाल्यावर चहाची आठवण झाली. सकाळी सहाची बोट असल्याने निघताना चहाही घेतला नव्हता म्हणण्यापेक्षा मिळाला नव्हता. जेट्टीवरील एका कळकट टपरीतील अमृततुल्य ढोसून तरतरी मिळविली. एक उग्र, कुबट वास बोटभर भरून राहिला होता त्यामुळे बरोबर आणलेले काही खावेसे वाटत नव्हते.

साडे सहा वाजता आमच्या 'गोमती' या डिझेल इंजिन बोटीने पोर्ट ब्लेअर सोडले. आजची बोट रंगत आयलंड पर्यंत जाणार होती. जाता जाता वाटेतील खूप बेटे बघायला मिळतील या कल्पनेने रंगत आयलंडची तिकीटे काढली. शिवाय नील आयलंडलाही ही बोट लागणारच होती. केवळ बोट हेच वाहतुकीचे जनता साधन असल्याने तिकिटाचा दर फारच वाजवी होता.

सूर्याजीरावांची आजही कृपादृष्टी होती. अंदमानचे ते गडद नीळे पाणी; त्यावरून फक् फक्, भक् भक् इंजिनाचा आवाज करत त्या शांत समुद्रात जाणारी आमची ती छोटी बोट. सतत असणारी कुठल्या ना कुठल्या बेटाची हिरवी साथ. कां कोण जाणे पण समुद्रप्रवासाची मला फार धास्ती वाटते. येथे जमिन कायम नजरेच्या टप्प्यात होती त्यामुळे काही बरं वाईट झालं तर एवढंही अंतर पार करून जाणे आपल्याला केवळ अशक्य आहे हे कळत असूनही नजरेसमोर दिसणारा जमिनीच्या तुकड्याचा हा दिलासा फारच आधारदायक वाटत होता.

इतक्यात निरंजन ओरडला, "आई चिमण्या बघ कशा समुद्रावरून उडत आहेत ते." मी चमकून बघितले. एवढ्या भर समुद्रात चिमण्या कुठून येणार? पोर्ट ब्लेअरलाही इतर अनेक रंगीबेरंगी चिमुकले पक्षी दिसले पण चिमण्या दिसल्या नव्हत्या. कावळा तर अजिबातच दृष्टोत्पत्तीस पडला नव्हता; आणि आत्ता या एकदम चिमण्या कुठून अवतीर्ण झाल्या म्हणत नीट बघितले तो ते होते 'फ्लाईंग फिश.' नीळे, छोटे पंख असलेले मासे बोटीच्या आवाजाने दचकून पाण्यावर उडी मारून हवेत भरारी घेत थोड्या अंतरावर परत पाण्यात लुप्त होत होते. एकदा लक्षात आल्यावर असे अनेक उडते मासे आम्हाला सारखे दिसू लागले.

रंगत आयलंडपर्यंतची तिकीटे काढली होती पण पुनर्विचार करता वाटलं की बोट तेथे दुपारी ३ वा. पोहोचणार. रात्री रहाण्यासाठी कुठेतरी आसरा शोधे-पर्यंत ५ वाजणार की अर्ध्यातासात अंधारच. नुसतेच भोज्याला शिवून आल्या-सारखे व्हायला नको. एका पूर्ण निसर्गाच्या कुशीत पहुडलेल्या बेटाची झलक आम्हाला तृप्ततेने चाखायची होती म्हणून रंगत पर्यंत न जाता नील आयलंडलाच उतरायचे ठरविले.

फ्लाईंग फिशेस्च्या चिमकुल्या भराऱ्या बघता बघता समोर दोन मोठी आयलंडस् दिसू लागली. "कोणते असेल नील आयलंड?" दोन्ही गर्द झाडीने भरलेली. "डावीकडे का उजवीकडे, कोणाला कौल लावावा?" बोट आपली नाका-समोर चाललेली. "कुठलेही असले तरी चालेल म्हणा." पण उजवीकडील बेटाचे किनाऱ्यावरील पाण्याच्या लांबून दिसणाऱ्या निळ्या रंगाच्या विविध छटा लोभावून टाकत होत्या. पांढऱ्या मुलायम वाळूवर लाटांचा नाजूक पदन्यास चालू होता. पाण्याचा रंगही गर्द निळ्याचा फिक्कट मोरपंखी-निळा होऊ लागला. नील आयलंडजवळ आल्याची खूणच होती ती. आता उजवीकडे जेट्टी दिसू लागली आणि बोटीने त्याच दिशेने टर्न मारला. बोट तशी अगदी हळू चालते. जेट्टी दिसल्या पासून तेथे पोचायला अर्धा तास लागला.

साडे-आठ वाजता आम्ही त्या नीलसागरतीरी उतरलो. पाण्याचा नीळा रंग कोणत्याही पंचतारांकीत हॉटेलमधील स्कायब्लू वॉटरला लाजविणारा होता. स्फटीकासारखे संथ पाणी; त्यात ओहोटी असल्याने आतले कोरल्सचे रॉकस् दिसत होते. जेट्टीच्या फळ्यांना काही ठिकाणी मोठ्या फटी होत्या. चुकून खाली जायच्या भीतीने जपून पावले टाकीत किनाऱ्यावर येऊन पोहोचलो आणि पुढे काय चे प्रश्नचिन्ह उभे राहिले.

समोर दिसलेल्या चहाच्या एका मातकट दुकानात "येथे रहायला रेस्ट हाऊस आहे कां?" विचारले आणि त्याची होकारार्थी मान हलताच त्याने दाख-विलेल्या दिशेने पळत सुटलो." तेथे जागा मिळाली नाही तर..." मुलायम नीळा

रंग परत गडद काळा दिसू लागला. वाटलं काही पाठीमागचा पुढचा विचार न करता आपण कसे काय आलो कोण जाणे ?

अंदमान पब्लीक वर्कसचे हिरव्या रंगात लपलेले लाकडाचे घरकुल पाहताच हायसं वाटलं. मोठ्या आशेने आत गेलो. पण तेथे असलेल्या दोन्ही डबलरुम्स भरलेल्या होत्या. आता या अनोळखी बेटावर पोराबाळांना घेऊन एक दिवस विशेषत: रात्र कशी काय काढायची ? क्षणभर काही सुचेना. इतक्यात तेथील जेवणाचे टेबलाने व्यापलेली डायनिंग रुम दिसली. खाली लाकडी जमिन आणि वर पंखा बघून आश्रय स्थान गवसल्यासारखे वाटले. रेस्ट हाऊसचा कुक कंधास्वामी जो तिथला मॅनेजरही असावा फारच चांगला माणूस. "कुठे नाही तर डायनिंगरुममधेच रात्री झोपू" म्हणताच क्षणार्धात तयार झाला. या खुषीखातर कंधास्वामीला चहा बनवायला सांगितला. त्यानेही लगेच स्वच्छ कपबशातून चहा पुढे केला. आम्हाला पाहिजे ते जेवण करुन घालायलाही त्याची कुरकुर न करता तयारी पाहून आपण नक्की सरकारी रेस्ट हाऊसमधेच आहोत का याचा संभ्रम पडला.

आम्ही लाख त्या १०'×१०' च्या खोलीत झोपू म्हणून फुशारकीने म्हटले खरे; पण पोराबाळांकडे बघून कंधास्वामीला काही ते पटले नसावे. एका रुममधे नुकत्याच आलेल्या एका ज्युनिअर इंजिनिअरला त्याने दुसऱ्या रुममध्ये सामावून घेण्याची विनंती आम्हाला न विचारता केली आणि तो भला इसम दुसऱ्या खोलीतील गर्दीत झोपायला तयारही झाला. त्याने आम्हाला ताबडतोब एक कॉट-मच्छरदाणी सकट आणि एक कपाट यांचा ताबा दिला. बबडीची तरी रात्रीची सोय झाली म्हणत सामान त्या रुममधे हलवून आम्ही भटकायला बाहेर पडलो आणि प्रथम धावलो त्या लोभसवाण्या बीचवर.

किनाऱ्याच्या मखमली वाळूतून चालायला सुरुवात केली. बीचवर अनेक लहानगे रंगी बेरंगी–निळे, जांभळे, हिरवे – शंख पसरले होते. शिंपले अंग मुडपून बसले होते. कोणाला बरोबर घ्यावे, कोणाला सोडावे काही उमगेना. सर्वच आपापल्या परिने सुंदर. पुढे पुढे तर मोठ मोठे शंख-शिंपले दिसू लागले. हे चिमुकले त्यात चिरडून जायला नको म्हणून त्यांना एके ठिकाणी परतताना अलगद घेऊ म्हणून ठेऊन दिले.

काय, काय अन् किती गोळा करावे असे होऊन गेले, तो सागर खजिना बघून. विविध रंगी, नानाविध आकारांचे शिंपले. खडकांच्या तुकड्यावरील डिझाइन्समधील विविधता तर विचारुच नका. किनाऱ्यावरील शेकडो वर्षांपूर्वी पडलेल्या झाडांचे ओंडक्यांतून कोरल्स्‌चे तुकडे विखुरलेले होते. कशी न्यायची ही एवढी संपत्ती ? चार हात हवे होते वाटू लागले. बरोबर बसण्यासाठी एक दुपटे घेतले होते त्यांत एक एक करुन ही लूट भरु लागलो. पण 'पुरे झाले'चे समाधान होईना. येवढ्यांत पाऊस सुरु झाला. जवळील एकुलती एक छत्री निरंजनचे

डोक्यावर उघडली गेली आणि आम्ही झाडाच्या आश्रयाला धावलो. सबंध सागर किनाऱ्याने दाट जंगल होते. पंधरा मिनिटांत पाऊस थांबताच परत खजिना लुटायला आमची आगेकूच सुरु झाली. पोरंही मोठ्या उत्साहाने ही सागरसंपत्ती गोळा करत होती.

हळू हळू करता करता चांगले अर्धा–एक किलोमिटर आलो असू तोवर परत त्या पावसाने धाड् धाड् शितडायला सुरुवात केली. यावेळचा त्याचा जोर एवढा मोठा होता की झाडाआडूनही त्याने आम्हाला पुरे भिजवून काढले.

कपडे ओलेचिंब झाले. दुपटही ओलं झाल्याने हातातील शंख शिंपल्यांचे वजन वाढले. कपड्यांचा दुसरा जोड तर सोडाच पण अंग पुसायला टॉवेलसही आम्ही पोर्ट ब्लेअर सोडताना जास्त ओझं नको म्हणून आणले नव्हते. आता या कपड्यांवर कसं काय रहायचं? अंदमानात काहीतरी 'थ्रिलींग' घडाव वाटत होतं आणि आता त्याला तोंड द्यायची पाळी येताच तोंडचे पाणी पळाले. अंगावर कोरडे कपडे नाहीत. झोपायला सात जणात फक्त एक कॉट. "घ्या तुम्हाला काही तरी सनसनाटी पाहिजे नं" अस म्हणून निसर्ग आमच्यावर जणू आपली कृपाच ओतत होता.

अंदमानच्या नोव्हेंबरमधील पावसाचं एक बरं आहे; संतत धार लागून रहात नाही. रप, रप, रप, अर्धा पाऊण तास पडून जातो आणि त्यानंतर लगेच कडक ऊन पडते.

उघडीप होताच आणखी पुढे जायचा मोह टाळून माघारी फिरलो. आमच्या त्या चिमुरड्या निळ्या जांभळ्यांना न विसरता घ्यायचे होते. तेथे जाऊन पहातो तो काय एकजणही जागेवर नाही. आम्हा सात जणांशिवाय किनाऱ्यावर दिसत तर कोणी नव्हतं. "मग कोण हा अचानक लुटारु झाला असेल आम्ही गोळा करुन ठेवलेला हा खजिना लुटायला" म्हणत इकडे-तिकडे बघितले तो त्या छोट्यांची टोळी धीमेगतीने पळून जात होती. मग निरखून इतस्तत: बघितले तो अनेक रंगी बेरंगी शंख हळूहळू चालत होते. मऊशार पांढऱ्या वाळूतील क्षणोक्षणी बदलणाऱ्या त्या रंगमय रांगोळ्या भान हरपवून टाकणाऱ्या होत्या.

कडक उन्हामुळे रेस्ट हाऊसवर जाईपर्यंत आमचे कपडे वाळले देखील. कडकडल्या भुकेने विश्रामधामाकडे गेलो तो तेथे आम्हाला सरकारी आदरातिथ्याचा एक आश्चर्यजनक चमत्कारच बघायला मिळाला. मच्छरदाणी शिवाय एक छोटी कॉट डायनिंग रूममध्ये टाकली गेली होती आणि तेथे आमच्या खोलीतील दुसऱ्या माणसाची सोय करण्यात आली होती. हे पाहून कंधास्वामीचे आभार कसे मानावेत ते कळेना. आरामशीर खोली सोडायला तयार झालेला तो माणूस तर साक्षात देवदूतच वाटला. प्रवासात चांगले लोक भेटायलाही केवळ नशीबच लागते. निवाऱ्याची सोय झाल्याने जेवणावर आडवा हात मारला. येवढ्या थोड्या वेळात फारच रूचकर जेवण बनविले होते.

थोडी डुलकी घ्यावी वाटत होते पण येथे संध्याकाळी पाचलाच अंधार पडत असल्याने विश्रांती न घेता लगेच बाहेर पडलो. निबीड जंगलातून जाऊन दुसऱ्या बाजूच्या सागर किनाऱ्याची शोभा बघून यावी म्हणून निघालो तर खरं, पण चाल चाल अर्धा तासाचे वर चालतोय तरी जंगल काही लागेना. वाटेत एक शाळा लागली. दोन शिक्षकही भेटले. एक कलकत्याहून तर दूसरे बंगला देशातून निर्वासित म्हणून आलेले होते. बाकीचे सर्वजण तंगडतोडीला कंटाळले. पण आम्ही दोघं विशेषत: विजय महा जिद्दी. वबडी सवयीमुळे झोपाळला होता तरी त्याला विजयनी तसेच खांद्यावर टाकून आम्ही दोघांनी पुढे मार्गक्रमणा सुरू केली.

"समुद्राचा रस्ता कोणता ?" वाटेत भेटणाऱ्यांना आम्ही विचारत होतो. असेच पुढे जा. तेथे एक झोपडी लागेल तिथे विचारा" असे प्रत्येकाचे ठराविक उत्तर. अधून-मधून सतत पडणाऱ्या पावसाने खालची पायवाट निसरडी झाली होती. काही ठिकाणी पाणीही साठले होते. चालून चालून पुरी दमछाक झाली तेव्हा आत्तापर्यंत अनेकांनी सांगितलेली ती झोपडी एकदाची दिसली. एका चांगल्या शेतातील शेतकऱ्याचं खोपट होतं ते. तिथे खेळणाऱ्या दोन पोरांना "समुद्राचा रस्ता दाखवायला येता कां ?" विचारताच ती आनंदाने तयार झाली.

आता खरे जंगल सुरू झाले. सुरुवातीला पाऊलवाट तरी होती; नंतर जमिन काटेकुटे, मुळांनी भरलेली असल्याने तिला पायही लागेना. वर आभाळही दिसत नव्हते एवढी गर्द झाडी. एखादा साप फुसकन अंगावर येईल की काय याची मनात सारखी भीती वाटत होती. आंत पाऊल टाकलं तर होतं त्यामुळे बाहेर पडण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. ज्या सागराच्या लाटांचा आवाज ऐकू येत होता त्यांच्या दर्शनासाठी ते घनदाट जंगल पार करणे प्राण तळमळविणारे होते. छातीचे ठोके वाढत असताना दहा मिनिटांच्या जीव टांगणीला लावणाऱ्या पाय-पीटी नंतर त्या नीलसागराचे दर्शन होताच सुस्कारा सोडला. प्रथम ठरविले होते किनाऱ्या किनाऱ्याने जेट्टीपर्यंत वाळूतून चालत जायचे पण भरती असल्याने किनाराच उरला नव्हता. लाटांवर लाटा जंगलामधे घुसून त्याला गिळू पहात होत्या. समुद्राचे आत्ताचे रौद्र स्वरूप पाहून हाच का तो सकाळचा संथ, नितळ सागर असा पेच पडला. लाटांचे तांडव नृत्य डोळे भरून बघायला वेळच नव्हता. तासाभरात अंधार पडणार म्हणून एक फक्त फोटो काढून ताबडतोब माघारी फिरलो. पुन्हा एकदा तीच जीव मुठीत घेऊन केलेली जंगलातील वाटचाल. वाटेत लालबुंद गुजा पडल्या होत्या. वाटाड्या पोरांना बक्षिसी देऊ केली असता त्यांनी चक्क नाकारली. माणुसकीच्या झऱ्याला शहरी गटाराचे स्वरूप या बेटावर अजून आलेले दिसले नाही.

पाय सटकन सरकवणाऱ्या अरुंद, ओलेत्या वाटेवरून पटापट पावलं उचलण्याची कसरत करत अंधार पडायच्या आत कसं बसं रेस्ट हाऊसवर पोहोचलो. कंधास्वामीने गरमागरम कॉफी पुढे करून आनंद द्विगुणीत केला.

कॉफी घेईपर्यंत ते चिमुकले बेट काळोखाच्या दुलईत लपेटून गेले. येथे लाईटस् संध्याकाळी ७ वा. येतात. तोपर्यंतचा वेळ काढण्यासाठी बाहेर व्हरांड्यात बसलो आणि गप्पांची आपसुकच मैफील जमली. सहज वरती वघितले तो ४–५ पाली ट्यूबजवळ किड्यांसाठी दबा धरून बसलेल्या दिसल्या. दिवेलागण होताच 'दिव्याला नमस्कार' करायला नजर वर गेली तो तेथे ४०–५० पालींचे संमेलनच भरलेले. सापांसारख्या प्राण्यांपासून भय असल्याने की काय गेस्ट हाऊसही जमिनीपासून वर, प्लॅटफॉर्मवर बांधलेले होते.

कंधास्वामी जेवायला चलण्यासाठी घाई करू लागला. रंगात आलेली गप्पांची मैफील सोडून उठवेना. शिवाय इतक्या लवकर जेवून घेतलं तर आपसूक झोपावच लागेल म्हणून आम्ही त्याच्या बोलावण्याकडे दुर्लक्ष केलं. शेवटी त्याने "रात्री १० वा. लाईटस जातील; त्या आधी जेऊन घ्या" सांगताच पुरुष कंपनीचं धाबच दणाणलं. कारण वर दिसणाऱ्या फॅनच्या आशेवरच त्यांनी रात्री मच्छरदाणीशिवाय झोपायची स्वप्ने रंगविली होती. ताडकन् उठलो आणि आपुलकीने वाढलेल्या जेवणावर परत आडवा हात मारला.

रात्री झोपायचे आधी प्रत्येकजग जमिन परत परत झाडून घेत होता. लाकडांची घरे त्यामुळे मुंग्या, मुंगळे यासारखे कीटक मुबलक. पोरांमुळे दोघी बायकांना आयत्या कॉटस् मिळाल्या. डनलॉप गादीवर, मच्छरदाणीच्या घुंगुटात खाली चादरीवर झोपलेल्या पुरुषवर्गाकडे "ब्रेव्हो स्त्री मुक्ती" म्हणून सम्राज्ञीच्या आवेशात पहात आरामात जी ताणून दिली ती उजाडेपर्यंत. पंखे होते तोपर्यंत ठीक. त्यानंतर नील आयलंडचे डासांना मेन लँडवरील तीन समर्थ पुरुषांच्या रक्ताची मेजवानी रात्रभर मिळाली. तरी ओडोमॉसची कुंपणे त्यांनी आपल्याभोवती उभारली होती. पण हा वास प्रथमच घेत असल्याने की काय तेथील डासांना तो फार आवडला असावा. त्यामुळे त्यापासून दूर पळण्याऐवजी त्यांनी त्याचा यथेच्छ आस्वादच घेतला.

आन्हिकं उरकून तमाम पुरुषवर्ग त्यांच्यावर रात्री झालेल्या अन्यायाचा सूड उगवण्यासाठी आम्हा बायका पोरांना न घेता नील आयलंडचे उरलेले निसर्ग-वैभव लुटायला बाहेर पडला. ती सुनहरी सकाळ विजयचे शब्दात ...


"सकाळी उठलो तेव्हा पहाटेचे पांच वाजले होते. उठलो कसचे, रात्रभर आम्ही दोघे (मी व पटवर्धन) जागेच होतो; डांस, मुंग्यांशी शर्थीने झुंज देत. त्यात आम्ही झोपताना अंगाला ओडोमॉस लावण्याची घोडचूक केली होती. त्याचा डासांवर कोणताही परिणाम न होता उलट त्याच्या वासामुळे आम्ही दोघेजण झोपलो आहोत हे मात्र त्यांना नक्की समजत होते. बाहेर स्वच्छ उजाडलं होतं. अंथरुण-पांघरूण आवरून, तोंड धुवून चहाची प्रतीक्षा सुरू झाली. येथे पावडरचं दूध असल्यामुळे "दूध आलं नाही" ह्या सबबीचा प्रश्नच नव्हता.



▲ सेल्यूलर जेल


▼ सावरकर विंग





▲ नील आयलंड

▼ धनिखाडी डॅम



तरी सुद्धा कंधास्वामीची शेगडी पेटेपर्यंत सहा वाजले. गरमागरम चहाचा कप घेऊन अंगणात गेलो. झाडाखालच्या एका बाकावर बसून सिगरेट शिलगावली आणि निवांतपणे चहाचे घुटके घेत राहिलो. मनात सहज विचार आला "इतक्या आरामात चहा आपण पुण्यात कधी पिऊ शकतो कां ?" कुठं जायचं नाही, कशाच्या पाठीमागे धावायचं नाही, कसलंही बंधन नाही.

घड्याळात बघितलं तर सात वाजायला आले होते. मनी जागी झाली होती. काल एका शेतकऱ्याच्या घरासमोरील हिरव्यागार नैसर्गिक हिरवळीवर काढलेला तिचा फोटो ओव्हर लॅपिंगमुळे वाया गेला होता; तो पुन्हा काढावयाचा होता. मनीला तयार करून तडक पाऊलवाट पकडली. हिरवळीच्या गालीच्यामधून जाणारी मखमली वाट सकाळच्या वेळी मोठी सुखद वाटत होती. वाटेत एक शेळी आणि तिच्या भोवती दोन गोंडस अन् तजेलदार करडं उड्या मारत होती. मनीने त्यातल्या एकाला उचलून घेतल. एव्हाना 'ती' झोपडी आली. झटपट फोटो काढून रेस्ट हाऊस वर परत आलो तर पटवर्धन व कवठेकर बीचवर गेल्याचं कळलं. बबडी उठला होता. तो मला चिकटायच्या आत मी बीचच्या दिशेने पळालो.

पटवर्धन व कवठेकर बीचवरच्या हॉटेलमधे चहा पित बसले होते. मी त्यांच्यात सामील झालो. बाहेर भाज्यांचा बाजार भरला होता. एका लाकडाच्या चौकटीला तराजू बांधून व्यवहार चालू होता. काही वेळा वजनाच्या जागी दगड पण वापरला जात होता. पूर्व-पश्चिम बेट क्रॉस करून जंगलात शिरण्याची कल्पना कवठेकर व प्रदीप दोघांनाही पसंत पडली आणि आम्ही लगेच निघालोच.

वाटेत बाजार लागला. तिथे माशांची विक्री चालू होती. त्या गर्दीत शिरून त्यांच्यासमवेत प्रदीपने एक फोटो घेतला. पूर्वेकडच्या किनाऱ्याकडे जाण्यासाठी आधी उत्तरेकडे चालत जाऊन मग उजवीकडे वळून जावे लागणार असल्याचे चौकशीअंती समजले. उत्तरेच्या दिशेने जाणारी पाऊलवाट पकडून झपझप चालण्यास सुरुवात केली. दोन्ही बाजूला पद्धतशीरपणे केलेली शेती पसरली होती. या बेटावर तुम्ही कुठेही बघा टवटवीत तजेलदार हिरवेपण तुम्हाला सोडणार नाही. इथल्या कोंबड्यासुद्धा गुबगुबीत, अनेक रंगांनी नटलेल्या, अगदी चकचकीत.

सहज वरती बघितलं तर सूर्याला चारही बाजूंनी काळ्याकभिन्न ढगांनी वेढलेलं होतं. हवेतील दमटपणा आणि उष्माही वाढला होता. घामाच्या धारा वहायला लागल्या. आता थोड्याच वेळात पाऊस सुरु होणार हे आम्ही ओळखलं. इथला पाऊस अक्षरशः चाबकाने फोडून काढल्यासारखा झोडपतो. त्यामुळे कुठेतरी आडोशाला जाणं आवश्यक होतं.

उजवीकडे एक शेती प्रकल्प आणि शेडमधे घोरत पडलेले कॅटरपिलर्स दिसले. आत शिरेपर्यंत पावसाला सुरुवात झाली. जवळजवळ पळतच शेड गाठली.

...२

तेथे त्या फार्ममधे काम करणारी बरीच लोकं भेटली. बरीचशी मद्रास वा कलकत्याहून येथे आलेली. त्यांच्याशी गप्पा गोष्टी करत बसलो. या शेडमधे फार्ममधे वापरण्यात येणारे ट्रॅक्टर्सपण होते. एवढीच या बेटावर दिसलेली ऑटो-मोबाइल्स. बाकी सर्व व्यवहार पायी अथवा सायकलवरुन.

पाऊस थांबताच आकाश निरभ्र झालं आणि आमचा प्रवास पुन्हा चालू झाला. वाटेत एका माणसाला पुन्हा एकदा विचारले " हमे ये जंगलमेसे बीच तक जाना है, पूरबकी ओर. कैसे पहुचेंगे ? " तो म्हणाला " चलो हम आपको सब दिखाते है " आयता गाईड मिळाल्यामुळे आमचा प्रश्न सुटला. त्याच्या पाठोपाठ चालायला सुरुवात केली. हळू हळू वाटेवर पाण्याची डबकी लागू लागली. काही ठिकाणी तर घोटया एवढा चिखल होता. वाकडया-तिकडया उडया मारत आम्ही चालत होतो. बघता बघता दोन्ही बाजूची झाडी दाट होत चालली आणि थोडयाच वेळात आम्ही किरर् जंगलात शिरलो.

जसजसे आत जात गेलो तसतशी पाऊलवाटही दिसेनाशी झाली. सूर्यप्रकाश देखील आत शिरत नव्हता. एका झाडाला दाट वेलीने पुरते वेढून टाकले होते; इतके की मूळ झाडाचे पान देखील दिसत नव्हते. त्या वेलीचा वरचा भाग मात्र सूर्यप्रकाशाने न्हाहून निघाला होता. मोठं रमणीय दृश्य होतं. जमिनीवर लोळण घेऊन एक फोटो खेचला तेव्हा समाधान झालं.

थोडं पुढे गेलो तो काहीतरी जमिनीसपाट वळवळत जाताना दिसलं. घोरपडीसारखा पण त्याच्या दुप्पट-तिप्पट आकाराचा हा ' गोई ' नावाचा प्राणी. त्याचा फोटो काढण्यासाठी कॅमेरा घेऊन पळत सुटलो. दृष्टीच्या टप्प्यात तो आला; मोठा उग्र. शेपूट सळसळ हलवत बेरडपणे आमच्याकडे बघत होता. फोटो घेण्यासाठी पटवर्धन सावधगिरीने वाकला पण कळ दाबायचे आधीच क्षणार्धात तोंड फिरवून तो जंगलात नाहीसा झाला. फार हळहळ वाटली; पण इलाज नव्हता.

हळू हळू झाडी विरळ होऊ लागली. लाटांचा आवाज कानावर येऊ लागला. दोन-एक मिनिटांतच आम्ही बीचवर येऊन पोहोचलो. पांढरीशुभ्र, अतिशय मुलायम रेती; आडवे-तिडवे समुद्रात लोटांगण घालून पसरलेले निष्पर्ण वृक्ष, स्वच्छ पाणी; तळामधे जन्म घेणारी मनोहर कोरल्स. भेदक शांतता अंगावर काटा फुलवत होती. त्या बीचवर आम्ही फक्त चार जण. समोर खवळलेला समुद्र; मागे घनदाट जंगल. मोठं विलक्षण वाटत होतं. तिथल्या मऊशार वाळूत शंख शिंपले गोळा करत बराच वेळ भटकलो. घडयाळात बघितलं तर साडेनऊ वाजून गेले होते. बायका-पोरं आमच्या नावाने नक्की शंख करत असणार याची जाणीव झाली. झपाटयाने परतीच्या वाटेला लागलो. "

दुपारी ११॥ ते १२ चे दरम्यान बोट होती. कंधास्वामी "जेऊनच जा" म्हणत होता; पण काहीही कारणाने ही बोट चुकली तर इथेच अडकून पडावे लागेल म्हणून

येताना बरोबर आणलेले फराळाचे पदार्थ खाऊन १०॥ वा. गेस्ट हाऊस सोडले. निरोप घेताना गहिवरून आले. इतकी आपुलकीची वागणूक सरकारी विश्रामधामात मिळू शकते हे कोणी आधी सांगितले असते तर विश्वास ठेवायला अवघड गेले असते.

ही वेगवेगळ्या आयलंडस्‌वरची इन्स्पेक्शन हाऊसेस अंदमान पब्लीक वर्कस्‌चे अखत्यारीत येतात. त्यांच्या ग्रेडस् प्रमाणे चार्जेस् असले तरी ते फारच बाजवी असतात. नील आयलंडचे रेस्ट हाऊसमधे एका वेळचे जेवणाला दरडोई ६ रु. तर चहा वा कॉफीचे कपाला ६० पैसे दर होता.

'नील आयलंड' या बेटावर १९६९ मधे प्रथम वस्तीला सुरुवात करण्यात आली. तेथे स्थानिक असे रहिवासी–आदीवासी–नव्हतेच. सरकारने बाहेरून लोक आणले. त्यांनी १२ रु. एकर दराने जमिन खरेदी केली म्हणे. सध्या येथील लोकसंख्या सुमारे १५०० असून बहुसंख्य हिंदू आहेत. या लोकांनी जंगलतोड करून शेतीस सुरुवात केली. भात हे येथील मुख्य पीक. भाज्यांमधे वांगी, दूधी, तोंडली, भेंडी, चवळी, शेवगा, मोठ्ठाला मूळा या जास्त करून दिसल्या. नारळाची लागवड मात्र कमी आढळली. केळी त्यामानाने भरपूर. खरे जंगल फक्त समुद्रकिनाऱ्यानेच असून आतील सर्व जमिन शेतीच्या लागवडीखाली आढळते. हा सर्व शेतीमाल पोर्ट ब्लेअर येथून येणाऱ्या एजंटस्‌ना विकण्यात येतो. त्यामुळे एवढे पिकूनही विकत घ्यायला गेले तर शहराइतकीच किंमत मोजावी लागते. सर्व भाज्या ५ रु. किलोने होत्या. मजूरीही भरपूर. २० रु रोज. शिवाय दोन वेळचे जेवण, एक वेळचा नाष्टा मजूरांना द्यावा लागतो म्हणे. येवढ्या छोट्या बेटावरही तीन शाळा ( २ प्राथमिक १ माध्यमिक ) होत्या. शिक्षणाचे माध्यम हिन्दी. बहुसंख्य शिक्षक वर्ग कलकत्त्याहून आलेला – बंगाली. कॉलेजसाठी मात्र पोर्ट ब्लेअर वा निकोबारला जावे लागते. वन्यपशूंमधे 'गोई' हा सरड्यासारखा दिसणारा १०–१२ इंच लांबीचा सरपटणारा प्राणी प्रामुख्याने आढळतो. पूर्वी हरणेही होती म्हणे. आता एकही नाही. एकूण या बेटावरचे जीवन फारच लोभस, संथ, शांत. सायकल सोडली तर एकही वाहन या बेटावर नाही.

जेट्टीवर खूप आधी येऊन बसलो. बोट येईपर्यंतचा कंटाळवाणा वेळ धांवपळीच्या जगापासून दूर असा या रम्य बेटावरील कालचा दिवस परत परत आठवून काढत असतानाच बोटीचा भोंगा वाजला. कालची गोमतीच रंगतहून पोर्ट ब्लेअरला न्यायला आली होती. रंगतपर्यंत जायचा विचार सोडून दिला म्हणूनच नीलच्या निळाईच्या लहरी इतक्या आरामात बघता आल्या. जेट्टीच्या लांब लांब लाकडी पट्ट्यांमधे पाय अडकू न देण्याची कसरत करत मोठ्या समाधानाने बोटीत पाऊल टाकले. बरोबर अनेक रंगीबेरंगी पिसांच्या देखण्या कोंबड्या पोर्ट ब्लेअरला पाठविल्या जात होत्या. आपण अंतिम प्रवासाला चाललोत याची त्या बिचाऱ्यांना कल्पना असेल कां ?

त्या स्वप्निल बेटाला रामराम करताना परत यायची स्वप्ने बघाविशी वाटत होती. १२॥ वाजता बोट सुटली. मोकळ्या प्रदुषण विरहीत वातावरणातून बोटीत-आल्यावर आंतिल कुबट वासाने पोटात गलवलू लागले. आज बोट जरा जास्तच हालत आहे वाटले. तसे शेजारच्या नेहमी प्रवास करणाऱ्याला सांगताच तो म्हणाला "आज तर समुद्र फारच शांत आहे. एरवी बोटीच्या एका बाजूने लाटांचे पाणी आत येऊन दुसऱ्या बाजूने बाहेर पडते." ते लोक बहुदा बोटीच्या प्रवासाला सरावले असावेत. बोट न लागण्यासाठीचे औषध घेऊनही निरंजनला उलट्या झाल्या आणि मी बाहेरची शोभा बघण्याऐवजी लवंग, सुपारी खात डोकं धरुन बसले. बाकी कोणाला मात्र काहीच त्रास झाला नाही. वारा उलट दिशेने असल्याने पोर्ट ब्लेअरला पोचायला जातानाच्या पेक्षा जास्त वेळ लागला. दुपारी साडेतीन वाजता फिशरी जेट्टीचे प्लॅटफॉर्मवर "सुटले बुवा या हालत्या प्रवासातून" म्हणत टुणकन् उडी मारली.

इतक्या उशीरा टुरिस्ट होमवर जेवण मिळणार नाही म्हणून देवी कॅफेतील तोंडाला पाणी सुटविणाऱ्या पदार्थांचा आस्वाद घ्यायला निघालो. टॅक्सी मिळाली नाही. परवा इतकी जवळ वाटलेली कॅफेतील ही देवी आज काही लवकर दर्शन देईना. अर्धा तासाचे पायपीटीचे तपश्चर्येनंतर ती एकदाची अवतीर्ण झाली आणि आम्ही आमची पोटपूजा पूर्ण केली. चार वाजता येवढे भरपेट खाल्यावर रात्री परत काय जेवणार म्हणून बाजारातून ब्रेड आणून कॉफी ब्रेडवर भागवायचे ठरविले.

टुरिस्ट होमवर स्वागत करायला उरलेल्या खाद्यपदार्थांना लागलेल्या मुंग्या होत्याच. त्याच बरोबर ले. शिंदेंची रॉस आयलंडच्या परवानगी साठीचा ॲप्लीकेशन केला असल्याची चिठ्ठीही दारात वाट पहात होती. संध्याकाळ मस्त आरामात घालविली.

● ●

८५३
ग्रं. क्र. २४३३३
... (स्थळ प्रत)

# पोर्ट ब्लेअर
# एक खडतर कारावास

आज पोर्ट ब्लेअर मधील स्थानिक प्रेक्षणीय स्थल दर्शनाची ट्रीप टुरिस्ट डिपार्टमेंटचे बसने घ्यायची ठरविले होते. ८॥ वा. बस येणार म्हणून ब्रेकफास्ट करुन तयार राहिलो. येथे पहाटे पांचलाच उजाडत असल्याने दिवस लवकर सुरु होतो. तरीही या कंडक्टेड टुरस् इतक्या उशीरा का सुरु करतात कोण जाणे ? ८॥ चे ९, ९॥, १० वाजले तरी गाडीचा पत्ता नाही. कंटाळवाण्या मार्ग-प्रतीक्षेनंतर १०।वाजता बस उगवली. "दूसरा एक ग्रुप येणार होता. त्यांच आटपलं नव्हतं म्हणून उशीर झाला." गाईडची सारवासारव ऐकताच चीड आली. सरकारी गाड्या जर प्रत्येकासाठी एक एक तास थांबायला लागल्या तर कसं व्हायचं ? आणि निघाल्यावर त्याची घाई सुरु झाली. "इथे फक्त ५ मि. आणि तिथे फक्त १० मि. बस थांबेल" म्हणून. तक्रार कोणाजवळ करावी आणि आत्ताच भांडण उकरुन काढल तर हा नीट दाखवणार नाही म्हणून मुकाट गप्प बसलो.

पहिल्यांदी नेण्यात आले ते 'चॅथम सॉ मिल' बघायला. ही चॅथम जेट्टीवर असलेली आशियातील सर्वात मोठी लाकूड कापायची गिरणी. अंदमानच्या जंगलातील लाकडांचे ओंडके मागेच असलेल्या समुद्रामार्गे वा ट्रकमधून येथे आणले जातात. क्रेनच्या सहाय्याने हे अवजड ओंडके वर चढविले जात होते. एक लोखंडी बाहू एक एक ओंडका मानवाचे मदतीशिवाय ओढून घेत होता आणि लगेच पुढे जाऊन एका धारदार करवतीने त्याचे तुकडे होत होते. आणखी थोडे पुढे अजून एक लहान करवत पाहिजे त्या आकारमानाच्या फळ्या करत होती. या अंदमानचे जंगलातील लाकडाची अजूनही ६० फूट लांबीची सलग फळी मिळू शकते म्हणे. हे लाकूड रेल्वे, जहाज, गोद्या, घरे बांधण्यासाठी उपयोगात आणले जाते. येथे मिळणाऱ्या विविध प्रकारच्या लाकडापासून केलेल्या नानविध उपयुक्त व शोभिवंत वस्तूंचे प्रदर्शन एका रुममधे मांडले होते. मात्र एकही वस्तू विक्रीसाठी नव्हती. येवढ्या सुंदर लाकडाचे साधे सॅपलही एवढ्या मोठ्या गिरणीत मिळू शकले नाही म्हणून वाईट वाटले. वेगवेगळी राज्ये निरनिराळ्या लाकडांच्या तुकड्यांनी चिकटविलेला भारताचा नकाशा तर फारच मनात भरला होता.

'मिनी झू' ची भेट नंतर होती. १० पैसे तिकीट काढून आत गेलो. निकोबारी माकडे, हरिणे, बदके, मोर यासारख्या नेहमी आढळणाऱ्या प्राण्यांबरोबर चिमण्या, डुकरे ( ही रानडुकरे साध्या डुकरांपेक्षाही लहान दिसत होती) यांनाही पिंजऱ्यात बघण्यासाठी बंद करुन ठेवले होते. आपल्याकडे न दिसणारे काही चिमुकले रंगी-बेरंगी पक्षीही होते. मगरींचे पैदास केंद्र हे या 'झू' मधील खास आकर्षण. एकूण या 'मिनी झू' मधे फारसं काहीच नाविन्य वाटल नाही.

त्यानंतर नेण्यात आले 'कॉटेज इंडस्ट्री म्युझियम' मधे. आता येथून तरी अंदमानात होणाऱ्या वस्तूंचा काही तरी नमुना सुवेनिर म्हणून घरी नेता येईल या आनंदात खालती उतरलो. येथेही दिल्लीच्या इंडस्ट्रीयल ट्रेड फेअर मधे भाग घ्यायला पाठविण्यासाठी तेथील सामानाचे पॅकींग चालले होते म्हणून विक्री बंद होती. "आम्ही एवढया लांबून आलोत म्हणून एखादी वस्तू तरी स्मृति म्हणून बरोबर नेऊ देत" अशी तेथील माणसाला कळकळीची विनंती करताच त्याचे "काही वाईट वाटून घेऊ नका. बाहेर याच वस्तू तुम्हाला जास्त स्वस्त मिळतील. आम्ही त्यांच्याकडूनच या वस्तू घेऊन त्यावर १०% कमिशन घेऊन विकतो" असे टिपिकल सरकारी उत्तर ऐकताच आपल्या देशाची किव आली. हे असे स्वतःची नाचक्की स्वतःचे तोंडाने सांगणारे लोक अधिकारावर असल्यानेच सरकारी उद्योग तोटयात चालतात. शंख शिंपल्यांचे दागिने, शिंपल्यांचे पेन स्टँडस्, किंग शेल, कपाटे, ड्रेसिंग टेबल्स, लँप शेडस् इ. प्रकारचे लाकडी फर्निचर येथे विक्रीसाठी ठेवलेले दिसले. नंतर बाहेर चौकशी करता बाहेरील दर समोरच्या गिऱ्हाईकाप्रमाणे कमी-जास्त होत असल्याने नवख्या माणसाला बरोबर भाव न ठरविता आल्यास तेथील वस्तू बहुदा महागातच पडतात असे आढळले. शिवाय तयार फर्निचरचे बाहेर एकही दुकान दिसले नाही. ऑर्डर देऊनच फर्निचर बनवून घ्यावे लागते. ही कॉटेज इंडस्ट्री कामाचे दिवशी सकाळी ९ ते १२.३० व दुपारी १ ते ४ पर्यंत उघडी असते.

अँथ्रोपॉलॉजीकल म्युझियम हा नंतरचा स्टॉप होता. येथे जेमतेम दहा मिनिटे दिली गेली. स्वतः गाईडतर गाडीतून उतरायलाही तयार नव्हता. हे म्युझियम अगदीच छोटे आहे. या द्वीपसमुहातील आदिवासी जमातींची हत्यारे, ते वापरत असलेले दागिने, त्यांच्या झोपडया, होडक्या, या सारख्या रहाणीमान दर्शक वस्तू, इ. या संग्रहालयात बघायला मिळतात. तसेच या आदिवासींच्या जीवनासंबंधीचे येथील काही फोटो फारच प्रेक्षणीय आहेत. अंदमान–निकोबारातील या आदिवासी जमातीकडे अश्मयुगीन माहिती संबंधीचे एवढे प्रचंड भांडार आहे की हे म्युझियम जास्त आकर्षक रित्या मोठे करता येईल असे वाटले.

'सेल्यूलर जेल' हेच अंदमानचे खरे तीर्थस्थान. या पवित्र वास्तूला वंदन करुन अंदमान दर्शनाची सुरवात करता आली नाही म्हणून आंत कुठेतरी टोचणी

लागली होतीच. त्यात आता गाईडने "जेल बंद होईल; लवकर चला" म्हणताच अँथ्रोपॉलॉजिकल म्युझियमचा ओझरता फेरफटका आटोपता घेतला. सेल्यूलर जेल आणि त्याचा उघडा दरवाजा बघताच जीव भांड्यात पडला. जेल बंद म्हणज तेथील म्युझियम दुपारी १२ वा. (वेळ ९ ते १२, २ ते ५) बंद होते. "येथे मात्र तू आम्हाला माहिती सांगितलीच पाहिजेस हं" म्हणून गाईडला आमचे बरोबर खाली खेचून धावतच आंत गेलो.

सेल्यूलर जेलला स्वत:चा असा खास इतिहास आहे. त्या भीषण गतकालाची काही स्मृतिचित्रे जेलचे प्रवेश द्वारापाशीच असलेल्या म्युझियममधे बघायला मिळतात. सेल्यूलर जेलचे राष्ट्रीय स्मारक म्हणून उद्घाटन त्यावेळचे पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी या तुरुंगात काही काळ व्यतीत केलेल्या क्रांतिकारकांच्या उपस्थितीत ११ फेब्रुवारी १९७९ रोजी केले. या वेळी या स्वातंत्र्य सैनिकांना अंदमान सरकारचे खास पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

म्युझियमच्या एका दालनात तेथिल राजबंद्यांना भोगाव्या लागणाऱ्या कष्ट-कारक जीवनाची विविध प्रतिके मांडून ठेवलेली आहेत. साखळदंड बेडी (Chain fetters), दंडा बेडी (Bar fetters), आडा-खडा दंडा बेडी (Crossbar fetters) यांच्या प्रतिकृति पाहिल्यावर आत्ताच्या पिढीला या बेड्या नुसत्या उचलायच्या म्हटल्या तरी घाम फुटेल; मग या अवजड बेड्या सतत घालून ते लोक कसे काय दैनंदिन व्यवहार करत असतील कोण जाणे ? क्रॉस बार फेटर्स मधे दोन पायांचे मधेही आडवा लोखंडी गज लावला असल्याने पाऊल टाकणंही अशक्यच होत असावं.

कैद्यांना अजून कडक शिक्षा असली की त्यांना पनिशमेंट ड्रेस म्हणून गोण-पाटाचे कपडे घालावे लागत. तो खरखरीत ड्रेस बघून अंगावरील तलम कपडा टोचू लागला. फटक्याच्या शिक्षेचे नुसते चित्र पाहून अंगावर शहारे येतात. गोण-पाटाचा खरखरीत ड्रेस घालायला लावून फटक्याच्या स्टँडवर कैद्याला पाठ वर करून झोपवत. मग जेलर साहेबांचे मनात येईल तेव्हांच हा फटक्यांचा आसूड थांबे. परत ही फटक्यांची जीवघेणी आतिषबाजी इतर सर्व कैद्यांनी बघितलीच पाहिजे अशी सक्ति असे; जेणे करून या क्रूर शिक्षेच्या भीतीने तरी वावगे वागण्याची दुर्बुद्धी त्यांना कधी होऊ नये.

जेल आधिकारी त्या काळात येथिल कैद्यांवर करत असलेल्या जुलुम जबर-दस्तीविषयी मुख्य भूमिवरील वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या हकिगतींची कात्रणे येथे लावून ठेवलेली आहेत.

स्वा. सावरकरांसारख्यांना ज्या कोलूला–तेलघाणीला–जुंपत त्या कोलूची प्रतिकृति पहाताना डोळे पाणवतात. ही शिक्षा झालेल्यांना रोज ३० पौंड

खोबऱ्याचे तेल किंवा २० पौंड मोहरीचे तेल काढावे लागे. काहींना काथ्या कुटावा लागे (आज आम्ही नुसता शाब्दीक काथ्याकुट करतो) आणि रोज ४ पौंड दोऱ्या तयार कराव्या लागत.

या कैद्यांना जेवणा-खाणासाठी भांडी कसली असत तर लोखंडाची. ती रोज घासून पुसून लखलखीत करून ठेवावी लागत. नाहीतर मिळणारे तुटपुंजे अन्नही कदाचित दिसत नसे. आणि या बिचाऱ्यांना मिळे तरी काय तर म्हणे न्याहारीला एक नारळाची वाटी भरून भाताची कांजी, ज्याला मीठसुद्धा नसल्याने ना चव ना ढव. सबंध दिवसासाठी प्रत्येकाला अगदी थोडे मीठ मिळे. ते जेवतानाचे डाळ-भातासाठी ठेवावे लागल्याने ही कांजी तशीच आळणी प्यावी लागे. या बंदीवासीयांना दिले जाणारे अन्न अपुरे तर असेच शिवाय माणसाने घेण्यायोग्यही नसे. पिण्याच्या पाण्यासाठीही त्यांचे असेच हाल होत. दिवसाला फक्त २–३ कप पाणी मिळायचे. म्हणजे ते बेचव अन्न पाण्याच्या घोटाबरोबर कसं तरी पोटात ढकलणंही अशक्यच. अंघोळ तर खाऱ्या पाण्यानेच करावी लागे. हे अंग खाजवणारे, डोळे चुरचुरविणारे समुद्राचे पाणीही प्रत्येकी फक्त तीन कटोऱ्याच मिळे.

येथील कैद्यांच्या छळाचा सगळ्यात अमानुष प्रकार म्हणजे नैसर्गिक विधींवर घालावा लागणारा संयम. फक्त सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा तीन ठराविक वेळीच कैद्यांना नैसर्गिक विधीसाठी जाता येत असे. या तीन वेळांशिवाय अधे मधे यासाठी जमादाराकडे विचारणा करणे म्हणजे जणू महाभयंकर गुन्हाच. एकदा का सायंकाळी ५ वाजता या कैद्यांना आपापल्या खोल्यांत बंद करून ठेवले की दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजताच खोलीचे कुलूप उघडले जाई. खोलीत एक मातीची कुंडी दिलेली असे पण ती इतकी छोटी की एका वेळच्या लघवीनेच भरून जाई. शौचास वगैरे लागली की बाहेर नेण्यासाठी कैद्यांना वॉर्डर लोकांच्या अगदी हाता-पाया पडावे लागे. आधी हे वॉर्डर्स वरिष्ठांच्या रागवायच्या भीतीने कैद्यांच्या केविलवाण्या मनधरणीकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत. त्यामुळे त्या बिचाऱ्या कैद्याला रात्रभर यावर ताबा ठेवावा लागे. एखाद्या मायेच्या पुताला त्याची दया आलीच तर तो जमादाराकडे रदबदली करे. जमादार अशा अवेळी त्रास दिल्याबद्दल त्या कैद्याची कडक शब्दात खरडपट्टी काढत आणि वॉर्डरलाही कैद्याचे ऐकल्याबद्दल सक्त ताकीद देत. कैद्याच्या या तक्रारीसंबंधी डॉक्टरला रिपोर्ट करणे वा न करणे हे सर्वस्वी जमादाराचे मर्जीवर अवलंबून असे. शंभरात एखादे वेळीच आजारी कैद्याचा डॉक्टर रिपोर्ट करी. हा रिपोर्ट त्यावेळचे जेलर मि. बारी यांचेकडे जात असे. आणि हा बारी माणूस कसा तर स्वा. सावरकरांनी लिहील्याप्रमाणे स्वतःला पोर्ट ब्लेअरचा साक्षात देव समजणारा. डॉक्टरने केलेल्या रिपोर्टवर स्वतःचे लहरी-प्रमाणे मि. बारी कृति करत. आजारी कैद्याची या लाल फितीच्या कारभारात काय अवस्था होत असेल याची आज कल्पनाही करवत नाही. सगळ्यावर ताण

म्हणजे हे बारी महाशय रात्रीच्या या ' अवेळी कॉल 'बद्दल दुसरे दिवशी सकाळी न्याय निवाडयास बसत. वॉर्डर आणि जमादार दोघांनाही त्यांच्या ड्यूटीज् नीट न पार पाडल्याबद्दल कडक भाषेत धमकावण्या मिळत. बारीच्या आरडा ओरड्यापुढे कोणाचीही ' ब्र ' काढण्याची हिम्मत होत नसे. कैद्याचीही उलट तपासणी घेतली जाई. आणि एखाद्या कैद्याने जर "मी यावर ताबा ठेऊ शकलो नाही" (I could not help the call of nature) असे उत्तर दिलेच तर बारी एकदम त्याच्या अंगावर गुरकावून जाऊन म्हणत "Why devil did you have it." त्या बिचाऱ्या कैद्याने जर "I got it because I get it" असे बोलण्याचे धाडस दाखविलेच तर जमादारच त्याच्या थोबाडीत मारे आणि अशी उद्धट उत्तरे दिल्याबद्दल कान उघाडणी करे. अशा शाब्दीक तोफांचे भडीमारावर या कैद्याची त्याच्या या भीषण (?) गुन्ह्यातून बहुदा सुटका होत असे पण एकादे वेळी बारी देवाचा खास वरदहस्त म्हणून अशा कैद्याला तातडीने चक्की पिसायला पाठविले जाई. या आणि अशा अनेक छळाबद्दल आणि जेल मॅनेजमेंटच्या जुलुमी अधिकाऱ्यां-विरुद्ध दाद मागण्यासाठी सेल्युलर जेलचे इतिहासात कैद्यांना अनेकदा आमरण उपोषणाचा मार्ग चोखाळावा लागला.

सेल्युरल जेलमधील या विदारक जीवनक्रमाविषयी अनेक राजबंद्यांनी लिहीलेल्या हकीगतींची पुस्तके एका कांचेचे कुलुपबंद पेटीत ठेवली होती. भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या या गीतांना अंतःकरणपूर्वक प्रमाण केला.

येथील कैद्यांना लिहायला वाचायला तर काही मिळतच नसे पण मुख्य भूमि-वरून आलेली पत्रे आणि कैद्यांनी स्वतः वर्गणी भरलेली वृत्तपत्रेही त्यांना सेन्सॉर केल्यावरच दिली जात. त्यांना मुख्य भूमीवर पत्र पाठविण्याची सवलतही वर्षातून फक्त एकदा मिळत असे. या जुलमी राज्यशाही विरुद्ध झगडता झगडता ठाकूर महावीर सिंगांसारख्या अनेक राजबंद्यांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. कित्येक कैदी वेडे झाले. तर आणखी काहींनी हे अपमानीत, क्लेशकारक जीणे जगण्यापेक्षा आत्मघात करून शांति मिळविली.

ब्रिटीशांइतकेच जपान्यांनीही येथे अनन्वित अत्याचार केले. दुसऱ्या महायुद्धात ही बेटे कांही काळ ( २३ मार्च १९४२ ते ७ ऑक्टोबर १९४५ ) जपान्यांचे ताब्यात होती. त्यांनीही दहशत निर्माण व्हावी म्हणून आणि अनेकांना ब्रिटीशांचे हेर समजून छळाच्या पाशवी पद्धतींचा मार्ग अवलंबिला. अनेक सुशिक्षित तरूणांना तुरूंगात डांबून जागच्या जागी गोळ्या घालून ठार मारण्यात आले. यापैकी बऱ्याच जणांना एक खड्डा खणून ( जो त्यांच्याकडूनच आधी खणून घेण्यात आला होता ) एकत्र पुरवण्यात आले. पोर्ट ब्लेअर पासून १५ मैलावर असलेले हंफ्रेगंज येथील हुतात्मा स्मारक केवळ संशयाच्या बळावर जपान्यांनी केलेल्या क्रूर कत्तलीची मूक-पणे साक्ष देत आजही उभे आहे. या बलिदानार्थींमधे विम्को मॅच फॅक्टरीत काम

करणारे श्री. रहाळकर हे महाराष्ट्रीयन गृहस्थ होते. जपान्यांच्या गोळ्यांना बळी पडलेल्या काही हुतात्म्यांचे फोटो या दालनात आहेत.

भारतीयांवरील अत्याचाराची समाप्ती नेताजी सुभाषचंद्र बोसांच्या त्यांनी या बेटांना प्रोव्हिजनल गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचा प्रमुख या नात्याने दिलेल्या तीन दिवसांच्या भेटीने झाली. त्यांनी सेल्यूलर जेललाही भेट दिली आणि चौकशी न करता शिक्षा देणे बंद करविले. नेताजींच्या भेटीनंतर येथे एकालाही फांशी देण्यात आले नाही. जपानी सेनेने नेताजींना दिलेल्या मानवंदनेचा फोटो येथे पहायला मिळाला. सेल्यूलर जेलच्या मूळ इमारतीची प्रतिकृतीही येथे करून ठेवलेली आहे. ज्या देशभक्तांच्या अमूल्य त्यागामुळे स्वातंत्र्याची फळे आज आपल्याला चाखायला मिळत आहेत त्यांच्यापुढे नतमस्तक होऊन हे दालन सोडले.

दुसऱ्या दालनांत जेवढ्या क्रांतिकारकांची छायाचित्रे उपलब्ध होऊ शकली तेवढी सर्व कालानुक्रमे व नीटसपणे लावण्यात आलेली आहेत. तसेच त्यांच्या आंदोलनांची थोडक्यात माहिती लिहून ठेवलेली आहे. प्रत्येक फोटोखालील मजकूर सावकाशीने वाचायची इच्छा म्युझियम बंद होऊ लागल्याने मारावी लागली. माणिकतोळा, अलीपूर बॉम्ब खटला, लाहोर कट, खुलना बॉम्ब खटला, डलहौसी स्क्वेअर बॉम्ब, डाक्का कट, अशा अनेक खटल्यांतील क्रांतिकारकांची छायाचित्रे बघताना भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एका तेजस्वी कालखंडाचा चित्रपटच नजरे-समोरून सरकून गेला. स्वा. सावरकरांची ते भिंतीवर लिहीत असल्याची पूर्णाकृति तसबीर येथे आहे.

सेल्यूलर जेलमधे असलेले इतर काही नावाजलेले राजबंदी म्हणजे वीरेंद्र-कुमार घोष (महर्षी अरविंद घोषांचे धाकटे बंधू), उपेंद्रनाथ बॅनर्जी, हेमचंद्र दास, वामनराव जोशी, गणेश दामोदर सावरकर, शंभूनाथ आझाद, जयदेव कपूर, बटुकेश्वर दत्त, सचिंद्रनाथ सन्याल, पंडीत परमानंद, गणेशचंद्र घोष, त्रैलोक्यनाथ चक्रवर्ती, यासारखे अनेक. या सर्व देवासमान क्रांतिकारकांचे केवळ ओझरते दर्शन घेऊन बाहेर पडावे लागले म्हणून फार रुखरुख लागून राहिली होती.

ही दोन दालने बघून प्रत्यक्ष जेल बघण्यासाठी तुरुंगाचे आवारात आमची मार्गक्रमणा सुरू झाली.

अंदमान-निकोबार सारख्या अती दूरच्या ठिकाणी कैदी पाठविण्याचा आरंभ १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर झाला. ब्रिटिशांविरुद्धच्या भारतातील या सशस्त्र उठावातील सुमारे २०० बंडखोरांना जानेवारी १८५८ मधे येथे आणण्यात आले. त्यांचा नक्की आकडा आणि आधिक माहिती आज उपलब्ध नसली तरी अल्लमा फजाली हक खैराबादी आणि मौलाना लैकत अली हे दोन नावाजलेले बंडखोर नेते येथे येऊन कैदी म्हणून मृत्युमुखी पडले; तर मीर जाफर अली थानेश्वरी या आणखी एका बंडखोराने शिक्षेची वीस वर्षे अंदमानात घालविली.

राजवंद्यांचा अंदमानात आलेला दुसरा ग्रुप म्हणजे ' वहाबी ' कैद्यांचा. या लोकांचीही तपशीलवार माहिती मिळू शकत नाही. ब्रह्मदेशियांनी ब्रिटीशांविरुद्ध केलेल्या धाराधाडा उठावातीलही अनेकांना अंदमानात पाठविण्यात आले होते. तसेच चित्तगांव आर्मरी रेड, मेरुत कट, लेबर कमिशनर केस यामधील लोकांनाही अंदमानातच आणण्यात आले होते.

पंजाब, बंगाल यासारख्या दूरच्या राज्यांतून बोटीत बसवून या कैद्यांना हे ब्रिटीश लोक पाठवतात तरी कुठे याचा सुरुवातीला लोकांना पत्ताच नव्हता. कोणीच परतत नसे. त्यामुळे या बोटी नेणारे पाणी त्यांना काळे दिसू लागले असावे. मरस्तोवर काम, उपासमार, डांस, दलदल, सत्ताधाऱ्यांची अमानुष वागणूक यामुळे हे सर्व कैदी बहुदा थोड्याच काळांत मृत्युमुखी पडत. त्यामुळे काळ्या पाण्यावर गेला तो मेला अशीच भावना मुख्य भूमीवर झाली होती.

ब्रिटिश राज्यकर्ते सगळ्या खतरनाक कैद्यानांच काळ्या पाण्यावर पाठवत. भारतात ब्रिटिशांविरुद्धचा असंतोष जसजसा उफाळू लागला तसतशी येथील कैद्यांची संख्या वाढत गेली. या कैद्यांनी एकजुटीने काही बंडाळी करू नये म्हणून एका वेगळ्या तुरुंगाची आवश्यकता ब्रिटिश सरकारला वाटली असावी.

सरकारच्या ३० सप्टेंबर १८९६ च्या ऑर्डर नं. ४२३ प्रमाणे सेल्युलर जेलचे बांधकामास संमती मिळाली. सुरुवातीला ६०० कैद्यांची सोय करण्याची कल्पना होती. मि. मॅकक्विलेन या सब इंजिनियरची या बांधकामासाठीचा प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. तुरुंगाचे प्रत्यक्ष बांधकामास ऑक्टोबर १८९६ मधे सुरुवात होऊन १९०६ मधे सर रिचर्ड टेंम्पाल हे चीफ कमिशनर असताना ते पूर्ण झाले. हे बांधकाम वेगाने पूर्ण व्हावे म्हणून वायपर, नेव्ही बे, फोनिक्स बे, ब्रीच गंज या सारख्या आसपासच्या बेटांवरूनही कैदी आणण्यात आले होते. ६०० कैद्यांना या तुरुंग बांधणीचे कामावर राबवून घेण्यात येत होते. याचवेळी वायपर आयलंडवरील २०,००० घनफूट दगड फोडण्याचे कामही कैद्यांकडून करवून घेतले जात असे. अंदमानात उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीशिवाय बांधकामासाठी लागणारा बराचसा माल ब्रह्मदेशातूनही आणला गेला आणि ही तीन मजली भव्य इमारत उभी राहिली. कैद्यांनी कैद्यांसाठीच बांधलेला तुरुंग असे सेल्यूलर जेलसंबंधी म्हणता येईल.

या तुरुंगाच्या मध्यभागी चौफेर लक्ष रहावे म्हणून बांधलेला एक सेंट्रल टॉवर आणि त्याच्या भोवती चाकाच्या आरीप्रमाणे बांधलेल्या सात इमारती; प्रत्येक इमारतीला तळमजला धरून तीन मजले व सर्व मिळून ६९८ खोल्या असे या तुरुंगाचे स्वरूप त्यावेळी होते. प्रत्येक कैद्याला १३ फूट × ९ फूट आकाराची स्वतंत्र खोली. तिला मागच्या बाजूला १० फूट ऊंचीवर ३' × १' चे व्हेंटीलेटर. पुढे प्रचंड मोठे लोखंडी जाळीचे दार ज्याची कडी भिंतीतून आरपार गेल्यावर एका

कोनाड्यात तिला लावलेले भले मोठे कुलूप—जे मला वाटतं एका हाताने उचलताही येणार नाही. सगळ्या खोल्यांच्या पुढून जाणारा कॉमन, सलग ४ फूट रुंदीचा लोखंडी ग्रिल्स मारून बंद केलेला व्हरांडा. हे सर्व व्हरांडे सेंट्रल टॉवरला मिळतात. कैद्यांना आत-बाहेर जाण्यासाठीचा हाच एकमेव मार्ग. कैद्यांचे एकमेकांशी कमीत कमी संभाषण व्हावे म्हणून एका विंगची (इमारतीची) पाठीमागची आणि दुसरीची पुढली बाजू समोरा-समोर येतील अशा रितीने मुद्दाम बांधलेली. या सगळ्या कैद्यांना अलग ठेवण्याच्या खबरदारीमुळे स्वा. सावरकरांचे जेष्ठ बंधू श्री. गणेश सावरकर यांना आपले बंधू याच तुरुंगात आहेत हे वर्षानंतर समजले. या जेलच्या सात विंग्ज पैकी चार आता नष्ट झाले असून (दोन या बेटांवर १९४१ मधे झालेल्या भूकंपामुळे पडले गेले तर दोन जपान्यांनी बरॅक्स बांधण्यासाठी पाडले) उरलेल्या तीन विंग्जपैकी एकात सध्याचा स्थानिक तुरुंग आहे तर उरलेले दोन विंग्ज राष्ट्रीय स्मारक म्हणून जतन केलेले आहेत. नामशेष झालेल्या या तुरुंगाच्या इमारतींचे जागी स्वातंत्र्यानंतर गोविंद वल्लभ पंत हॉस्पिटल—जे या बेटांवरील सर्वात मोठे समजले जाते—उभारण्यात आले आहे. या तुरुंगात कॉमन हॉल्स नसून फक्त खोल्याच असल्याने याचे 'सेल्यूलर जेल' नामकरण झाले असावे.

अशा या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या वास्तव्याने पुनीत केलेल्या जेलच्या प्रत्यक्ष इमारतीत पाऊल टाकताना थरारून आले होते. सेंट्रल टॉवरच्या दुसऱ्या मजल्यावरील पटकोनी खांबावर येथे ठेवण्यात आलेल्या ३३६ हून जास्त स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारकांची नांवे कोरलेली आहेत. पहिलेच नांव मुंबईहून आणले गेलेल्या श्री. वामनराव जोशींचे दिसताच त्यांना वंदन केले. राष्ट्रीय स्मारक म्हणून जतन केलेल्या दोन पैकी एका इमारतीत तिसऱ्या मजल्यावरील शेवटच्या खोलीत (नं. १२३) वीर सावरकरांना बऱ्याच वेळा बंदिस्त करून ठेवण्यात येत असे. सावरकरांचे स्मृतिला दंडवत घालावे म्हणून धावतच तेथे गेलो. बाकी सर्व खोल्या उघड्या होत्या पण याच खोलीला तेवढे भले मोठे मोठे कुलुप पाहून निराशा झाली. जाळीचे दारातून स्वातंत्र्यवीरांचा फोटो दिसत होता त्याला नमस्कार केला. सावरकर स्वतः काळ्या पाण्यावरून सुटले तरी त्यांच्या फोटोला अजून बंदिवासाची शिक्षा चालूच होती. कोणी माथेफिरूने वा समाजकंटकाने आत शिरून या पवित्र वास्तूची विटंबना करू नये म्हणूनही कदाचित ही खोली बंद करून ठेवण्यात आली असेल. सावरकरांची खोली बाहेरून कां होईना पण बघितल्याने आपली अंदमानची क्रांतियात्रा पूर्ण झाल्याचे समाधान लाभले.

त्यांचे वेळी आजच्या सारखी नीरव शांतता या जेलमधे नसेल. कैद्यांनी खचाखच भरलेल्या खोल्या. प्रत्येक कॉरिडरमधे एक असे २१ वॉर्डर्स एका वेळी ड्युटीवर असत. शिवाय सेंट्रल टॉवरवर सेंट्री असत ते वेगळेच. कोणा कैद्याने पळून

जायचा प्रयत्न करू नये म्हणून डोळयांत तेल घालून त्यांची रात्रंदिवस टेहळणी चाले. इतक्या कडक बंदोबस्तातून निसटणार तरी कसे ? याशिवाय सबंध तुरुंगा-भोवती ऊंचच्या ऊंच भरभक्कम विटांच्या भिंतीचा कोट उभा होता तो वेगळाच. आज येथे सर्व सुनं सुनं होतं. नीरव शांततेत आपलंच पाऊल वाजत होतं. भरल्या पोटी सर्व सुचत म्हणतात तसं कुतुहलाने एका उघडया खोलीत आत जाऊन काही क्षण बसून बघितलं. मस्त वाटलं.

नंतर सेंट्रल टॉवरचे सर्वात वरच्या निरीक्षण कक्षात गेलो. येथील गच्ची-वरून सेल्यूलर जेलचे आणि आसमंताचे समग्र दर्शन होते. स्वच्छ सूर्यप्रकाश, मागे पसरलेला गर्द नीळा, शांत, अथांग सागर, हिरव्या गडद नारळीने नटलेली धरती. आजच येथील निसर्गाचं रूप फारच विलोभनिय होतं. "इतक्या नयनरम्य वाता-वरणात त्या लोकांना कसा काय त्रास वाटत असावा ?" अरे आपल्या मनात 'हे' विचार. मी दचकलेच. डांस, दलदल, माशा, जळवांनी भरलेल्या पोर्ट ब्लेअरला त्यावेळी आजचे हे रूप असेल कां ? आणि असलेच तरी ते बघायला त्यांना कधीतरी या टॉवरचे वरती आणले गेले असेल कां ? त्यांनी येताना एकदाच बघितलेले आणि पुन्हा दर्शन होऊ न शकलेले समुद्राचे हे पाणी त्याचमुळे त्यांना नक्कीच काळे वाटले असणार. "शी, पण आपल्या मनात एवढे कोते विचार आलेच कसे" या विचारांत टॉवरचे पायऱ्या उतरत असताना पायरी चुकली आणि मी गडगडा खाली आले; जणू त्या क्रांतिकारकांच्या पुण्यात्म्यांना स्वतःच्या चुकीबद्दल दंडवत घालतच.

स्वा. सावरकरांना बऱ्याच वेळा ठेवत असलेल्या विंगसमोरच तेलघाणी पिसण्यासारख्या कष्टप्रद कामांसाठीच्या यंत्रशाळेची पत्र्याची शेड होती. प्रत्यक्ष वापरात असलेल्यापैकी शिल्लक असलेली फक्त एक घाणी येथे आहे. ही जाळीतून फक्त बाहेरून बघता आली. वरचा पत्रा उन्हाने कडाडून तापला असताना पिसाव्या लागणाऱ्या चक्कीपाशी पडलेल्या घामाचा दर्प आजही जाणवत होता.

स्वा. सावरकरांचे विंगमधील त्यांच्या खोलीच्या खालीच असलेल्या तळमजल्यावरील कडेच्या तीन खोल्या फांशी देण्यात येणार असलेल्या कैद्यांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या होत्या. या तीन खोल्या इतरांपासून भिंतीने मुद्दाम अलग केलेल्या दिसल्या. त्याचेच पुढे प्रत्यक्ष प्रत्यक्ष फांशी देण्याची जागा होती. एका वेळी तीन जणांना येथे फांशी द्यायची व्यवस्था करण्यात आलेली होती. सध्या हे सर्व अवशेष रूपानेच उभे आहे; कारण स्वातंत्र्यानंतर येथे एकाही माणसाला फांशी देण्यात आलेले नाही. आतापर्यंत नुसत्या ऐकलेल्या फांशीसंबंधीच्या दोर, लिव्हर, पितळी चकत्या, इ. गोष्टी प्रत्यक्ष जवळून बघायला मिळाल्या. या फांशी गेटाबाहेरच फटक्याचा स्टॅंड होता म्हणे. सेल्यूलर जेलचे मुख्य दरवाज्याचे वरच जेलरची खोली होती. तेथूनच मि. बारी आपले राज्य चालवित.

या सेल्यूलर जेलचा कण अन् कण तेथे घडलेल्या करूण कहाण्या जणू मूकपणे सांगत होता. स्वातंत्र्यवीरांनी आपल्या वास्तव्याने पावन केलेली आणि स्वकष्टाच्या घामांनी भिजविलेली ही वास्तू सोडताना मन भरून आले होते, पाऊल जड झाले होते.

सेल्यूलर जेलच्या दर्शनाने पांचव्या धाम यात्रेचे पुण्य मिळाल्यासारखे वाटले. राजबंदीवानांच्या भव्य, दिव्य त्यागाच्या काही खूणा आपण याची देही, याचि डोळा बघू शकलो, त्यांच्या स्मृतीला अभिवादन करू शकलो म्हणून धन्य वाटले.

मन तृप्त झाल्याने आता कुठेही जाऊ नये वाटत असले तरी अजून एक शेवटचे ठिकाण बाकी होते; ते म्हणजे ' फिशरीज् डिपार्टमेंट '. येथील मरीन म्युझियममध्ये अंदमानच्या समुद्रात सापडणाऱ्या मरीन लाईफचे ३५० हून जास्त प्रकार चांगल्या रितीने जतन करून ठेवण्यात आलेले आहेत. यांत नानाविध प्रकारचे मासे, शेल्स, कवड्या, इ. अनेक सागरी जीवांचे नमुने आढळतात. येथे ' रॉबर क्रॅब ' नावाचा एक प्रचंड मोठा खेकडा आढळतो. असं म्हणतात की हा खेकडा नारळाचे झाडावर सरसर वर चढून जाऊन नारळ सोलून, फोडून खातो. अंदमानच्या समुद्रात आढळणाऱ्या चित्र-विचित्र आकारांच्या कोरल्सचे या फिशरिज् डिपार्टमेंच्या प्रवेशद्वारापाशी मांडलेले प्रदर्शन आकर्षक वाटले.

टुरिस्ट डिपार्टमेंटतर्फे दुपारी कंडक्टेड टूरस् नसल्याचे गाईडने सांगितले. त्यामुळे जेऊन ताणून देण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. हातावर पाणी पडताच आकाशातूनही बरसात होण्याची लक्षणे दिसू लागली. आम्ही आराम करायला गेलो; तर विजय आणि श्री. कवठेकर रॉस आयलंडला जाण्यासाठीची परवानगी काढण्याचे मोहिमेवर बाहेर पडले.

' रॉस आयलंड ' ही ब्रिटिशांची पूर्वीची राजधानी. कोणी म्हणतात की आता हे बेट खचत आहे. म्हणूनच की काय पण या बेटावर लोकवस्तीस परवानगी नाही. हे बेट सध्या भारतीय नौदलाच्या ताब्यात असून त्यांचे परवानगीने तुम्ही तेथे काही तास जाऊन निसर्गाचा चमत्कार बघू शकता. मात्र तेथे जाण्यासाठी अनेक उलाढाल्या कराव्या लागतात.

प्रथम किती जण, कोणत्या दिवशी, किती वाजता, रॉस आयलंडला जाऊ इच्छितात ते सांगून इंडियन नेव्ही ( INS Jarwa ) कडून परवानगी काढावी लागते. नंतर हे परवाना पत्र दाखवून गव्हर्नमेंट डॉकयार्डचे जेट्टी मास्टरकडून बोट उपलब्ध असल्याची संमती घ्यावी लागते. त्यानंतर मरीन ऑफिसमध्ये जाऊन हार्बर मास्टरचे नावाने बोट सँक्शन करण्यासाठी अर्ज देऊन १०० रु. अॅडव्हान्स भरावा लागतो. एवढे सगळे सोपस्कार केल्यावर परमिशन लेटर मिळते; ज्यात तुम्हाला या बेटावर जायचे असल्यास कोणत्या अटी व नियम

पाळावे लागतील याचा प्रामुख्याने उल्लेख असतो. हे परवाना पत्र घेऊन तुम्ही रॉस आयलंडला जाणार असाल त्या दिवशी हार्बर ऑफीसरला भेटायचे.

आमची शुक्रवारी सकाळी आठ वाजताची परवानगी काढून 'हे' दोघे छत्र्या असूनही मुसळधार पावसामुळे पूर्ण भिजून परत आले.

विजयचे मनात बोटीने ३० पैशांत समुद्र क्रॉस करून पलीकडच्या बेटावरील (हॉपर आयलंड) जंगल तुडवून यायचे होते; परंतु बाहेर धो – धो पाऊस पडत असल्याने तो विचार रद्द करावा लागला. येथील टुरिस्ट डिपार्टमेंट 'अफ्टर लंच' प्रेक्षणीय स्थलदर्शनाच्या ट्रिप्स कां ठेवत नाहीत कोण जाणे? यामुळे लवकर अंधार पडत असल्याने लांबणारी संध्याकाळ अधिकच कंटाळवाणी होते.

आज मात्र आम्ही व्हिक्टरचे (टुरिस्ट होममधील टुरिस्ट डिपार्टमेंटचा माणूस) पाठीमागे लागून 'मॅन इन सर्च ऑफ मॅन' ही अंदमान–निकोबार बेटांवर रहाणाऱ्या वन्य जमातींचा जास्त जवळून शोध घेण्यासाठी (exploration) आखण्यात आलेल्या मोहिमेवरील अप्रतिम अशी डॉक्युमेंटरी पाहिली. या मोहिमेत सहभागी झालेल्यांचे अनुभव पहाताना अंगावर रोमांच उभे रहातात. अनेकदा या तुकडीतील लोकांनी दाखविलेले धाडस पाहून अंग शहारते.

अंदमान बेटांवरील आदीवासी जमाती नेग्रिटो वंशीय आहेत. आफ्रीकन निग्रोंप्रमाणेच काळे कुळकुळीत; बारीक कुरळे केस; तशीच चेहरेपट्टी. बायका पुरुषांमध्ये अत्यल्प फरक असलेले हे लोक अजूनही इतक्या अश्मयुगात वावरत आहेत की त्यापैकी कित्येकांना विस्तव कसा पेटवायचा हेही माहित नाही. एका जमातीचे वस्त्र म्हणजे कमरेला लटकविलेली फक्त एक गवताची जुडी.

दगडावर दगड घासून घासून विस्तव पेटविणारा, शिकार नुसती भाजून खाणारा, पोट दुखत असल्यास डुकराचे शेपटीतून रक्त काढून ते पोटाला चोळणारा, लग्नात शिंपल्याच्या वस्ताऱ्याने बायकोचे केस काढून टाकणारा, मधमाशांचे पोवळ्यांत हात घालून मध खाणारा, इत्यादी आदीवासींची विविध रुपे या लघुपटात पहायला मिळतात. यांतील काही जमाती सुधारलेल्या माणसाला अजूनही शत्रू समजतात. एका आदीवासी जमातीने या मोहिमेतील लोकांना आपल्या बेटावर उतरु न देता विषारी बाण मारून परतविले. त्यांच्या बाणांनी मोहिमेतील एक सदस्य जखमीही झाला. या वन्य जमातींशी अधिक जवळीक वाढविण्यासाठी बेटांवर निरनिराळ्या भेटी नेऊन ठेवणे, टेपरेकॉर्डवर म्युझिक वाजविणे, त्यांच्या सारखे नाचणे या सारख्या नाना क्लुप्त्या योजव्या लागल्या. त्यांच्याशी संपर्क साधण्यात भाषा ही सुद्धा प्रमुख अडचण होती.

निकोबारी आदीवासी मात्र आता इतके सुधारलेले आहेत की त्यांना 'आदीवासी' कां म्हणावे असा प्रश्न पडावा. हे लोक मंगोलीयन वंशीय असून

गौरवर्णीय, गोल, बसका चेहरा; चपटे नाक; बारीक डोळे या त्यांच्या ओळखीच्या खुणा.

गर्द झाडीने भरलेल्या मिट्ट काळोखात आदीवासींवरील हा लघुपट त्यांच्याच भूमीवर बघत असताना यांच्यापैकी एखादा अचानक येथे उपटेल की काय या कल्पनेने आगळीच भीतीयुक्त मजा वाटत होती. पोर्ट ब्लेअरला जाणाऱ्या प्रत्येकाने 'Man in search of Man' ही डॉक्युमेंटरी आवर्जुन पहावी.

डिपार्टमेंट ऑफ टुरिझम तर्फे अंदमान-निकोबार बेटासंबंधीचा अजून एक लघुपटही यावेळी आम्हाला दाखविण्यात आला. या दोन्ही लघुपटांचे आयोजन टुरिस्ट होमच्या सिटींग लाऊंजमधे करण्यात आले होते.

सिनेमा संपला तरी सातच वाजलेले. श्री. हर्षेना आल्या दिवशी एअर पोर्टवर भेटलो होतो तेवढेच. त्यानंतर त्यांची गाठच नव्हती म्हणून विमानतळाजवळील त्यांचे घरी जाऊन भेटून आलो. त्यांचे घराचा जीना उतरताना परत एकदा माझा पाय सटकला. सकाळी विचारांनी पायरी सोडल्याची अजून एकदा शिक्षा मिळाली.

● ●



▲ रॉस आयलंड


▼ वायपर आयलंड





▲ जाखांच्या वाटेवर

▼ फरार गंज



# निसर्गाच्या सानिध्यात
# ‘ चिडीया टापू ’
# ‘ कार्बिन्स कोव्ह ’

**आ**ज टुरिस्ट डिपार्टमेंट बरोबर जायचे होते चिडीया टापू आणि कार्बिन्स कोव्ह बीचवर. त्यांची छोटी मेटॅडॉर कालच्या इतकी उशीरा नाही तरी ९॥ वाजता उगवली. पहाटे पांच पासूनच उजाडत असूनही या साईट सिंअिग टूरस् इतक्या उशीरा सुरू करतात या बद्दल पुन्हा पुन्हा खंत वाटत होती. बसमधे आमच्या व्यतिरिक्त जर्मनीहून आलेला एक परदेशीय फक्त होता.

चिडीया टापूकडे जाणारा सर्वच रस्ताच पिकनिक रोड असून सुरूवातीला रस्त्याचे दोन्ही बाजूस नारळी, पोफळीची लागवड केलेली आहे. एके ठिकाणी नारळ काढण्याचे काम चालले होते. नारळाचा ढीग पडला होता; पण एखादा विकत द्यायलाही ते तयार नव्हते. जिथे पिकते तिथे विकत नाही म्हणतात ना ! या बागांचे रूपांतर हळू हळू दाट झाडीत होत गेले. फॉरेस्ट डिपार्टमेंटने जंगलाची लागवडही पद्धतशीरपणे केलेली दिसली. गवती चहाही खूप होता.

दक्षिण अंदमानचे दक्षिणेकडील या टोकाला ‘ पक्षांचे बेट ’ ( Birds Island ) असेही म्हणतात. चित्र-विचित्र, रंगी-बेरंगी, चिमकुले पक्षी इकडून तिकडे मुक्तपणे भरारत होते. भर जंगलातून मार्गक्रमणा करत आमची बस एका टेकडीवर येऊन थांबली. येथे फॉरेस्ट डिपार्टमेंटचे रेस्ट हाऊस आहे. मागे हिरवे गर्द वन, खाली किनाऱ्यावरील झाडांतून मार्ग काढत टेकडीशी शिवणापाणी खेळणारा समुद्र, समोर क्षणोक्षणी रंग बदलणारे क्षितिज. आलो तेव्हा स्वच्छ सूर्यप्रकाश होता. बघता बघता समोरील समुद्रावरील ढगांचे रंग डार्क निळे, जांभळे नि मग काळे झाले. आता बहुदा तेथे पाऊस पडत असावा. हिरव्या रंगात बसलेल्या या रेस्ट हाऊसचे ढोलीत एक दिवस मुक्काम करायला नक्कीच मजा येईल. पोर्ट ब्लेअर पासून तासाचे अंतरावर असलेले हे चिडीया टापू ठिकाण तेथील नयनरम्य बीच, पिकनिक स्पॉट आणि लाईन फिशिंगसाठी प्रसिद्ध आहे.

सबंध रस्ता बस सोडून पायी चालावे वाटणारा आहे. थोडे अंतर जमिनीला पाय लावला तेव्हाच येथील निसर्गाला खरा स्पर्श केल्याचे समाधान मिळाले.

'कार्बिन्स कोव्ह' हा पोर्ट ब्लेअरपासून फक्त ५ कि. मी. अंतरावर असलेला समुद्रस्नान आणि पिकनिक यासाठी सर्वोत्तम असा बीच. पुढे संथ, निळे पाणी; पाठीमागे नारळी. इतके नितळ पाणी पहाताच तो परदेशीय पटकन कपडे काढून पोहायला लागला देखील. आम्ही आपले निसर्गशोभा पहात, त्याचे फोटो काढत, दंग होऊन गेलो होतो. समोर दोन बेटे दिसत होती. कोळी लोकांचे दोन दोर ओढून जाळे बाहेर काढणे चालले होते. मऊशार वाळूत पायांवर लाटा घेत सगळा आसमंत निरखून होताच पुरुषांना पोहायची हुक्की आली. त्याआधी त्यांनी गाईडला अजून किती वेळ आहे ते विचारलेही होते. तरी ते पाण्यात शिरून जेमतेम पांच एक मिनिटे होत आहेत तोपर्यंतच गाईड "लवकर चला, मला दुपारी दुसरी ट्रिप आहे" म्हणून घाई करू लागला तर ड्रायव्हर सारखा हॉर्न वाजवून राहिला. दहा मिनिटांत त्यांना मुकाट बाहेर पडावे लागले.

या टुरिस्ट डिपार्टमेंटच्या लोकांचा चालूपणा चांगलाच लक्षात आला. कालपर्यंत आम्ही दुपारी कुठली ट्रिप नेत नाही म्हणत होते. आतापर्यंत एकदाही पैसे दिल्यावर तिकीट, पावती काही दिले नाही. गाईड वहीत काहीतरी नोंद करताना तेवढा दिसे. त्यांच्या मर्जीनुसार ते केव्हा, कुठे जायचे ते ठरविणार. किती विचित्र. काहीही गडबड, लांडी, लबाडी करायला कुरण मोकळेच की. गरजवंताला अक्कल नसते म्हणत बसमध्ये चढलो.

कार्बिन्स कोव्ह बीचवर सरकारी विश्रामधामही आहे. पण मुख्य शहरापासून लांब असल्याने ते एवढे सोइस्कर पडत नाही. वीक एण्डला आराम करायला मात्र हे निसर्गरम्य ठिकाण फारच छान आहे. येथे ट्रॅव्हल कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे 'अंदमान बीच रिसॉर्ट' हे तारांकीत हॉटेलही आहे; सुमारे ३५० रु. रोजी दराचे.

जेवताना विजयचे इकडे जाऊ, तिकडे जाऊ चालले होते. एवढ्यात ओला बबडी खाली मान घालून आला. सोबत तिथला स्वीपर. "काय झाले" विचारताच टुरिस्ट होमचे सिटींग लाऊंज समोर असलेल्या पाँडमधील मासे वाकून बघत असताना त्याचा पाय घसरल्याचे स्वीपरने सांगितले. आमचे नशीब बलवत्तर म्हणून त्याने बबडीला पटकन ओढून बाहेर काढले. दुपारी ले. शिंदेंनी डॉ. समर्थ या त्यांच्या वरिष्ठांकडे मुद्दाम भेटायला म्हणून तिघा पुरुषांना नेले; तेवढ्यात बबडीने थर्मोकोलची छोटी गोळी करून नाकांत घातली. लगेच लक्षात आलं म्हणून वरं झालं. पाचव्या धामयात्रेची पुण्याई आज सारखी कामाला येत होती.

शुक्रवार हा पोर्ट ब्लेअर येथील महाराष्ट्रीयन मंडळींचा भेटायचा दिवस या शुक्रवारी, उद्या, दिवाळी. घरोघरी लक्ष्मीपूजन म्हणून सुट्टी असल्याने श्री. हर्पेनी

आम्हाला आसपासच्या दोन-चार मराठी कुटुंबियांची ओळख करुन देण्यासाठी आज मुद्दाम स्टेट लायब्ररीपाशी बोलावले होते. त्यानंतर ले. शिंदेंकडे जेवायला जायचे होते.

टॅक्सी करुन तेथे गेलो. श्री हर्षे आमची वाट पहात थांबलेच होते. त्यांनी लगेच आम्हाला पाठीमागेच असलेल्या श्री. पंडीत यांचे घरी नेले. टुरिस्ट होमवर आम्ही पंडीतांचे गेस्ट म्हणून रहात असल्याने आपल्याला आसरा देणारे हे पंडीत आहेत तरी कोण हे बघण्याची आल्यापासून उत्सुकता लागून राहिली होती.

"या, या, बसा" हसतमुखाने स्वागत होताच आपुलकीचा वेगळेपणा जाणवला. हे श्री. डी. एस. पंडीत अंदमान-निकोबार गव्हर्नमेंटचे डेप्युटी डायरेक्टर ऑफ टुरिझम. माणूस फारच उमदा आणि दिलदार. टुरिस्ट डिपार्टमेंटवर आम्ही झाडलेल्या ताशेऱ्यांचे शांतपणे निरसन करुन आपली बाजू त्यांनी प्रभावी-पणे मांडली. हे पंडीत आमच्या डॉ. खळदकरांचे मामेभाऊच निघाल्याने जवळीक आणखी वाढली. एक मराठी माणूस आपल्या नवनव्या कल्पनांनी या अंदमानचे सौंदर्य आणखी खुलवू इच्छितोय या खुषीत पंडीत दांपत्याचा निरोप घेतला.

श्री. पंडीतांचे पलीकडेच रहात असलेले महाराष्ट्र मंडळाचे उपाध्यक्ष श्री. शरदचंद्र गुप्ते बाहेर गेल्याने भेटू शकले नाहीत म्हणून तडक ले. शिंदेंकडे जाण्या-साठी टॅक्सीचे दिशेने निघालो. वाटेत ॲबर्डीन बाजारात महाराष्ट्र मंडळाचे काही सभासद भेटले. त्यांच्याशी पांच मिनिटे गप्पा मारल्या. पोर्ट ब्लेअरमधे पर्यटकां-साठी वाजवी दरात रहाण्याची सोय सरकारी विश्रामधामाखेरीज इतरत्र नसल्याने येथील महाराष्ट्र मंडळ स्वतःची एक वास्तू बांधत आहे; जेथे स्थानिक मराठी माणसं सांस्कृतिक, सामाजिक वा धार्मिक कार्यक्रमानिमित्त कधीही एकत्र भेटू शकतील आणि बाहेरील हक्काने अल्प खर्चात उतरु शकतील. सध्या त्यांचा दोन मोठ्ठे डॉर्मेटरी टाईप हॉल बांधण्याचा संकल्प असून तळमजल्याचे बांधकाम पूर्ण होत आले आहे. बांधकाम निधि जसजसा जमत जाईल तसतशा हौशी पर्यटकांसाठी जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून द्यायची येथील महाराष्ट्र मंडळाची इच्छा आहे. त्यांच्या या योजनेला आपलाही थोडा हातभार लागावा म्हणून प्रत्येकी १०१ रु. श्री. हर्षेंकडे सुपुर्त केले.

शिंदे पती-पत्नी फारच अगत्याचे. एका अनोळखी प्रदेशातील घरेलु वाता-वरणात गप्पांचे साथीने जेवायला फारच मजा आली. रात्री इतक्या लांब टुरिस्ट होमवर जाण्याचा प्रश्न श्री. व्होरा यांनी गाडी पाठवून सोडवला. परप्रांतात एकमेकांना मदत करणारी मराठी मंडळी पाहून खूप बरं वाटलं.

● ●

# 'रॉस' 'वायपर' घोस्टी आयलंड्स्

साडे आठ वाजता रॉस, वायपर आयलंडस्ना जाण्यासाठी मरीन जेट्टीवर पोहोचायचे होते. टुरिस्ट होममधे तशा सारख्या टॅक्सीज् येतच असतात. त्यापैकी एखादी मिळेल म्हणत निघायला ८ वाजले. आज नशीब काही जोरावर नव्हते. रस्त्यात एकही टॅक्सी दिसली नाही. वन्-टू ची रपेट करत मरीन जेट्टीवर पोचायला जवळ जवळ नऊ वाजले. येथून टुरिस्ट होम हांकेच्या अंतरावर असल्यासारखे दिसत होते. हा समोरचा समुद्र क्रॉस करून टेकडी चढली की आलेच वाटणारे. वळणावळणाचे रस्त्याने यायला एवढा वेळ लागला. वाटलं स्वा. सावरकर असते तर क्षणार्धात समुद्रांत उडी टाकून पांच मिनिटांत पोहून आले असते.

आम्हाला मिळणार असणारी बोट फिशरी जेट्टीवर होती. ही जेट्टी टुरिस्ट होमपासून जास्त जवळ होती. उगाचच एवढी तंगडतोड केल्याबद्दल वाईट वाटले. पोर्ट ब्लेअरमधे अनेक जेट्टीज् असल्याने कुठल्या जेट्टीवर तुम्हाला बोट पाहिजे ते आधी लिहून द्यावे लागते. जेट्टी मास्टरने शिट्ट्या मारून बोटीला बोलावले. या मरीन जेट्टीवर 'यारवा' हे निकोबारला जाणारे मोठ्ठे प्रवासी जहाज उभे होते. ते परत आल्यावर बघायचे ठरवून रॉस आयलंडच्या त्या पिटुकल्या मोटर बोटीवर चढलो. आसमंतातील निसर्गशोभा पहाण्यासाठी म्हणून बोटीचे बाहेर बसायला एक बाक होता.

अर्ध्या तासातच जीर्ण, पडक्या इमारती असलेले बेट दिसू लागले. पोर्ट ब्लेअरचे उत्तरेकडे २०० एकर्स क्षेत्रफळ असलेल्या या 'रॉस आयलंड' वरूनच ब्रिटिशांचे काळात शासन चालविले जाई. सध्या येथे भारतीय नौदलाचे फक्त चार कर्मचारी रहातात. त्यांच्या अन्नादी दैनिक गरजेच्या वस्तूही पोर्ट ब्लेअरहून आणल्या जातात. तुम्ही या बेटावर काय करू शकता; काय नाही याचे परिपत्रक परवानगी देतानाच देण्यात आले होते; त्याची परत एकदा उजळणी तेथील नेव्हल ऑफिसरने केली.

संपूर्ण निसर्गावर सोडलेले हे रॉस आयलंड. त्यामध्ये ढवळाढवळ तुम्ही

बरोबर आत काही नेऊन वा तेथून बाहेर काही आणून करू शकत नाही. आमचा कॅमेराही लगेच ठेऊन घेण्यात आला या बेटाचे अंतर्गत सौंदर्य पहाण्यासाठी त्या ऑफिसरने दाखविल्या दिशेने आमची मार्गक्रमणा सुरू झाली. प्रथम दिसली ती तीन-चार टकामका बघणारी हरिणे.

हे बेट पूर्व-पश्चिम अशा भिंतीने दोन अर्ध्या भागात विभागलेले असून येथे नारळाची पद्धतशीर लागवड केलेली आहे. असंख्य नारळ खाली पडलेले होते. हे नारळ तुम्ही तेथेच खाऊ 'शकता; पण बरोबर कोयता नसल्याने ते फोडणार कसे ? यामुळे तोंडाला पाणी सुटवणाऱ्या त्या पाणीदार नारळांकडे दुर्लक्ष करत; मोठ्या लाल मुंग्यांनी भरलेल्या ओलसर जमिनीवरून लक्षपूर्वक पुढे चालू लागलो.

वरच्या भागात जाण्यासाठी पायऱ्या होत्या, पण त्या शेवाळ्याने भरलेल्या. जपून पाऊलं उचलत वर येऊन पोहोचलो. येथे मोठ तळं होत. एवढ्यात फड् फड् आवाज झाला आणि चक्क एक डौलदार मोर उडत तळं पार करून गेला. उडता मोर बघायचा योग प्रथमच येत होता. आणखी थोडे पुढे गेलो तो अति जीर्ण पण भव्य चर्च होते. भिंतींमधून गेलेल्या आणि आंतमधे लोंबकळणाऱ्या झाडांच्या मुळांनी जाळं विणून पूर्णपणे व्यापून टाकलेले दिसत होते. येथे शांतता इतकी भीषण होती की आपल्याच पावलांचा आवाज अंगावर शहारे आणत होता.

या बेटावरील सर्वच इमारती एके काळची शान मिरवत असलेल्या; पण आता संपूर्ण पडझड झालेल्या, काँक्रीटच्या. त्यांच्या भिंतीमधून झाडांची प्रचंड मुळे, खोडे, फांद्या वर जाऊन त्यांचे जंजाळ झालेले. येथील भयाण शांततेची खोली आणखीनच किरर् झाली ती 'ग्रेव्ह यार्ड' बघताच. आम्हा चौघांशिवाय आसपास कोणीही नव्हते. त्यातही दोन मुले. कवठेकर, पटवर्धनही दिसेनासे झाले. आंत जावे की नाही विचार करत धाडस करून आंत शिरलो तरी एखादी काळी सावली तर आपल्या मागून येत नाही ना या कुशंकेने मन चिंतेतच होते. अनेक थडगी होती. त्यापैकी एकावर 'जेम्स प्रॅट' हा 'हिज मास्टर्स इंडियन नेव्हल ब्रिगेड' मधील जवान या बेटावरील स्थानिक लोकांकडून २८ जाने. १८६३ रोजी वयाच्या २५ व्या वर्षी मारला गेल्याची नोंद होती. हे स्मारक त्याच्या बोटीवरील सहाध्यायांनी त्याच्या स्मृतिला आदरांजली वहाण्यासाठी बांधले हेही तेथे नमुद केलेले होते. या कोणा जेम्स प्रॅटचे म्हणे एका आदीवासी मुलीवर प्रेम जडले होते; ते तेथील स्थानिक लोकांना न आवडल्याने त्याचा खून करण्यात आला. हृदयाचे ठोके वाढलेल्या अवस्थेत बाहेर पडलो तो समोर १५-२० हरणांचा एक कळपचे कळप उभा. गोजिरवाणी हरणे, त्यांचा तो मखमली तपकीरी रंग, त्यावरील ठिपक्यांची नाजूक नक्षी पाहून "मज आणूनी द्या तो हरिण प्राणनाथा" असा सीतेसारखा आपणही हट्ट धरावा असा मोह झाला. मुक्तपणे हिंडणारी ती हरणांची टोळी पहाताच भीती कुठल्या कुठे पळाली.

आमची चाहूल लागताच ती हरणे तुरु तुरु पळून जाऊ लागली. आम्हीही त्यांचा दबकत पाठलाग सुरू केला. खाली झाडाची मुळे पसरलेली. पाला पाचोळा झाडायलाही येथे परवानगी नाही. सतत वरून पडणाऱ्या पावसाने जमिन निसरडी झालेली. त्यामुळे आस्ते कदम चालावे लागत होते. वाटेत जपानी लोकांनी बांधलेल्या कैद्यांसाठीच्या बराकी लागल्या. दुसऱ्या महायुद्धांत साडे तीन वर्षे ही बेटे जपानी लोकांच्या ताब्यात होती. पोर्ट ब्लेअरचे अगोदर 'रॉस आयलंड' असल्याने शत्रू राजधानीपर्यंत पोहोचण्याआधी पहिला मारा येथूनच होत असावा; त्यामुळे संरक्षणाचे दृष्टीने रॉस आयलंडचे अनन्यसाधारण महत्व आहे. याच कारणामुळे जपान्यांनी सेल्यूलर जेलचे विंग्ज फोडून ते दगड, वीटा, माती, येथे आणून त्याच्या दारुगोळा आणि कैदी ठेवण्यासाठी बराकी बांधल्या असाव्यात. या बराकी बघताना परत एकदा कैद्यांच्या अनन्वित छळाचे दृष्य नजरेसमोरून तरळून गेले आणि अंगावर कांटा उभा राहिला.

हरिणांचे कळपांचा आणि आमचा पाठशिवणीचा खेळ चालला असताना बोटीचा भोंगा वाजला. घाईने परतत असताना समोरच्या झाडीतून एक काळा-कभिन्न आदिवास्यासारखा दिसणारा माणूस वर येताना दिसला. आमचे पाय लटपटले. आमचा जेम्स प्रॅट होतो की काय ? एवढ्यात त्याच्या पाठोपाठ एक लुंगी नेसलेला मद्रासी तरातरा चालताना दिसला आणि आम्ही अडकलेला आवंढा गिळला. परत एक मोर फडफडत उडत गेला. दुसऱ्या एका ग्रुपला पोर्ट ब्लेअरहून घेऊन बोट आली होती. ती त्यांना तेथे सोडून आम्हाला 'वायपर आयलंडला' घेऊन जाणार होती.

लोप पावलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवाचे अवशेष दिसेनासे होईपर्यंत स्मृतिपटलावर कोरून घेतले. येथून वायपरला जायला सुमारे तासभर लागेल असे आधी सांगितले होते परंतु अवघ्या पंधरा मिनिटांतच बोट एका जेट्टीला लागली. इतक्या लवकर कसे काय पोहोचलो याचे आश्चर्य करत उतरायला लागलो. सहज लक्ष जेट्टीकडे गेले तो ती जेट्टी एका बाजूने पूर्ण कुजून तुटलेली. तिरक्या जेट्टीच्या भोसकांडी असलेल्या फळच्यांवरून जीव मुठीत घेऊनच कसंबसं जमिनीवर पाऊल टाकलं. चालायला सुरुवात केली खरी पण हे आयलंड काहीतरी वेगळंच दिसतंय ही शंका मनात होतीच. शेवटी बोट मास्टरला या आयलंडचे नांव विचारले. त्याने हे 'नॉर्थ बे आयलंड' असल्याचे सांगताच तत्क्षणी माघारी फिरलो. येथे ऊंचचे ऊंच दीपगृह आहे. ते बघण्यासाठी आम्हाला वेळ नव्हता. त्या झुलत्या जेट्टीच्या धड कडेवरून जायची कसरत परत एकदा देवाचे नांव घेऊन पार पाडली. सरकार अंदमानात एवढा पैसा खर्च करत असूनही कोणाच्याही जीवावर कधीही बेतणारी अशी ही जेट्टी सुस्थितित; किमान धोका नसलेल्या अवस्थेत तरी का ठेवता येऊ नये ?

वरती सूर्य आता चांगलाच तापू लागला होता. त्यामुळे बाहेर बाकावर बसवेना. नाईलाजास्तव इंजिन घरास लागून असलेल्या केबिनमधे घुसलो. येथे वसायला चांगली बाकं होती; पण इंजिनाचा आवाज एकमेकांचे बोलणेही न ऐकू येण्याइतका मोठ्याने होत होता. दार बंद करताच आवाज थोडा कमी झाला. केबिनच्या खिडकीतून पोर्ट ब्लेअरच्या एक एक जेट्टीज् आम्ही मागे टाकत होतो. येथे समुद्र अतिशय खोल असल्यामुळेच मोठमोठ्या बोटी किनाऱ्यापर्यंत आंत येऊ शकतात. चॅथमला 'm v. अंदमान' लागली होती; तर 'हैडो' वर 'हर्षवर्धन' ही छोटे गांवच वाटावे अशी संपूर्ण वातानुकुलीत बोट उभी होती. 'नानकौरी' ही अजून एक प्रवासी बोट भर समुद्रात नांगर टाकून होती. रॉस ते वायपर प्रवासात पोर्ट ब्लेअरच्या सागर सौदर्याची विविध रूपे बघायला मिळाली. येथिल सगळ्या जेट्टींवरून जाणारी मोटर बोट सर्व्हिसही आहे. ती दु. ३ ला फिशरी जेट्टीवरून निघून सं. ६-७ चे सुमारास परतते. ती घ्यायचा आमचा विचार होता, पण आज अनायसे सगळ्यांचे विनासायास दर्शन झाले.

पाऊण-एक तास आसमंत निरखण्यात कसा गेला ते कळलंही नाही. एका चिमुकल्या बेटावरील किनाऱ्यालगत असलेल्या टेकडीवर एक पुरातन इमारत दिसू लागली. हेच ते 'वायपर आयलंड' फक्त ६९ एकर्स क्षेत्रफळ असलेल्या या अर्ध-चंद्राकृति बेटाला 'वायपर' हे नांव तेथे पूर्वी भरपूर सापडत असलेल्या 'वायपर' जातीच्या सर्पांमुळे पडलं असावं. या बेटावर एके काळी स्थानिक तसेच मुख्य भूमीवरून आलेल्या कैद्यांसाठी सुसज्ज असा तुरुंग होता. फांशी देण्यासाठी छोट्या टेकडीवर खास सोय करण्यात आलेली होती. पोर्ट ब्लेअरला फांशी दिली तर इतर कैद्यांत गडबड निर्माण होऊ नये म्हणून शहरापासून दूर अशा या बेटावर फांशी देण्यात येत असावे. या फांशीच्या शिक्षेतून बायकांनाही सुट नव्हती.

जेट्टी खूपच चांगली होती. किनाऱ्याला लागूनच टेकाड आहे. खाली तुरुंगापैकी एक पडीक पडवीवजा इमारत असून तेथे कांही काळ पोलीस ठाणे होते. वाटेवर एक गाय बांधली होती. आतल्या बाजूला एक घरही दिसत होते. ती गाय जोरजोरांत हिसके देऊन दावण तोडण्याचा जीव खाऊन प्रयत्न करत होती. "पोरांना घेऊन पुढे जावे की नाही" मी बुचकळ्यात पडले. विजय तर केव्हाच टेकडीवर जाऊन "या बाजूने या" खुणावत होते. वाटेत गाय होती. जाणार कसं? एवढ्यात त्या गाईला दावण तोडण्यात यश आलं आणि ती आंत धूम पळून गेली. नशीब आमचं तिला आधी ओलांडून गेलो नाही, नाहीतर कदाचित तिच्या एकाद्या मुसंडीचा प्रसाद वधस्तंभ बघण्यासाठी खावा लागला असता. गाईची ब्याद सुटली तर त्या घरातील कुत्री भुंकायला लागली. आता यापैकी एखादा लचका तोडतोय की काय वाटू लागले. शेवटी विजयनी खाली येऊन बबडीला पाठुंगळी मारून वर नेले. टेकडीवर जायला पायवाट असली तरी ती गवताने भरलेली होती.

फांशी द्यायची इमारत आतून बघताना येथे किती निष्पाप लोकांना बळी दिले गेले असेल या कल्पनेने अंग शहराले; तर बाहेरील सभोवतालचे अवर्णनीय निसर्ग सौंदर्य बघताना भान हरपून गेले. एवढ्या मुक्त हस्ताने उधळलेल्या निसर्गात फांशीची क्रूर अंमलबजावणी कशी करत असतील कोण जाणे ? प्रेतंही न जाळता वा पुरता तशीच समुद्रात ढकलून देत म्हणे.

निसर्गायनमः म्हणून परत खाली निघालो. यावेळी पायरीवजा केलेली उतरण सापडली. हिरव्यागार शालूत लपेटलेले हे बेट पिकनिकसाठी फारच छान आहे.

फिशरी जेट्टीवर उतरून 'देवी कॅफेत' टॅक्सी न मिळाल्याने हाश्, हूश करत कसेतरी चालत गेलो तो त्याच्या दाराला कुलुप. दिवाळी म्हणून आसपासची सर्व हॉटेल्स बंद होती. टुरिस्ट होममधे सकाळी "जेवणार नाही" हे केवळ या 'देवी' वर भिस्त ठेऊनच सांगितले होते; आणि आता तिने चांगलाच प्रसाद दिला. टुरिस्ट होमला फोन करायचा प्रयत्न केला तर तो लागेनाच. अखेर विजयनी पोरांना घेऊन टॅक्सीने टुरिस्ट होमवर जायचे ठरविले; तेथे निदान ऑम्लेट ब्रेड तरी मिळेल या आशेने. बाकी आम्ही चालत बाजाराकडे निघालो. बाजारातीलही बरीचशी दुकाने बंदच होती. चांगले हॉटेलही उघडे दिसेना. आज शहाळी खाऊनच भूक भागवून घ्यावी लागणार वाटत असतानाच एका बऱ्यापैकी स्वच्छ हॉटेलचे दरवाजे उघडे दिसले आणि आम्ही पटकन आत शिरलो. 'राईस प्लेट' म्हणजे खरोखरच नुसता भात होता. एव्हाना काही दुकानांच्या फळ्या खुलू लागल्या. चौकशी करता बरीच दुकाने दुपारी बंद असतात तसेच शुक्रवारी बराचसा बाजार बंद असतो असे समजले.

तेथे असलेल्या शंख शिंपल्याच्या एका दुकानातून शिंपले, कानातील इअरिंग्ज, इ. बारीक सारीक वस्तू खरीदल्या. शेजारीच बाटाचे दुकान होते. अंदमानात सेल्स टॅक्स नसल्याने पादत्राणे थोडी स्वस्त मिळतात. श्री. कवठेकरांनी 'बाटा सॅंडक' ची खरेदी केली. जठराग्नी शमल्यावर बाकीच्याना थोड्या वामकुक्षीची गरज वाटू लागली. त्यामुळे टुरिस्ट होमवर परतण्याची बोली सुरू झाली. एकटीच कुठे भटकणार म्हणून मीही टॅक्सीत चढले.

पोरांना टुरिस्ट होमवर मस्त जेवायला मिळाल्याने त्यांनी आता ताणून दिली होती. संध्याकाळी आरामात कॉफीचे घुटके घेत डायनिंग हॉलमधे बसलो असताना शेजारचे टेबलवर बसलेल्या लोकांना सहज म्हणून शंख शिंपल्याच्या वस्तू कोठे मिळतील; जिरका टांगला कसे जायचे; किती पैसे पडतील, इ. अंदमानच्या विषयी विचारले. हा हा म्हणता गप्पा वाढल्या. "चला माझ्या बरोबर. टॅक्सी बाहेर उभीच आहे. मी तुम्हाला दुकाने दाखवतो." एका मध्यमवयीन, भारदस्त माणसाने आवर्जून बोलावताच पायात ताबडतोब चपला सरकावल्या.

एवढया आपुलकीने बोलावलेले हे गृहस्थ म्हणजे श्री. मुखर्जी; आमच्या टुरिस्ट होमचे इनचार्ज. मोठया कौतुकाने ते आम्हाला बंगाली क्लबमध्ये कालीपूजेसाठी उभारलेली कालीमातेची देखणी, आकर्षक मूर्ती दाखवायला घेऊन गेले. शिवाय रात्री होणाऱ्या कालीपूजेच्या सोहोळयासाठीही थांबण्याचा आग्रह करू लागले मध्यरात्री इतक्या लांब परत जायला वाहन मिळेल याची खात्री नसल्याने त्यांच्या आग्रहाला एकदम 'हो' म्हणणे जीवावर आले. "बघतो थांबता आलं तर" सांगून त्यांचा निरोप घेतला. समोर अजून एका दिव्यांच्या रोषणाईने सजविलेल्या काली मातेच्या मूर्तीपुढे रेकॉर्डस्चा धुमधडाका चालू होता.

या बंगाली क्लबचे आसपास अनेक शंख-शिंपल्यांची दुकाने दुकाने होती. श्री. मुखर्जींनी उजव्या बाजूचा शंख–जो दुर्मिळ असल्याने फार महाग असतो–घ्यायची शिफारस केली. 'किंग शेल' हा नावाप्रमाणेच प्रचंड मोठा. याची किंमत सुमारे ७५ रु. असली तरी हा किंग शेल म्हणजे अंदमानचे खास आकर्षण असल्याचे अनेकांनी सांगितले होते. लहान-मोठे शंख, शिंपल्यांच्या अंगठया, इअरिंग्ज, बांगडया, इ. एका दुकानातून खरीदले. मँगो शेल आकर्षक; अगदी आंब्याच्या रंगाचा, पण नाजूक आणि ४०–५० रु. किंमत. नेता नेता फुटला बिटला तर नको म्हणून त्याचा मोह टाळला. दुसऱ्या एका दुकानात समुद्रातून अगदी नुकताच काढलेला किंग शेल होता. त्याच्या ताजेपणाचा 'दु'र्गंध त्याच्या जवळही जाऊ देत नव्हता. त्याची १०० रु. किंमत ऐकताच प्रथम काढता पाय घेतला खरा पण दुसऱ्या कोणत्याही दुकानांत इतक्या चांगल्या लस्टरचा किंग शेल नसल्याने घासाघिस करून ८० रुपयाला त्याची खरेदी केली.

ॲबर्डीन बाजारामधे फटाक्यांची आतिषबाजी चालली होती. ॲटम्बॉम्ब, बाणांना चुकवत बबडीच्या चपला सापडत नसल्याने त्याच्यासाठी नवीन स्लिपर्स खरीदल्या. तेथील दारूकाम बघून पोरांनाही दारू उडवायची इच्छा झाली म्हणून थोडे फटाके आणि शोभेची दारूही घेतली. शंख-शिंपल्यांच्या ओझ्याने हात अवघडून आले होते त्यामुळे टॅक्सी मिळताच तडक टुरिस्ट होम गाठले.

मध्यरात्री आरडा ओरडयाने जाग आली. टुरिस्ट होमच्या पोर्चमधे तरुण पोरं दिवाळी साजरी करत होती. एवढयात एक बाण खिडकीतून आत घुसला. खिडकीला लागूनच नायलॉनची मच्छरदाणी असलेल्या कॉटवर बबडी आणि मी झोपलो होतो. आमचं नशीब बलवत्तर म्हणून तो बाण कोपऱ्यांत पडला. कालपासून तिसऱ्यांदा बबडीच्या जीवावरचे निभावले. जीवाशी खेळणारी ही दारू उडविताना लोकांनी थोडी तरी सद्सद्विवेक बुद्धी कां वापरू नये ?

• •

# जारवांच्या शोधात
# जिरका टांग

पोर्ट ब्लेअर पासून ५०–६० कि. मी. वर असलेले ' जिरका टांग ' हे सर्व सामान्य नागरिक जाऊ शकत असलेले शेवटचे ठिकाण. त्यापुढे घनदाट जंगल आणि ' जारवा ' या आदिवासी जमातीसाठीचा संरक्षित प्रदेश लागतो. जिरका टांगचे पुढे जायचे झाल्यास डी. एस्. पी. कडून खास परवानगी घ्यावी लागते म्हणजे सशस्त्र पोलीस बरोबर देण्यात येतात. तरीही स्वतःच्या जीवाची खात्री नाही. अल्पसंख्यांकांचा खास हक्क म्हणून या आदिवासींना कायद्याने संरक्षण दिलेले आहे. त्यांनी तुमच्यावर हल्ला केला तरी प्रत्युत्तर म्हणूनही तुम्ही त्यांना काहीही इजा करणे हा फौजदारी गुन्हा आहे.

अशा या निबिड अरण्यात राहणाऱ्या आदिवासींचे – जारवांचे – दर्शनाला जायची विजयची खरी मनापासून इच्छा. गेले दोन-तीन दिवस भेटेल त्या टॅक्सी-वाल्याला त्यांनी " जिरका टांगला येशील का ? जाऊन यायला किती वेळ लागतो ? किती पैसे घेशील ?" इत्यादी प्रश्नांनी पिंजून काढले होते. बहुतेकांनी ४०० ते ५०० रुपयांचे दरम्याने दर सांगितला. येवढे पैसे खर्च करावेत की नाही याचा थोडा विचार पडला होता. त्यांत अनेक लोक जारवांनी केलेल्या अत्याचाराच्या बातम्या सांगून राहिले होते "हे जारवा म्हणजे महा रानटी, मोटरचे टायर्स बाणांनी पंक्चर करतात. आपल्या पांढऱ्या शुभ्र दातांचे त्यांना फार आकर्षण. माणसे मारून दात काढून नेतात. मुला-बाळांना घेऊन जाताय म्हणून जरा काळजी. जायचेच असेल तर सकाळी लवकर निघा आणि दुपारचे आत परत या. "

जारवांसंबंधीच्या नानाविध हकिगती ऐकून मन कधी तरी, कुठे तरी एका कोपऱ्यात डळमळत होते. पण आतापर्यंत एकाही टॅक्सी वाल्याने " मी येणार नाही " असे न सांगितल्याने जिरका टांगला काहीही करून जायचे पक्के केले. आमच्या बाकीच्या तिघा सहाध्यायांना इतक्या लांब जाऊन केवळ हे जंगली जारवा बघण्यात येवढा खास रस वाटत नव्हता म्हणून टुरिस्ट डिपार्टमेंटचे गाडीने जोड ट्रिप करायची ठरविली. सकाळी वंडुर बीच, धनिखाडी डॅम सर्वांनी बरोबर

करून नंतर आम्ही फक्त चौघांनी पुढे जिरका टांगपर्यंत धडक मारून यायचे ठरवून टाकले.

वसला सकाळी लवकर बोलावल्याने आम्ही आवरून तयारच होतो. साडे आठ वाजता ड्रायव्हर एकटाच (गाईड शिवाय) मिनी बस घेऊन आला. तो इतरांना वंडुरबीच आणि धनिखाडी डॅम करून पोर्ट ब्लेअरला परत सोडायला तयार होईना. तसेच बसचा दरही डिझेलचे छोट्या मेटडॉरला ४ रु. कि. मी. सांगू लागला. शिवाय वेटींग चार्जेस् वेगळे. म्हणजे टॅक्सी पेक्षाही महागात जाणार होते. मुख्य भूमीपेक्षाही जास्त असा हा अवाजवी दर ऐकून आम्ही आपापसांत जावे की नाही चर्चा करू लागलो. टुरिस्ट डिपार्टमेंटचा हा दर संयुक्तिक आहे की नाही ते सांगायला कोणी अधिकारीही नव्हता. काय करावे प्रश्नच पडला. हा ड्रायव्हरही महाशिष्ट. पांच मिनिटेंही न थांबता आणि आम्हाला काहीही न सांगता सवरता चक्क निघून गेला. आम्ही वाऱ्यावर पडलो. आजचा अंदमानातील शेवटचा दिवस असल्याने काहीही करून ही उरलेली ठिकाणे आज बघायलाच पाहिजे होती. या टुरिस्ट डिपार्टमेंटचे ड्रायव्हर-गाईडचे मनावरच कुठे जायचे, काय काय दाखवायचे किती वेळ थांबायचे, किती दर लावायचा हे अवलंबून होते की काय कोण जाणे? म्हणूनच लहर लागेल तसे ते वागत होते. कधी कशाची पावती नाही. एवढ्या चांगल्या सुविधा सरकारने स्वस्तात उपलब्ध करून दिल्या असूनही या अशा काही विक्षिप्तांमुळे त्या सामान्य जनांपर्यंत पोहचू शकत नाहीत. एकदा वाटलं होत या ड्रायव्हर विरुद्ध तक्रार करावी; पण दिवाळी म्हणून सचिवालयही बंद होते.

गाडी तर निघून गेली. आता एखादी टॅक्सी तरी मिळते का ते बघायला पदयात्रा सुरू करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. आज नशीब जोरावर दिसत होते. चार पावले चालून जाताच एक टॅक्सी दिसली. चारशे रुपयात त्याने धनिखाडी डॅम, वंडुर बीच, जिरका टांग आणि सिप्पी घाट दाखविण्यासाठी यायची तयारी दाखविताच पटकन आत चढलो. अंदमान मधील मुक्कामाचा अखेरचा दिवस असल्याने अनेक कामे करायची होती; तीही जाता जाता टॅक्सीतून करायला ड्रायव्हरने मान्यता दिली.

जिरका टांगपर्यंत जायचे की नाही यावरून परत एकदा वादंग झाले; पण ते देवी कॅफेतील उदरभरणा नंतरच्या कॉफीच्या पेल्यातच संपवून हे 'व्हर्जिन' जंगल बघून यायचे ठरविले. विजय आणि कवठेकर जेट्टीवर जाऊन रॉस आयलंडला जाण्यासाठी दिलेल्या ॲडव्हान्सचा अकाऊंट सेटल् करून आले तर डॉ. पटवर्धन स्टेट बँकेत जाऊन टॅव्हलर्स चेक्स कॅश करून घेऊन आले.

येथील टुरिस्ट होम सरकारी असूनही तेथे स्टेट बँकेचे ट्रॅव्हलर्स चेक्स घेत नाहीत हे बघून आश्चर्य वाटले. इकडे स्टेट बँक मारे झोकात "प्रवासांत धोका पत्करून कॅश न नेता आमचे टॅव्हलर्स चेक्स घ्या" म्हणून जाहिरात करत असते

आणि इकडे दुसरे एक सरकारी खाते त्यांचेवर विश्वास ठेवायला तयार नाही. मुख्य भूमीवरही वरीचशी हॉटेल्स आपली स्वतःची बीले तेवढी या चेक्समध्ये स्विकारतात; परंतु ट्रॅव्हलर्स चेक्स घेऊन नुसती रोख रक्कम सहसा कोणी देत नाही हा स्वानुभव आहे. त्यातल्या त्यात स्टेट बँकेच्या ट्रॅव्हलर्स चेक्सना थोडीतरी किंमत असलेली आढळते. इतर राष्ट्रीकृत बँकांचे या प्रकारच्या चेक्सना कोणी (त्यांच्या शाखा सोडल्या तर) विचारत नाही.

अंदमानमधे वर्षभर वाहणाऱ्या अशा नद्या नाहीतच. पावसाचेच पाणी बांध घालून साठवले जायचे. हे पाणी कितीसे पुरणार. त्यामुळे उन्हाळ्यांत पिण्याच्या पाण्याचे फारच दुर्भिक्ष होऊन 'समुद्री चहुकडे पाणी, पिण्याला थेंबही नाही ' अशी अवस्था होत असे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी धरण बांधण्याचे ठरविण्यात आले आणि या कामाची जबाबदारी १९६७ मधे 'कोअर ऑफ इंजिनियर्स ' यांचेवर सुपुर्त करण्यात आली. १९६९ मधे पूर्व विभाग जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाची इंजिनियरींग डिव्हीजन, सेंट्रल वॉटर अँड पॉवर कमिशन आणि चीफ इंजिनियर, पोर्ट ब्लेअर (एम्. ई. एस्.) यांच्या संयुक्त सहकार्याने धरणासाठी योग्य जागा निवडायचे संशोधनास सुरुवात झाली. एम्. ई. एस्. ने २६४ लाख रुपये खर्चाच्या या पाणीपुरवठा प्रकल्पाचा संपूर्ण आराखडा तयार केला. मध्यवर्ती सरकारने १९७० मध्ये या योजनेला मान्यता दिली. प्रत्यक्ष बांधकामास सप्टेंबर १९७० मध्ये सुरुवात होऊन जून १९७३ मधे ते पूर्ण झाले. येथे स्थानिक कॉंट्रॅक्टर्स उपलब्ध नसल्याने बरेचसे काम डिपार्टमेंटलीच पार पाडण्यात आले. भारतीय सैनिक इंजिनियरींग ग्रुपला अभिमानास्पद वाटाव्या अशा या धनिखाडी ( Dhanikhari ) पाणी पुरवठा प्रकल्पाचे उद्‌घाटन ३० ऑक्टोबर १९७३ रोजी त्यावेळचे गृहराज्यमंत्री श्री. कृष्ण चंद्र पंत यांच्या हस्ते करण्यात आले. या डॅमची लांबी १३२ मिटर्स आणि ऊंची ३२.२५ मिटर्स असून त्यांत ४०७० लक्ष लिटर्स इतके पाणी साठवता येते. अशा या धनिखाडी डॅममधूनच सध्या पोर्ट ब्लेअर शहरास पाणी पुरवठा करण्यात येतो.

धनिखाडी धरणाचा आसमंत इतका विलोभनिय आहे की तेथेच मुक्काम टाकावासा वाटतो. धरणाचे भिंतीवरून समोर दिसणारा, चहू बाजूंनी गर्द हिरव्या झाडांनी लपेटलेला संथ, स्वच्छ, नितळ जलाशय भान हरपून टाकणारा आहे. धरणातून बाहेर पडणाऱ्या पाण्याच्या तळापर्यंत उतरायला शिडीवजा जीना होता, त्यावरून खाली उतरताच ओहोळाच्या कडेने असेच चालत जाऊन निबिड जंगलात लुप्त व्हावे असे वाटू लागले. शहरी प्रदुषणाचा स्पर्शही न झालेला, खऱ्या निसर्ग सौंदर्याने बहरलेला हा छोटेखानी धनिखाडी डॅम पोर्ट ब्लेअरला जाणाऱ्या प्रत्येकाने आवर्जून बघावाच.

त्या नयनमनोहर दृष्याकडे पाठ वळवत नव्हती. पुन्हा पुन्हा मागे वळून

पहात जड पावलाने बाहेर पडलो. टॅक्सी थोडेफार अंतर गेली असेल, नसेल तो गौरवर्ण, बसका चेहरा, चपटी नाके असे मंगोलीयन वंशीय दिसणारे बरेच लोक तेथील जंगलात मुक्काम टाकून असलेले दिसले. "येथेही ट्रेकिंगचे वेड दिसतंय. काय मजा येत असेल येथे रहायला" असे म्हणताच टॅक्सी ड्रायव्हरने ते पकडलेले कैदी असल्याचे सांगितले. ते ऐकून आश्चर्याचा धक्काच बसला. अनेक वेळा असे काही लोक गलबतातून येऊन कोणत्याही बेटावर मुक्काम टाकतात. अंदमान-निकोबार द्वीपसमुहात छोटी-मोठी ३०० चे वर बेटे असल्याने कोणी अगांतुक आले तर कळायलाही तसे अवघडच. या लोकांचा उद्देश हेरगिरी, आक्रमण, साहस, काहीही असला तरी पासपोर्ट, व्हिसा शिवाय अनैतिक मार्गाने ते तळ ठोकतात. मग त्यांना हुडकून, पकडून आणून असे खुल्या तुरुंगात ठेवले जाते. ही बेटे म्हणजे जणू भारताच्या संरक्षणाची पूर्वेकडील द्वारेच. आत्तापर्यंत यांच्या रक्षणाकडे भारत सरकारने येवढे खास लक्ष दिले नव्हते. पण 'फॉकलंड वॉर'च्या धडचाने आपले सरकार खडबडून जागे झाले आणि आता भारतीय नौदलाची एक पूर्ण डिव्हिजन येथे आणायचे सरकारने ठरविले आहे असे म्हणतात. काहीही असले तरी हिन्दी महासागरातील (बंगालचा उपसागर) भारताच्या संरक्षणाची, 'ही' पावनखिंड डोळयात तेल घालून नीट संभाळायलाच पाहिजे.

धनिखाडी डॅम पासून वंडुर बीचपर्यंतचे पुढील रस्त्यावर वाटेत रबराचे झाडांची पद्धतशीर लागवड केलेली दिमत होती. रस्त्याचे दोन्ही बाजूंना झाडी असली तरी जंगल येवढे दाट नाही.

पश्चिम किनाऱ्यावर पोर्ट ब्लेअरपासून मोटरने तासाचे अंतरावर असलेला 'वंडुर' हा बीच पिकनिक, शंख, शिपले, डायव्हिंग, फिशिंग साठी प्रसिद्ध असल्याने बऱ्याच टुरिस्ट बसेस आलेल्या होत्या. खाली उतरताच एका दुकानात कोरल्स विकायला ठेवलेली दिसली.

वंडुर बीच पासून जवळ ग्रब, रेडस्किन, जॉली बॉय ही आयलंडस् असून त्यांची कोरलससाठी ख्याती आहे. समुद्रात कोरल्स दिसतात. पोर्ट ब्लेअर येथील पंचतारांकित हॉटेल्समधे समुद्राचे खाली जाऊन स्वतः कोरल्स तोडण्याचा आनंद मिळविण्यासाठी खास ॲम्फिबियन ड्रेसेस् मिळतात. किनाऱ्यावर राहणाऱ्या कोळयांना या बेटांवर जाऊन येण्यासाठी काय घ्याल विचारताच त्यांनी 'रेड स्किन' आणि 'जॉली बॉय'ला अनुक्रमे १०० आणि ३०० रुपयांची मागणी केली. हा आकडा आणि बेटांचे थोडया फार फरकाने तेच सौंदर्य पहायचे तर जिरका टांग सारख्या जरा वेगळया भागात जायला वेळ उरणार नाही म्हणून तेथे जायचा विचार रद्द केला. शिवाय आमच्याकडे खास पोशाख नसल्याने पाण्यांत दिसणारी नुसती कोरल्स पाहुनच समाधान मानावे लागणार होते. सारासार विचारांती विकतच्या कोरल्सवर तहान भागवायची ठरवून टाकली.

दहा रुपयाला एक या सर्वसाधारण दराने लहान, मोठी विविध प्रकारची कोरल्स खरीदली.

नंतर बीचवर चक्कर टाकायला गेलो. सुरुवातीलाच कोळ्यांच्या झोपड्या असल्याने किनारा घाण झाला होता. त्यांत ओहोटी असल्याने बीचवर लाटांचे आक्रमण नव्हते त्यामुळे सगळीकडे एक उदासिन थंडाई भरून राहिली होती. लांबवर चक्कर टाकायला आमच्यापाशी वेळ नव्हता. या सगळ्यामुळे नील आयलंड पेक्षा हा बीच फारच डावा वाटला. शिवाय पोर्ट ब्लेअरपासून जवळ म्हणून पर्यटकही याची खराबी करण्यात हातभार लावत असतील.

परत निघालो तो रस्ता काही का चालले होते म्हणून उलटच्या दिशेने बंद होता. भल्या मोठ्या ट्रक्स, गाड्यांचे लांबणीमधून ड्रायव्हरने आमची गाडी कशी बशी बाहेर काढण्यात यश मिळविले. येवढ्यात वरुणराज अवतरले अन् सलामी देऊन थोड्याच वेळात पळाले देखील.

आता हळू हळू जंगल दाट होऊ लागले. रस्ता खूपच चांगला असला तरी विशेष वर्दळ नव्हती. बऱ्याच ठिकाणी रस्याचे कडेने शेती केलेली दिसत होती. इलेक्ट्रीसिटीही लहान सहान गावांपर्यंत पोचलेली दिसली.

वाटेत एका जागी ड्रायव्हरने टॅक्सी थांबवून "येथेच जारवांनी दोन वर्षांपूर्वी चार माणसे मारली" असे सांगताच काळजाचा ठोका चुकला. अंदमानच्या जंगलात वाघ-सिंहासारखी हिंस्त्र श्वापदे नसल्याने तशी भीती वाटत नाही. रानडुक्कर हाच येथील सर्वांत क्रूर प्राणी. पूर्वी सापही खूप आढळायचे म्हणे. आम्हाला मात्र आत्तापर्यंत एकही साप आडवा आला नव्हता. अनेक रंगीबेरंगी चिमुकले पक्षी गोड चिवचिवाट करून इकडून तिकडे उडत होते.

'जिरका टांग' पर्यंतचा सर्व रस्ताच 'सिनिक ड्राईव्ह' आहे. संपूच नये वाटण्या इतका नयनरम्य. क्षणोक्षणी निसर्गसौंदर्याचे नवनवीन दालन आमच्यापुढे खुले होत होते. प्रचंड मोठे वृक्ष, त्यांची खोडे वेलींनी संपूर्ण झाकून टाकलेली, तर खालची जमिन छोट्या झुडपांनी भरून गेलेली. अशा तीन टप्प्यांत दाटीने भरलेल्या वृक्षवेलींच्या संमेलनात आपणही सहभागी व्हावे म्हणून काही काळ टॅक्सी सोडून मातीला पाय लावले. दोन्ही बाजूला गर्द झाडीने भरलेल्या त्या रस्त्यावरून चालायला आगळीच मजा वाटत होती; पण वेळेच्या बंधनामुळे लवकरच चार चाकीचा आधार घ्यावा लागला.

वाटेत लागलेल्या एका गावांत गवताच्या आकर्षक झोपड्या बघून तेथे मुद्दाम थांबून फोटो काढायचा मोह आवरता आला नाही. गावांतील पोरांनी कुतुहलाने लगेच आमच्या टॅक्सीभोवती गराडा घातला. त्यांचाही फोटो काढताच पोरं पार खुष होऊन गेली; पण त्या गावाचे आणि त्यापैकी एकाचेही नांव विचारायचे

राहून गेल्याने त्यांची छबी ही केवळ आमच्या आल्बममधील कौतुकाचा विषय होऊन राहिली.

जिरका टांग पोस्ट नं. २ आले तेव्हा पुढे जाण्यास परवानगी नसल्याने थांबण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. आत्तापर्यंत वाटेत कुठेही एखाद्या जारवाची छायाही दिसली नव्हती. तेथील गावकऱ्यांना जारवांसंबंधी विचारताच त्यांनी पाठीमागे असलेल्या घनदाट अरण्याकडे बोट दाखविले. आम्हीही लगेच दुर्बिण सरसावून कुठे काळा ठिपका दिसतो का ते बघू लागलो. गावकऱ्यांनी सांगितले "हे जारवा थंडी वा पावसाळ्यांत कधीच जंगलाबाहेर येत नाहीत. उन्हाळ्यांतच त्यांना जंगलातील पाणी संपल्यास बाहेर पडावे लागते. जारवा हा कधीच एकटा दुकटा येत नाही. ते नेहमी टोळीने हिंडतात. ते आले की आम्ही घरात लपून बसतो. आम्ही त्यांना आणि ते आम्हाला घाबरतात."

हा भुलवणारा आसमंत सोडून परत फिरावेसे वाटत नव्हते. वेळेच्या बेड्या आपणच आपल्याभोवती आवळून घेतल्याबद्दल स्वत:चाच राग आला. सर्व बंधने झुगारून देऊन निसर्गाचे कुशीत पहुडण्याची स्वप्ने नजरे आड करून पोर्ट ब्लेअरचे वाटेला लागलो.

आदिवासीं समवेत कंदमुळे खाण्याचे नादात दुपारचे जेवणाला बुट्टीच घेतली होती याची आता जाणीव होऊ लागली. वाटेतील एका टपरीवजा हॉटेलमधील चहा समवेत बरोबर आणलेले च्याव-म्याव पदार्थ खाऊन पोटाला तात्पुरते शांत केले. निसर्गसौंदर्याचा नवीनच आविष्कार संध्याकाळच्या कलत्या उन्हात परत जाताना दिसत होता.

टॅक्सी खर्‌कन थांबताच "अरे पोर्ट ब्लेअर येवढ्यात कसे आले" म्हणत बघितले तो ते होते 'सिपिघाट फार्म'. पोर्ट ब्लेअर पासून १४ कि.मी. अंतरावर असलेले हे सरकारी कृषि संशोधन केंद्र ८० एकर्स जागेत पसरलेले आहे. वेग-वेगळ्या पीकांवर येथे संशोधन चालते. यांत बागायती आणि मसाल्याचे पदार्थां-चाही समावेश आहे. या बेटांवर मसाल्याचे पदार्थांचे लागवडीसाठी सध्या विशेष प्रचार मोहिम हाती घेण्यात आली आहे.

खाली उतरून बघतो तो हे केंद्र बघण्याची वेळ निघून गेलेली होती. तेथील वॉचमनला "आम्ही फार दूरून आलो आहोत" सांगताच त्याने ताबडतोब परवानगी तर दिलीच शिवाय स्वत: आमच्या बरोबर दाखवायला आला. रोज सकाळी ८ ते ११ दुपारी १२ ते २ आणि रविवारी स. ८ ते ११ हे सिपिघाट फार्म व्हिजिटर्ससाठी खुले असते.

शोभिवंत फुलझाडांनी स्वागत केले. आत जायचे रस्त्याचे दोन्ही कडांना सुपारीची तर आतील भागात निकोबारी टाईप बुटक्या नारळाची लागवड केलेली

दिसली. खरी उत्सुकता होती ती मसाल्याचे पदार्थांची झाडे बघण्यात; त्यामुळे तिकडे प्रथम धाव घेतली. लवंग, दालचिनी, जायफळ, तमालपत्र, काळी मिरी, इ. सर्व प्रकारचे मसाले लागले होते; पण ते अजून हिरवे असल्याने पानांचे वासावरूनच ओळख पटवावी लागत होती. प्रत्येक झाडाचे एक एक पान आठवण म्हणून बरोबर घेतले. इथे पिकणाऱ्या सर्व पदार्थांची विक्री करण्यात येते. सिझन नसल्याने आम्हाला मात्र एकही पीक विक्रीयोग्य अवस्थेत बघायला मिळाले नाही. अंदमानात आंब्याची झाडे अजिबातच कुठे दिसली नाहीत. कोकण-गोव्यासारखे हवामान असूनही येथे आंबा का होऊ नये कोण जाणे ? सिपिघाट फार्ममध्ये मात्र काही आंब्याची झाडे मुद्दाम लावण्यात आली असल्याचे समजले.

पोर्ट ब्लेअरमध्ये प्रवेश केला तेव्हा अंधारायला लागले होते. डॉ. पटवर्धनांनी एक लाकडाचा टीपॉय करायला टाकला होता; त्यांना त्या दुकानापाशी सोडून आम्ही मरीन जेट्टीवर उरलेले २७॥ रु. परत घ्यायला गेलो. जेट्टी मास्टर आमचीच वाट पहात मुद्दाम थांबून राहिला होता. येथे अजून खूपच प्रामाणिकपणा आढळतो. शहरी लांडया – लबाडया, भुरट्या चोऱ्या यांचा विशेष संसर्ग या बेटांना अजून झालेला नाही.

पुष्पदास हा आमच्या टॅक्सीचा ड्रायव्हर फारच चांगला माणूस होता. केरळातून टॅक्सी चालविण्यासाठी म्हणून येथे आलेला. त्याच्या स्वतःच्या दोन टॅक्सीज् होत्या. नाहीतर बरेचसे टॅक्सी ड्रायव्हर्स पगारी नोकर म्हणून टॅक्सी चालविताना आढळले. पगार तसा जास्त नसल्याने ते दारिद्र्य रेषेखालीच रहातात. पुष्पदासने ठरलेल्या बोलीपेक्षा अजून बऱ्याच ठिकाणी न कुरकुरता नेऊन आणले म्हणून त्याला खुषीखातर ५० रु. जास्त दिले. उद्या सकाळी विमानतळावर जाण्यासाठी न्यायला येण्याचे आश्वासन देऊन तो निघून गेला.

टुरिस्ट होममध्ये पाऊल ठेवतो तो श्री. अण्णा हर्षे आमच्याशी निखळ गप्पा मारण्यासाठी येऊन थांबलेले दिसले. श्री. हर्षे म्हणजे अंदमानचा विशेषतः सेल्यूलर जेलचा चालता, बोलता इतिहासच. केवळ स्वा. सावरकरांचे प्रेमापोटी त्यांनी हैद्राबादहून येथे बदली करवून घेऊन सेल्यूलर जेलचे १८ वर्षे ( १९६१ ते १९७९ ) मुख्य जेलर म्हणून काम केले. आता निवृत्तीनंतरही तेथेच स्थायिक होऊन त्यांनी समाजसेवेचे व्रत अंगिकारले आहे.

खरं म्हणजे आम्हाला श्री. हर्षेबरोबरच सेल्युलर जेल बघायची फार इच्छा होती, ते जमलं नाही. पण आजही त्यांनी १८५७ पासूनचा कैद्यांचा इतिहास इतका नजरेसमोर उभा केला की परत एकदा जेलची सफर घडली. थांबूच नये वाटणारी अण्णांची ओघवती वाणी; त्यात त्यांनी जीव ओतल्याने इंग्रज व जपान्यांनी केलेले पाशवी अत्याचार ऐकतानाही रक्त सळसळत होते, तर राजबंद्यांनी देशासाठी सोसलेल्या हालअपेष्टा ऐकून त्यांचेपुढे नतमस्तक व्हायला

होत होते. सेल्युलर जेलचे राष्ट्रीय स्मारक करण्याची कल्पना अमलात आणण्यात श्री. हर्षे यांचा सिंहाचा वाटा आहे.

सेल्युलर जेल बघितल्यापासून एक प्रश्न मनात सतत ठुसठुसत होता. त्या नाठाळाला आतल्या आत कितीही दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला तरी आज तो हर्षेंचेसमोर उफाळून तोंडावाटे बाहेर पडलाच. " काय हो, १३'×१०' फूटांची मागे व्हेंटिलेटर, पुढे जाळीचे दार त्यामुळे स्वच्छ उजेड असलेली प्रत्येक कैद्याला स्वतंत्र खोली असताना तिला अंधारकोठडी कां म्हणत ? आजकाल पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी यापेक्षाही लहान जागेत सर्व कुटुंबचे कुटुंब रहात आहेत" वाटलं अण्णा संतापतील. पण नाही, त्यांनी शांतपणे शंका निरसन केले. " वहिनी तुम्ही आजच्या या रंग दिलेल्या दारं उघडी असलेल्या खोल्या पाहिल्यात; पण जरा त्यावेळची परिस्थिती नजरेसमोर आणा. किर्र् जंगल, भयानक दलदल, डांस-जळवांचे आगर, मरेस्तोवर कष्टकारक कामे, खायला कदान्न, प्यायला अपुरे पाणी. आजच्या परिस्थितीतही अंदमानच्या उन्हाळयात तुम्ही या कॉंक्रीटच्या खोलीत पांच मिनिटे तरी बसून दाखवा आणि मग बघा कशा घामाच्या धारा लागतात ते "

अंदमानविषयीच्या आम्ही विचारलेल्या प्रश्नांची श्री. अण्णा हर्षे मोठ्या आत्मियतेने उत्तरे देत होते. विक्रम देशपांडे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक उत्साही तरुण कार्यकर्ता आम्ही पुण्याहून आलोत म्हणून मुद्दाम भेटायला आला होता. रंगात आलेल्या गप्पा सोडून उठवत नव्हते; पण दिवसभरच्या धावपळीने मुलं कंटाळली होती. शिवाय उद्या सकाळचे विमान गाठायचे असल्याने आवराआवरही करायची होती. या सगळ्यामुळे ही अविस्मरणीय बैठक आटोपती घ्यावी लागली.

थोडा थोडा म्हणता म्हणता सागर संपत्तीचा केवढा खजिना आम्ही जमा केला होता. आता या सर्वांना जपून पुण्यापर्यंत न्यायचे म्हणजे एक दिव्यकर्मच होते. मोठ्ठी कोरल्स व शंख कपड्यात गुंडाळून बॅगेत ठेवले. न जाणो विमान प्रवासात आपटाआपटीत फुटलेबिटले तर म्हणून नील आयलंडचे नाजूक शंख – शिंपल्यांना हँड बॅगेत जागा करून दिली. ही बॅग मात्र कायम हातात ठेवायला हवी होती. लक्ष देण्यासाठी जणू अजून एक लहान मुलच वाढले.

● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५३
ग्रा. क्र. २४३३३
२७५
ग्रंथ, शाखा (स्थळ प्रत)

# परतीच्या वाटेवर

बोलीप्रमाणे पुष्पदासची टॅक्सी सकाळी ७॥ वा. येऊन हजर झाली. टुरिस्ट होम मधील कर्मचारी वर्ग तसा खूपच चांगला होता. बवडी लाघवी म्हणून सगळ्यात लोकप्रिय. सर्वांनी त्याचा आवर्जून निरोप घेतला. अनेकांनी मद्रासला पोस्ट करण्यासाठी पत्रे दिली. बहुधा हिच येथून पत्रे लवकर पोचण्यासाठीची सोपी पद्धत असावी.

आठ दिवस हिरव्या जादूनगरीत भारावलेल्या अवस्थेत कसे गेले ते कळलंही नाही. आज परतीच्या वाटेवर पाऊल जड झालं होतं. या एक नोव्हेंबरपासून मद्रासहून आठवड्यातून दोनदा ( बुधवार, रविवार ) विमानसेवा सुरू झाल्याचे समजताच जास्त वाईट वाटले. याचा जर आधीच पत्ता लागता तर ८ ऐवजी १० – १२ दिवस तरी मुक्काम करता आला असता.

विमानतळावर गेलो आणि तसे थोडे आश्चर्यचकीतच व्हायला झाले. पोर्ट ब्लेअरला आलो तेव्हा दिसलेली ती मोडकळ टपरी फक्त येणाऱ्या प्रवाशांसाठीच होती येथून बाहेर जाणाऱ्यांसाठी छोटासा, टुमदार हॉल, त्यात बसायला प्लास्टीकच्या खुर्च्या होत्या. सेक्युरिटी चेकमधून आत गेल्यावर तर सोफासेटस्‌ही होते. आम्हाला निरोप द्यायला आठ दिवसांतील अनेक मित्रगण जमा झाले होते. आत्तापर्यंतचा पाहुणचार कमी पडला म्हणून की काय श्री. शिंदे दांपत्य आणि श्री. अण्णा हर्पे यांनी आमच्याबरोबर देण्यासाठी फराळाचे पदार्थही आणले होते. महाराष्ट्र मंडळाचे सर्वश्री पुरंदरे, शहाणे यासारखे बरेच कार्यकर्तेही आवर्जून आले होते. या सर्वांचा निरोप घेताना अगदी गहिवरून आले. एक उपसागरही केवढे प्रेम आणू शकतो. त्यासाठी सातासमुद्रापलीकडे जाऊन डॉलर्सच्या पैशापोटीचा प्रेमाचा उबाळा दाखविण्याची गरज नाही.

विमान वेळेत आले आणि उडालेही ठरल्यावेळीच. वर सूर्य तळपत होता. एका बाजूला ढगही गोळा होऊ लागले होते. त्यांचे पाणी बरसण्याआधीच निरोपांच्या अश्रूंनी ही पुनीत भूमी भिजवून टाकायला गर्दी केली. कासवाप्रमाणे पाण्यात दिसणारे पोर्ट ब्लेअर हळूहळू छोटे होत गेले. हिरव्या गालीच्याचे

ठिपक्यांत रुपांतर झाले ; आणि थोड्याच वेळात तो ठिपकाही नजरेआड झाला. आता खाली होते ते फक्त ढगांच्या पुंजक्यातून दिसणारे निळेशार पाणी.

विमानात बसायचा योग जोपर्यंत आला नव्हता तो पर्यंत विमानप्रवासाचे एक प्रकारचे आकर्षण माझ्या मनात होते. कोणी विमानातून जाणार म्हटले की माझ्याच अंगावर रोमांच उभे रहायचे. विमान प्रवाशांबद्दल एक प्रकारची असूया मनात घर करून बसायची; ते किती नशीबवान म्हणून. आणि आज बरेच वेळा विमानाने प्रवास केल्यानंतर 'विमान प्रवास' तोही इंडियन एअरलाईन्सने म्हटलं की कांटाच उभा राहतो. या आजच्या इंडियन एयरलाईन्सच्या बहुसंख्य 'हवाई सुंदरींना' त्यांची एक सुंदर साडी सोडली तर सुंदर कां म्हणावं याचा मला नेहमी संभ्रम पडतो. त्यापेक्षा त्यांना 'हवाई सेविका' कां म्हणू नये? बऱ्याचशा एअर होस्टेस दिसायला तर सुंदर नसतातच पण मनाने तरी असाव्यात, त्याचे नांवच नको. वागणे सदैव सौंदर्य सम्राज्ञीचे तोऱ्यात. बाकीचे प्रवासी जणू त्यांच्याच पैशाने प्रवास करत आहेत असा त्यांच्या बोलण्यातील गर्विष्ठपणा. जो त्यांच्याशी हाय् – हू, हाऊ क्यूट, थँक यू, करेल तोच फक्त चांगली सेवा मिळायला योग्य. स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे होऊनही अजूनही आपल्यावर इंग्रजांच्या रितिरिवाजांचा एवढा पगडा कां ?

अंदमानचा विमानप्रवास ही अनेकदा हौस न राहता गरजही होऊ शकते; कारण दहा दिवसातून एकदा बोट. तिलाही पोचायला तीन – चार दिवस लागतात. त्यामुळे तातडीने जायचे असल्यास पडेल ती किंमत मोजून विमानाचे पंखांचा आधार घ्यावाच लागतो. मद्रास – पोर्ट ब्लेअर विमान सेवा नुकतीच सुरू झाल्याने बरेचसे प्रवासी नवखे, आर्थिक स्थिती बेताचीच असलेले दिसत होते. त्यापैकी काही जण तर हौसेखातर मोठ्या काटकसरीने तिकीट काढूनही आले असतील. त्यांच्याशी वागण्यातील आजच्या एअर होस्टेसची तुच्छता तर बघवत नव्हती.

इंडियन एअर लाईन्सने प्रवास करताना खटकणारी अजून एक गोष्ट म्हणजे 'स्नॅक्स' देतानाची हवाई सुंदऱ्यांची वागणूक. शाकाहारी, मांसाहारी जी थाळी त्यांच्या हातात असेल तिच घेतली तर ठिक. बदली करून मागितली तर दुसऱ्यांदा आणलेली डिश "गिळा एकदा" या आविर्भावाने अनेकदा पुढे आदळली जाते. प्रवासी म्हणजे जणू हिच्या अन्नकोटाला आलेले आश्रितच. कलकत्ता-काठमांडू प्रवासात आमच्या सिटस् विमानाचे मध्यभागी होत्या. पुढून पाठीमागून देण्यात येणारी नॉनव्हेज डिश तर तेथे येईपर्यंत संपलीच. निदान व्हेजिटेरियन तरी प्रवाशांच्या नंबराप्रमाणे मोजून बरोबर असाव्यात ना, तेही नाही. इकडचा-तिकडचा पाव, केकचा तुकडा कसातरी जमवून पुढ्यांत ठेवण्यात आला. आज तरी काय पोर्ट ब्लेअर येथील बे-आयलंडच्या तारांकित हॉटेलचा काजवे दाखविणारा

ब्रेकफास्ट होता. नॉन व्हेजला काय तर उकडलेली दोन अंडी आणि व्हेजला पिठल्याचे केल्यासारखे वाटणारे दोन कटलेटस्.

काळ्या पाण्याचे ओढीने जाताना एवढी न जाणवलेली इंडियन एअर-लाइन्सची ही काळी बाजू आता काळं पाणी सोडून परतताना जास्तच खटकली. या लोकांवर कोणाचा काही चेक असतो की नाही काहीच कळत नाही. तासा-दोन तासासाठी तक्रार तरी कोण आणि कुठे करणार? परत बहुसंख्य प्रवासी उच्चभ्रू. आयुष्यात एखादे दुसरे वेळी प्रवास करणाऱ्यांकडे लक्ष तरी कोण देणार?

ब्रेकफास्ट घेत असतानाच 'तुमचे पट्टे आवळा' ही अक्षरे पाटीवर दिसू लागली. कुशंकेची पाल लगेच मनात चुकचुकली. वाटलं "झालं, आपली ही अनोखी ट्रिप आपल्या मित्र मैत्रिणींना सांगण्याआधीच आपण 'खाली' पडून 'वर' जाणार. आजूबाजूला धुसर ढगांचे आवरण होते. खालचे पाणीही दिसत नव्हते. कडकडून भूक लागली असूनही समोरचे खाणे जाईना. लगेच चहा कॉफीही आली. नंतर मिळणार नाही म्हणून खाणं संपायचं असूनही घेऊन ठेवावी लागली. जीव मुठीत घेऊन कसातरी वेळ काढला. जमिनीचा ठिपका दिसताच हायसं वाटलं.

मद्रासला स्वच्छ सूर्यप्रकाश होता. तेथे आल्यावर कळलं की आमचं विमान संपूर्ण वादळातून आले होते. त्यामानाने पायलटने फारच चांगले आणले. आजची आमची हवाई सुंदरी इतकी शिष्ट होती की प्रवासात तर ती सहकर्मचाऱ्यावरोबर आरामात गप्पा मारत खुर्चीवर बसून होती आणि आत्ताही प्रवासी उतरताना तोंडावर हास्याचा कृत्रिम मुखवटा घेऊन 'महाराजाफेम' नमस्कार करायलाही दारात थांबली नाही. सर्व प्रवाशांआधी स्व:त खाली उतरून मित्र मैत्रिणींच्या घोळक्यात लुप्त झाली "बा इंडियन एअर लाईन्स तुला सांष्टांग नमस्कार असो."

# जाता-येता
# 'मद्रास' 'कलकत्ता'

मद्रास मधील हॉटेल ब्लू स्टार इंटरनॅशनलवर दोन दिवसांसाठी तीन रुम्स राखून ठेवण्यासाठी मागच्या रविवारीच सांगून ठेवले होते; परंतु त्यांनी ॲडव्हान्स स्वीकारला नसल्याने नक्की जागा मिळते की नाही याविषयी थोडीशी धाकधुक होतीच. सामान ताब्यात मिळून तेथे पोचायला १२॥ वाजले. टॅक्सी लगेच मिळाली, पण येतानाचे पेक्षा पांच रुपये जास्तच म्हणजे ६५ रुपये मोजावे लागले.

'ब्लू स्टार इंटरनॅशनल' हे नांव मोठे आंतरराष्ट्रीय असले तरी आजूबाजूला सगळी गलीच्छ वस्ती होती. फुटपाथ गॅरेजेस् आणि त्यावरोबर तेथे रहाणाऱ्या लोकांनी व्यापलेले; तर रस्ते सांडपाण्याने भरलेले. सात वर्षांपूर्वी मद्रासला आलो होतो त्यावेळेपेक्षा आज झोपडपट्टीने सर्व शहराला जास्तच वेढून टाकलेले दिसत होते.

मद्रास सेंट्रल स्टेशनचे जवळ येवढाच फायदा या हॉटेलमधे रहाण्याचा होता. दर डबलरुमला रोजी ९० रु. या सभोवतीच्या वातावरणामुळेच लोक येथे येण्यापेक्षा अजून थोडे पैसे देऊन स्वच्छ वस्तीतील हॉटेलमधे रहाणे पसंत करत असावेत. म्हणूनच की काय आरामात जागा मिळाली. वऱ्याच रुम्स रिकाम्या होत्या. रुममधील अवस्थाही वाहेरील परिस्थिती पेक्षा काही वेगळी नव्हती. इंटर्नल टेलिफोन, म्युझिक चॅनेल्स, वॉर्ड रोब, सोफा, इ. सर्व सुखसोयी होत्या; पण एकही सुस्थितित नव्हती. 'लिफ्ट' आऊट ऑफ आर्डर; गिझर दुरुस्तीसाठी काढून नेलेला; फॅन फक्त हाय स्पिडमधेच गरगरत असलेला तर हि-फी म्युझिकच्या सात चॅनेल्सपैकी फक्त एकच चालू स्थितीत होते. गरज आम्हाला होती; त्यामुळे मुकाट आत शिरलो.

लगेच दुपारी एक वाजता याच हॉटेलतर्फे आयोजित केलेली मद्रास शहराची प्रेक्षणीय स्थलदर्शनाची ट्रिप होती. आम्ही एकदा सर्व वघीतले असल्याने आणि निरंजनला दगदग नको म्हणून आज या टूरच्या भानगडीत न पडता आजचा दिवस

आराम करुन उद्या त्यांची पक्षीतीर्थम्, कांचिपुरम्‌ची साईट सिंगिग टूर घ्यायचे ठरवून टाकले. डॉ. पटवर्धन व कवठेकर दांपत्य मात्र पटापट आवरून बाहेर पडले.

दुपारच्या विश्रांतीमुळे ताजेतवाने होऊन संध्याकाळी फिरायला बाहेर पडलो. रस्त्यावरुन पायी चालणे खरोखरीच मुष्कील हो तहोते. अडथळ्यांची शर्यंत कशी-वशी पार करून मंगळवारची परतीची रिझर्वेशन्स कन्फर्म करायला प्रथम स्टेशन गाठले, तो ती खिडकी रात्री ८-३० वा. उघडणार असल्याची पाटी दिसली.

आता येवढा वेळ स्टेशनचे आसपास भटकून काढावा म्हणून हिंडू लागलो. इतक्यात मद्रासचे प्रसिद्ध 'को-ऑपटेक्स'चा स्टॉल जवळच दिसताच त्यात घुसलो. फेस्टिव्हल ऑफर डिस्काऊंटचे आमिष तेथील खरेदी वाढवायला होतेच. खरं म्हणजे आजचा संपूर्ण दिवस आम्ही खास खरेदी करण्यासाठी राखून ठेवला होता; पण मद्रासमधील माऊंट रोडचा मुख्य बाजार रविवारी बंद असल्याने निराशा झाली. मद्रास सेंट्रल स्टेशनच्या आसपासची छोट्या स्टॉलमधील दुकाने मात्र उघडी होती. स्पेन्सरचे सर्व प्रकारचे ज्युसेस् भरपूर पिऊन घेतले. बॉटलींग केलेले हे मँगो, पाईन ॲपल, द्राक्षं, इ. चे ज्युसेस् फारच टेस्टी असतात.

परतीची रिझर्वेशन्स कनफर्मड् झाल्याने निर्धास्तपणे हॉटेलवर परतलो. जेवणासाठी ब्ल्यू स्टार इंटरनॅशनलमधे एक अेअर कंण्डीशण्ड् व एक साधे रेस्टॉरंट होते. वातानुकुलीता पंख्यानेच निर्माण केली होती. तरीही तेथे दर जास्त असल्या-मुळे सकाळी आणि आत्ताही आम्हीच फक्त त्यांचे गिऱ्हाईक दिसत होतो. जेवण बंडल असले तरी इडली, वडा, डोसा, इ. मद्रासी पदार्थ चविष्ट होते.

कवठेकर–पटवर्धन त्रयींची मद्रास दर्शनाची ट्रीप अगदी सो-सो च झाली. ती विशेष चांगली न वाटण्याची कारणे मद्रासची दुपारची गरम हवा; त्यात मिनी बस; आधिच्या प्रवासाचा थकवा ही असावीत. शिवाय गल्ल्या बोळांतूनच जास्त भटकवले म्हणे. या उलट मागिल वेळी आम्ही तामिळनाडू टुरिस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे बसने केलेली हिच ट्रीप फारच अविस्मरणीय झाली होती. मुख्य म्हणजे त्यांचे बरोबर प्रशिक्षित गाईडस् असतात. टी. टी. डी. सी. प्रमाणेच आय्. टी. डी सी. (इंडियन टुरिस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) च्याही कंडक्टेड् टुरस् असून त्याही चांगल्या असाव्यात. मद्रास शहरातील काही प्रमुख प्रेक्षणीय स्थळे पुढीलप्रमाणे .

**(१) फोर्ट सेंट जॉर्ज, सेंट मेरी चर्च आणि फोर्ट म्युझियम**

(माऊथ बीच रोड, मद्रास – ९)

फोर्ट सेंट जॉर्ज म्हणजे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने १६५३ साली चंद्रगिरीच्या राजाने लीजने दिलेल्या जमिनीवर बांधलेले व्यापारी केंद्र. लवकरच हे ठिकाण बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याचे प्रमुख सत्तास्थान झाले. येथेच रॉबर्ट क्लाईव्ह ईस्ट

इंडिया कंपनीत साधा क्लार्क म्हणून काम करत होता. जेव्हा हा किल्ला फ्रेंचांनी १७४६ मधे जिकून घेतला तेव्हा क्लाईव्ह तेथून जो निसटला तो दोन वर्षांनी विजयी ब्रिटिश सेनेचा आधिकारी म्हणूनच परत आला. या फोर्टच्या भोवतालीच आधुनिक मद्रास शहराची वाढ झाली आहे. या किल्ल्याचे आंतमधे जुन्या बरॅक्स आणि त्याकाळचे ऑफीसर्सच्या क्वार्टर्स दिसतात. यापैकी दोन घरांना ऐतिहासिक महत्त्व आहे. एक म्हणजे जेथे रॉबर्ट क्लाईव्ह रहात होता ते आणि दुसरे म्हणजे प्रथम कर्नल वेलस्ली व नंतर १७९८ मधे ड्यूक ऑफ वेलींग्टन रहात असलेले. सध्या या किल्ल्यातील इमारतींचा वापर सेक्रेटारिएट आणि लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या ऑफीसेस्साठी करण्यात येतो.

सेंट मेरी चर्च हे फोर्ट सेंट जॉर्जमधे असलेले भारतातील सर्वात जुने आंग्ल चर्च. या चर्चच्या उभारणीत ज्यांचा हातभार लागला त्यांच्यातील सर्वात प्रसिद्ध व्यक्ति म्हणजे एलीहु येल हा बोस्टनमधे जन्मलेल्या इंग्रज; जो प्रथम ईस्ट इंडिया कंपनीत कारकून होता आणि नंतर गव्हर्नर झाला. नशीब उदयाला आल्याने आपली काही संपत्ती त्याने परोपकारी कार्यासाठी दान केली. जुन्या काळच्या फोर्ट संबंधीच्या अनेक गोष्टी या चर्चमधे जपून ठेवलेल्या आहेत. हे चर्च जेव्हा बांधले तेव्हा ठेवण्यात आलेले काळचा ग्रनाइटचे तीर्थपात्र (font) आजही उपयोगात आणले जाते. वेदीवर लावलेले ३ मीटर्स × २.४ मीटर्सचे अनामिक कलाकाराने काढलेले पेंटींग हे लिओनार्डो दा व्हिन्सीचे 'लास्ट सपर' या चित्राची तंतोतंत कॉपी नसले तरी त्याच्याशी खूपच मिळते जुळते आहे. हे चित्र पाँडेचरीहून मद्रासला ब्रिटिशांनी तो प्रदेश १७६१ मध्ये काबीज केल्यानंतर आणले गेले.

फोर्ट म्युझियमला स्वतःचा असा प्रदीर्घ इतिहास आहे. एकेकाळी ईस्ट इंडिया कंपनीचे घाऊक व्यापाऱ्यांचे ठिकाण म्हणून हे ओळखले जाई. १९४८ मध्ये याचे म्युझियममधे रुपांतर करण्यात आले. जुन्या चर्चमधील १६८० नंतरचे बाप्तिस्मा, लग्न आणि पुरण्याच्या विधीसंबंधीचे बरेचसे रेकॉर्ड येथे जतन करून ठेवण्यात आलेले आहे. एलिहु येल आणि रॉबर्ट क्लाईव्ह यांच्या लग्नांची येथे नोंद आढळते. तसेच ईस्ट इंडिया कंपनीच्या इतिहासासंबंधीच्या अनेक गोप्टी येथे पहायला मिळतात. याशिवाय शस्त्रास्त्रे, पोशाख, नाणी, पदके, चायनावेअर यांचीही दालने येथे आहेत. हे म्युझियम दररोज ९ ते ५ पर्यंत उघडे असते.

(२) **गव्हर्नमेंट म्युझियम व आर्ट गॅलरी :** (पँथिऑन रोड, इग्मोर, मद्रास–८)

१८५१ मधे स्थापन झालेल्या या म्युझियममधे पुराणवस्तुशास्त्रासंबंधीच्या अनेक वस्तू बघायला मिळतात. यात पल्लव, छोला, पंड्या या राजघराण्यांनी राजाश्रय दिल्याने त्या काळात भरभराटीला आलेल्या अनेक कलाकृतींचे नमुने आहेत. तसेच दुसऱ्या शतकात अमरावती येथे असलेल्या बुद्धस्तुपातील खोदकामही

येथे जतन करून ठेवलेले आहे. ब्राँझ धातूच्या वस्तूंचा देशातील सर्वांत मोठा संग्रह या म्युझियममध्ये आढळतो. म्युझियमला जोडून प्रसिद्ध कोन्नेमारा लायब्ररी असून त्यात दुर्मिळ पुस्तके आणि रेकॉर्ड्स् उपलब्ध आहेत.

आर्ट गॅलरीत कलात्मक दृष्ट्या उच्च दर्जाची जुनी पेंटींग्ज आणि मॉडर्न आर्ट तसेच ब्राँझच्या कलाकृती यांचा संग्रह बघायला मिळतो. यांतील सगळ्यात उल्लेखनीय म्हणजे नटराजाची मूर्ती. ' राम-लक्ष्मण-सीता ' हेही लक्ष वेधून घेतात. अकराव्या शतकातील कारागिरांच्या उत्तोमत्तम कलाकृति येथे ठेवण्यात आलेल्या आहेत. राजपुत, मोगल आणि दक्षिणात्य पद्धतीची दुर्मिळ पेंटींग्जही येथे आढळतात. हे म्युझियम दर शुक्रवारी बंद असते.

(३) **मरीना बीच आणि अॅक्वेरियम**

जगात लांबीने नं. २ चा असलेला मरीना हा बीच एक सुंदर समुद्रकिनारा म्हणून ओळखला जातो. येथील मऊशार वाळूत बसून समुद्राची हवा चाखायला संध्याकाळी गर्दी उमळलेली असते. अंदमानात मिळणारे अनेक शंख-शिंपले येथे जास्त स्वस्त मिळतात. शार्क माशांच्या भीतीमुळे हा बीच माहितगाराशिवाय पोहायला तसा धोकादायक आहे. हे पोहण्याचे सुख तुम्ही तेथे असलेल्या मरीना स्विमिंग पुलवर लुटू शकता. या पोहण्याच्या तलावाला लागूनच छोटे मत्सालयही आहे.

(४) **कपालेश्वर आणि पार्थसारथी टेंपल्स :**

मायलापोर या देवळांनी व्यापलेल्या भागात कपालेश्वर हे जुने शिवमंदिर आहे. टिपिकल द्राविडीयन शिल्पशास्त्राचे दर्शन आणि अतिभव्य, सुंदर गोपूर हे याचे वैशिष्ट्य. याच ठिकाणी तामिळनाडूमधील थिरुवालुवार या कवीने आपले आयुष्य साधूवृत्तीने व्यतित करून अमोल काव्यरचना केल्या.

पार्थसारथी हे विष्णूचे मंदीर पल्लव राजांनी आठव्या शतकात बांधले असावे असे म्हणतात. नंतर विजयानगरच्या राजांनी त्याचा सोळाव्या शतकांत जीर्णोद्धार केला.

(५) **सॅन थॉम** :

सॅन थॉम हे नांव सेंट थॉमस पासून आले असावे. समुद्र किनाऱ्याला लागून असलेल्या नवनवीन हाऊसिंग कॉलनीज्नी हल्ली हा भाग गजबजला असला तरी ' सॅन थॉम कॅथेड्रल ' हेच येथील महत्त्वाचे जुने ठिकाण. सेंट थॉमस या ख्रिश्चन धर्मप्रसारकाला याच चर्चमध्ये पुरण्यात आले होते असे म्हणतात.

(६) **स्नेक पार्क** :

गिंडी पार्क येथे हे खूप मोठे सर्पोद्यान आहे. निरनिराळ्या तऱ्हेचे अनेक लहान-मोठे साप येथे पहायला मिळतात. दर शनिवारी संध्याकाळी सर्पांतून विष कसे काढतात याचे प्रात्यक्षिक येथे दाखविले जाते.

मद्रासमधील गिंडी भागातील सर्व परिसरच फार रमणीय आहे. याच ठिकाणी मुलांसाठीचा पार्क आहे; ज्याला लागूनच हरिणांची सँक्च्यूअरीही आहे.

**(७) मद्रास हायकोर्ट आणि लाईट हाऊस :**

फोर्ट आणि बंदराचे मधे मद्रास हायकोर्टाच्या सुंदर इमारती आहेत. इतर कोर्टस् आणि लॉ कॉलेजही या ठिकाणी आहे. याच हायकोर्टाचे इमारतींचे समुहात लाईट हाऊसही असून या लाईट हाऊसवरून शहराचे विहंगम दृष्य बघता येते.

**(८) वालुवर कोट्टम् :**

प्रसिद्ध तामिळ कवी वालुवर कोट्टम् यांचे स्मारक म्हणून एक अतिप्रचंड दगडाचा रथ बांधला असून त्यावर अप्रतिम कोरीव काम केलेले आहे. रथाचे खालील बाजू समोर एक खूप मोठे ऑडिटोरियम स्टेज, खुर्च्यांसकट असून वरच्या बाजूसमोर तळे आहे. रथाचे घुमटामधे या कवीचा पुतळा बसविलेला आहे.

याशिवाय मद्रास शहरात प्रत्येकाच्या आवडी-निवडी प्रमाणे इतर अनेक ठिकाणे बघण्यासारखी आहेत. थिऑसॉफिकल सोसायटीचे हेडक्वार्टर्स येथेच असून ते रविवार खेरीज रोज ठराविक वेळी उघडे असते. मद्रासचा माऊंट रोड हा मुंबईचे फोर्ट सारखा गजबजलेला व्यापारी भाग. येथेच वस्त्रप्रावरणे, हस्तकलेच्या वस्तू, जडजवाहीर, इ., जे पाहिजे ते तुमच्या बजेटप्रमाणे खरेदी करता येते. या माऊंट रोडवरच राजाजी हॉल असून स्वातंत्र्यपूर्वकाळात बऱ्याच गव्हर्नर्सचे हे सरकारी निवासस्थान होते. या हॉलचे भिंतींवर येथे राहून गेलेल्या महत्वाचे व्यक्तिंची पोर्टेटस् लावलेली आहेत. महाबलीपुरम्च्या रस्त्यावर असलेले मगरींचे पैदास केंद्र भेट देण्याजोगे आहे.

मद्रासहून पुढे पाँडेचरी, मदुराई, कोडाई कॅनॉल तंजावर, त्रिचनापल्ली, रामेश्वर, कन्याकुमारी, इ. अनेक ठिकाणी जाण्याचा प्रोग्रॅम वेळ असल्यास आखता येतो. तामिळनाडू टुरिस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशनतर्फेही अनेक पॅकेज टुरस्चे आयोजन करण्यात येते. या संबंधीची आधिक माहिती त्यांचे कडून पुढील पत्यावर मिळू शकते. Tamil Nadu Tourism Development Corporation Ltd., "Shivalaya Buildings", 16 Commander–in–Chief Road, Egmore, Madras 600105 ( Tel. Nos. Off. 89581/2/3, Sales Counter 849803, Grams : TAMILTOUR, Telex : MS 7575 ).

## महाबलीपुरम्, पक्षीतीर्थम्, कांचीपुरम् :

हॉटेल ब्ल्यू स्टारमधून निघणाऱ्या महाबलीपुरम् – पक्षीतीर्थम् – कांचीपुरम् या ट्रिपसाठीचे पैसे कालच भरून ठेवले होते. आमच्या सहाध्यायांचा कालच्या ट्रिपचा अनुभव एवढा चांगला नसल्याने आजच्या ट्रिप विषयी मन जरा साशंकच होते. सुरूवातही काही विशेष चांगली झाली नाही.

सकाळी ७।। वा. येणार म्हणून नाष्टा वगैरे आटपून तयार राहिलो तर बस उगवली ८।। चे पुढे. इतर प्रवासी आरामात बडिशेप चवळत येता येता तेथेच नऊ वाजून गेले. बसायच्या सिटस् फाटक्या असल्या तरी बस मोठी होती. आता तरी महाबलीपुरम्चे दिशेने ही चालू लागेल म्हणेपर्यंत तिने पटकन एका गल्लीत टर्न मारला. तेथील एका हॉटेलमधील थोडे प्रवासी आत चढले. मेन रोडला लागलो म्हणून जरा हायसं वाटलं. तेवढ्यात ती पुन्हा थबकली. कोणीतरी येणार होतं म्हणून ही आपली अर्ध्या तासाचे वर तिथेच उभी. थोडा आरडा-ओरडा केल्यावर ड्रायव्हर सुसाट निघाला. जरा थंड वारा लागतोय न लागतोय तोपर्यंत बसने परत पिछेमुड करून आधिचाच रस्ता गाठला आणि ब्ल्यू स्टार इंटरनॅशनल शेजारील एका टपरीवजा ऑफीसपाशी येऊन उभी राहिली. हे काय गौड बंगाल आहे ते कळेना. फक्त एवढाच उमगलं की जाहिरात केल्याप्रमाणे ब्ल्यू स्टार वाल्यांच्या स्वत:च्या बसेस नसून त्यांचे एका टुरिस्ट कंपनीशी फक्त काँट्रॅक्ट होते. हे समजेपर्यत खूप उशीर झाला होता. वाटलं "सकाळी पावणेसातला निघणाऱ्या टी. टी. डी. सी. च्या बसेस येव्हाना कुठल्या कुठे पोचल्या असतील. त्यांच्या-बरोबरच जायला हवे होते." यांना पैसेही देऊन बसल्याने आता फक्त चडफडण्या शिवाय काहीही गत्यंतर नव्हते. आसपासच्या गल्ली बोळातील सर्व हॉटेल्समधून दवंडी पिडवून बसमधील प्रवाशांचा कोटा जेव्हा पुरा झाला तेव्हांच आमच्या खऱ्या प्रवासास सुरूवात झाली. एव्हाना १०।। वाजले होते. टी. टी. डी. सी. राज्य सरकारी असल्याने कितीही कमी प्रवासी आले तरी (फारच तत्पर सेवा असल्याने असे क्वचितच होत असावे ) त्यांना तोटयाची काळजी नसते त्यामुळे त्यांच्या बसेस अगदी वक्तशीरपणे सुटतात.

मरीना बीच, असेंब्ली हॉल, इ. वरून मद्रास शहराचे आणि उपनगरांचे दर्शन घेत घेत आय. आय. टी. वरून बस शहराबाहेर पडली. वाटेत एका ठिकाणी पेट्रोल भरण्यासाठी म्हणून परत १५-२० मिनिटे वाया गेली. या उशीरामुळे आधी महाबलीपुरम्ला न थांबता पक्षीतीर्थम्कडे गाडी निघाली. नशीब संयोजकाला एवढी तरी सुबुद्धी सुचली, कारण पक्षीतीर्थम्ला पुजाऱ्याचे हातचा प्रसाद खाण्यासाठी रोज ठराविक वेळी म्हणजे सकाळी ११।। ते १२।। चे दरम्यान एक पक्षी येतो.

पक्षीतीर्थम् अथवा तीरुक्कालीकुद्रमचे देऊळ हे एका ऊंच टेकडीवर आहे याची तेथे जाईपर्यत कल्पना नव्हती. खालीच चपला काढून अनवाणी पायाने वर जावे लागते. याला असलेल्या पांचशेचे वर पायऱ्या बबडी चढून जाणे केवळ अशक्यच होते. त्याचेकडे बघून अनेकजण "पोराला कडेवर घेऊन जातो" म्हणून पाठीमागे लागले. डोलीचा अधिकृत दर माणशी १० रु. असला तरी हे लोक अव्वाचे सव्वा पैसे मागत होते. विजयनी त्यांचेकडे लक्षही न देता क्षणार्धात बबडीला पाठुंगळी मारून वर चढायला सुरुवात केली. वाटेतही अनेकजण अजून खूप वरती

जायचे असल्याचे सांगून मुलाला द्या म्हणून गळ घालत होते. विजयचं कसलेलं ट्रेकिंगचं शरीर असल्याने झपाझप चढत वर जाऊन पोहोचले सुद्धा. माझी स्वारी आपली डकाव् डकाव् करत मालगाडीच्या गतीने चालली होती. वाटेत पायरीगणिक भिकारी बसले होते. त्यामुळे वॉटर बॉटल, पर्ससारख्या सामना सकट एकटीने वाटेत थांबायचीही तशी थोडी भीतीच वाटत होती, न जाणो एखाद्याने पर्स हिसकावून घेतली तर या धास्तीने. एक अंधळा भिकारी म्हणत होता “बिविजी और वहोत उपर जाना है, सामान हमारे पास रख दो नही तो थक जाएगी”. डोळयांच्या खांचा झालेल्या याला आपल्या हातांतील सामान सुमान कसे काय दिसले याबद्दल आश्चर्य करत असता लक्षात आले की त्याच्या शेजारी बसलेला एक डोळस पायलट त्याला रनिंग कॉमेंट्री करत होता. डोक्यावर ऊन तळपत होते. एका घामेघुम क्षणी वाटलं आता वर जाऊच नये. पण एका अर्धांगाची चार वर्षांचे मुलाला पाठीवर घेऊन वर चढून जाण्याची जिद्द पाहून ही दुसरी अर्धांगी केवळ स्वतःही वर जाऊ शकत नाही याची मनोमन लाज वाटल्याने पुढे चढायला जोम आला. एक वळण घेतलं मात्र आणि समोर देऊळ दिसायला लागलं. म्हणजे वाटेतील भिकारी मुद्दामहून घाबरवत होते तर.

वरून दिसणारा संपूर्ण झाडीने भरलेला डोंगर आणि आसपासचा नयनरम्य निसर्ग पाहून दमणूक पार विसरायला झाली. या डोंगरावर शंकराचे देऊळ असून त्याच वास्तूत शेजारीच पार्वतीचे एक वेगळे मंदिर आहे. देवळासमोरील बाजूने खाली उतरल्यावर एका खडकापाशी खूप गर्दी जमली होती. चौकशी करता येथेच वर्षानुवर्षे रोज दुपारी काशीहून रामेश्वरकडे जाणारा पक्षी प्रसाद खायला येतो असे कळले.

टेकडीवरील अल्हाददायक वातावरणामुळे थोडा वेळ टकायला बरं वाटलं. बारा वाजताच पुजाऱ्याने पाट मांडला आणि प्रसादाचे पातेले शेजारी ठेऊन तो पाटावर बसून राहिला. येवढयात एक पांढरा शुभ्र, पिवळी चोच, असा गरुडाच्या जातीचा पक्षी त्या खडकावरून ऐटीत पावले टाकीत चालत येताना दिसला. पुजाऱ्याने दिलेला प्रसाद पांच-दहा मिनिटांत खाऊन तो आला तसा निघून गेला. एवढा मोठा जनसमुदाय श्वास रोखून त्या पक्षीराजाचे जेवण पहात होता. पूर्वी म्हणे पक्षांची जोडी येत असे. हा पक्षी पाळलेला असेल की नाही कोण जाणे पण तो फारच डौलदार मात्र आहे. पक्षी गेल्यावर तेथे खाली पडलेले प्रसादकण गोळा करायला भाविकांची उडालेली झुंबड पाहून त्यांच्या अंधश्रद्धाळूपणाची किव आली. माणसाला कष्टांची किंमत कळावी म्हणूनच की काय आपली बरीचशी श्रद्धास्थाने आपल्या पूर्वजांनी मोठ्या कल्पकतेने ऊंचावर वसविलेली आढळतात. देवदर्शनाचे निमित्ताने कां होईना पण अनायसे व्यायाम घडतो; शिवाय श्रमाचे महत्वही त्यामुळे पटते.

उतरणे तसे फारच सोपे होते. अंदमानातून अनेक शंख, शिपले आम्ही आणले असले तरी 'मँगो शेल' नावाचा आंब्याच्या रंगाचा शिपला त्याच्या नाजूकपणामुळे फुटेल की काय या भीतीने आणि अवाढव्य किमतीमुळे (४०-५०रु.) आणला नव्हता. काल डॉ. पटवर्धनांनी हाच शिपला मद्रासचे मरीना बीचवर ८-१० रु. ला मिळत असल्याचे सांगताच शॉकच बसला होता; आणि आज तर येथिल जवळ जवळ प्रत्येक साधू वा भिकारी या 'मँगो शेलचे' भांडे करून त्यांत भिक्षा मागताना दिसत होता.

टेकडीवर थंडगार स्पेन्सर ज्युसेस्च्या बाटल्या मिळत होत्या. खालती स्पेन्सरचे ज्युसेस् बरोबर इतर शीत पेये, शहाळीही विकायला बसली होती. दुपारचा एक वाजला होता. त्या छोटया खेडयात चांगले स्वच्छ हॉटेल मिळणे अवघडच होते; त्यामुळे थंडगार पेये पिऊन आणि बरोबरचे पदार्थ खाऊन पोट भरावे लागले.

धगधगत्या वातावरणांत आमची बस महाबलीपुरम्कडे धाऊ लागली. पावणे दोनचे सुमारास तेथे पोहोचल्यावर प्रथम लंचसाठी अर्धा तास देण्यात आला. हे अगोदर माहित नसल्याने आम्ही आधिच खाऊन घेतले होते. आता लगेच परत काय जेवायचे म्हणून इकडे तिकडे हिंडत, फोटो वगैरे काढण्यात वेळ काढला. २॥ वाजता सर्व लोक जमले. संयोजकाचे हा गाईड धर; त्याला सोड असे सुरु झाले. लहान सहान कंपन्यांबरोबर त्यांचा स्वतःचा गाईड नसल्याने जो स्वस्तात मिळेल त्यालाच कितपत येते हे न बघताच पकडले जाते.

महाबलीपुरम् हे मद्रासपासून फक्त ६० किलोमीटरवर असलेले अतिशय सुंदर आणि ऐतिहासिक दृष्टचा महत्वाचे ठिकाण. पल्लव राजघराण्याने १३०० वर्षांपूर्वी दक्षिण भारतातील बऱ्याचशा प्रदेशावर राज्य केले. त्यांनी आपली स्मृति मुख्यतः कांचीपुरम् (जी त्यांची राजधानी होती) आणि महाबलीपुरम् (हे त्यांचे मुख्य बंदर होते) या दोन ठिकाणी अप्रतिम कलाकृतिंचे रूपाने चिरंतन मागे ठेवली. ही महाबलीपुरम्ची शिल्पे खडकात खोदलेली आहेत. संपूर्ण दक्षिण भारतात आढळणाऱ्या द्राविडीयन आर्किटेक्चरचे सुरुवातीचे काळांतील हे नमुने. यांची चार प्रमुख प्रकारांत विभागणी करता येईल (१) लेण्यांसारखी देवळे (२) समुद्र-किनाऱ्यावरील देऊळ (३) एकसंध दगडातून खोदलेले रथ आणि (४) बाह्यगोल उठावाचे शिल्पकाम. ही पल्लव कला इ. स. ६०० ते ७५० मधे भरभराटीस आली होती.

प्रत्येक मंडपात वेगवेगळया प्रकारचे खोदकाम केलेले आहे. कृष्ण मंडपात कृष्णाने उचललेला गोवर्धन पर्वत, धो-धो पडणारा पाऊस, त्याखाली जमा झालेले वसुदेव, गोपी, इ. लोक. एके ठिकाणी विविध देशांची प्रतिके दाखविणारे इजिप्शियन स्फिंक्स, इंडियन लायन यासारखे प्राणी. तर आणखी एका बाजूचे भिंतीवर

एक बाजू हाताने झाकली असता दिसणारा हत्ती आणि हात काढताच गाय वासराला वात्सल्याने पाजत असल्याचे दृष्य. एका मंडपात कोरीव काम नसलेल्या नुसत्याच चार खोल्या होत्या. या पांडवांच्या बेडरुम्स असल्याचे गाईडने सांगितले. अर्जुन तपस्येला बसला असल्याने त्याची शयनखोली दाखविलेली नाही. शेजारीच एका २७ मिटर्स लांब आणि ९ मिटर्स ऊंच अशा प्रचंड खडकावर अर्जुनाची तपस्या खोदलेली आहे. हे येथिल सर्वांत मोठे शिल्प. बारा वर्षे अर्जुनाने तपस्या केली म्हणे. पांडव येथे प्रत्यक्षात कधीच आले नव्हते. केवळ कल्पनेनेच ही सर्व शिल्पे कोरलेली आहेत.

जवळच एक बॅलन्सिग रॉक असून याला कृष्णाचा लोण्याचा गोळाही म्हणतात. आता पडेल की काय वाटणारा असा एक प्रचंड गोल दगड एका खडकाचे उतरणीवर वर्षानुवर्षे उभा आहे.

अजून एके ठिकाणच्या मंडपात दुर्गादेवी महिषासुराचा वध करताना दाखविण्यात आली आहे.

आम्हाला नंतर महाबलीपुरम् बीचला नेण्यात आले. समुद्राच्या लाटा अंगावर घेत उभे असलेले हे निसर्गरम्य तीर्थस्थान. या शिल्पांत कोरीवकाम तसे कमी आहे. एका देवळात १६ फूट लांबीची विष्णूची आडवी मूर्ती आहे. टी. टी. डी. सी. चे रेस्ट हाऊसच्या छोटया कॉटेजेस् समुद्रकिनारी आहेत. मद्रास शहराच्या गजबजाटांत रहाण्यापेक्षा येथिल शांत निसर्गाचे सानिध्यात येऊन रहायचे मागील ट्रिपमधे ठरवून ठेवले होते. आज बसमधून खाली उतरतो तो चोरटया आयातीचा माल विकणाऱ्या फेरीवाल्यांनी घेराव घातला. सबंध महाबलीपुरम् आणि पक्षी-तीर्थम् सारख्या तीर्थस्थानीही चोरटा माल विकणाऱ्यांचे पेव फुटल्यासारखे झाले होते. आणि हा माल तरी काय तर सौंदर्यप्रसाधने, पर्सेस, पेन्स, कॅसेटस्, सेंटस् इ. वस्तू ज्या भारतातही चांगल्या दर्जाच्या उपलब्ध आहेत. बरोबरचे बरेच लोक आपल्या पूर्वजांनी निर्मिलेल्या आश्चर्यजनक कलाकृति बघण्याऐवजी याच फेरी-वाल्यांशी भावाची घासाघिस करण्यात रममाण झालेले पाहून खेद वाटला.

बीचवरून गेलो ते पांच पांडवांचे आणि द्रोपदीचा रथ एका दगडातून जेथे कोरलेले आहेत ते पहायला. एक एक रथ म्हणजे एक छोटे लेण्यासारखे देऊळच. हे रथ म्हणजे महाबलीपुरम्चे प्रमुख आकर्षण. एक अजस्त्र हत्तीही तेथे कोरलेला आहे.

तसे सबंध महाबलीपुरम् हे गांवच लहान-मोठया खोदकामांनी भरलेले आहे. परंतु येथिल बरीचशी शिल्पे अपूर्ण वाटतात. आजही तेथे मिळणाऱ्या दगडावर कोरीव काम करणारे अनेक कारागिर या गावांत आहेत. त्यामुळे दगडाच्या विविध प्रकारच्या मूर्ती जागोजागी विक्रीसाठी ठेवलेल्या दिसतात.

दुपारचे साडेतीन वाजून गेले होते. कांचीपुरम् पर्यंतचे दोन तासांचे प्रवासांत तामिळनाडूच्या रमणीय अंतःर्गत भागाचे दर्शन झाले. रंगीत सांडपाण्याची गटारे दिसू लागताच कांचीपुरम् जवळ आल्याचे कळले. बरेच ठिकाणी सूतही वाळत घातलेले दिसत होते.

कांचीपुरम् हे तामिळनाडूतील मोठे व्यापारी केंद्र मद्रासपासून ८५ कि. मी. वर हे असून ते देवळांसाठी आणि हातमागाच्या सिल्क साड्यांसाठी प्रसिद्ध आहे. येथे नऊ मोठी आणि अनेक लहान देवळे असून त्यापैकी काही १००० वर्षांची जुनी असल्याचे सांगण्यात येते. सगळ्यात जुने असे कैलासनाथाचे मंदीर १२०० वर्षांपूर्वी बांधलेले असून त्यानंतर ५० वर्षांनी वैकुंठ पेरुमलचे मंदीर बांधले गेले. येथील आणखी महत्त्वाची मंदीरे म्हणजे एकांबरेश्वर आणि कामाक्षी. या मंदीरांचा-विशेष म्हणजे त्यांची प्रचंड ऊंचीची गोपुरे; जी सर्वच दाक्षिणात्य मंदीरांची वेगळी विशेषता दर्शवितात. ही मंदीरे पल्लव, नरसिंहवर्मन, नंदीवर्मन, आणि विजयनगरचा ख्यातनाम राजा कृष्णदेवराय यांचे काळांत बांधली गेली.

पांच वाजता विष्णूकांची मंदीराजवळ पोहोचलो. कॅमेऱ्यात न मावणारे ऊंचचे उंच गोपूर आणि देवालयाभोवतालची प्रचंड भिंत यांनी प्रथमदर्शनी नजर खेचून घेतली. येथे आत जाताना कोणी गाईड देण्यात आला नाही; त्यामुळे आंतील लहान मोठ्या मंदिरांची माहिती कळू शकली नाही. आंत पाण्याचे मोठे कुंड होते. एका देवळात सोन्याची पाल होती. ५० पैसे देऊन या पालीला हात लावला असता खऱ्या पालीपासून जन्मभर संरक्षण मिळते अशी भाविकांची श्रद्धा आहे. देवालयाचे बाहेर शहाळी विकायला होती तसेच १० पैसे देऊन स्वच्छ संडास, मोऱ्या होत्या. तामिळनाडूचे हे एक खास वैशिष्टय म्हणता येईल की अनेक सार्वजनिक ठिकाणी पैसे घेऊन स्वच्छता गृहांची सोय केलेली आढळते.

या विष्णुकांचीचे मंदिराचे आसपास एकही साड्यांचे दुकान दिसले नाही. "साड्यांसाठी भारतभर प्रसिद्ध असलेल्या या ठिकाणी साड्या विकत मिळत नाहीत कां?" असे बसच्या व्यवस्थापकाला विचारताच त्याने उशीर झाल्याने साडीच्या एका मोठ्या दुकानापाशी फक्त पांच मिनिटे थांबायचे मान्य केले. त्या दुकानातील आकर्षक रंग संगतीतील विविध प्रकारच्या साड्या बघताना कुठली घ्यावी अन् कुठली ठेवावी असे होऊन गेले. समोर दिसलेल्या साडीपैकी 'एक' कांचीपुरम्ची आठवण म्हणून बांधून घेतली.

शहराचे मध्यभागातून बस जाऊन शिवकांची मंदिराजवळ थांबली तोपर्यंत अंधार झाला होता. त्यामुळे या मंदीराच्या भव्य गोपूराचा फोटो सुद्धा काढता आला नाही. येथे हातमागाच्या साड्यांची खूप लहान लहान दुकाने होती. काही सहप्रवासी लगेच त्यांत घुसले. आम्ही तातडीने मंदिराचे अवाढव्य दारातून आत धावलो. या देवालयाभोवतीही उंच भिंतीचा तट आहे. देवळाचे प्रत्यक्ष आंतील

भागांत जायला तिकीट होते. गाभारा बंद होता. तो उघडण्यासाठी सुदैवाने फार वेळ प्रतीक्षा करावी लागली नाही. बरोबर गाईड नसल्याने या देवालयाचे महात्म्य समजावून न घेता नुसतीच भव्य कलाकुसर पाहून समाधान मानावे लागले ही रुखरुख मनांत ठेऊन बाहेर पडलो.

मिट्ट काळोखांत मद्रासच्या दिशेने आमचा प्रवास सुरु झाला. बाहेरील अंधारामुळे संपूर्ण ट्रिपच्या सुखद आठवणी परत परत आठवून वेळ काढला. नशीब आमचे चांगले म्हणून बसने वाटेत दगा दिला नाही; त्यामुळे रात्री ९ वाजता आम्ही ब्ल्यू स्टार इंटरनॅशनलवर होतो.

" मोठ्या जिद्दीने अंदमानला गेलो; तेथील विलोभनिय निसर्ग सौंदर्य बघितले, उपभोगले; आणि आम्ही भारावून गेलो " अशी अंदमान संबंधीची प्रतिमा पुण्याला परतताना हृदयांत घर करून होती.

## कलकत्ता

अंदमानला मद्रासप्रमाणे कलकत्याहूनही जाता येते. पुण्याहून मद्रास कलकत्यापेक्षा जास्त जवळ, शिवाय गाड्यांची अदलाबदली नाही म्हणून जास्त सोईस्कर पडते. कोणी मद्रास-पोर्ट ब्लेअर-कलकत्ता किंवा कलकत्ता-पोर्ट-ब्लेअर-मद्रास अशी राऊंड ट्रिपही आखू शकेल. खुद्द कलकत्ता शहरातील प्रेक्षणीय स्थळांची माहिती मुद्दाम खाली दिली आहे.

कलकत्याला गेल्यावर मुक्काम कुठे करायचा हा प्रश्न निदान महाराष्ट्रीयांना तरी पडू नये. कलकत्याचे ' महाराष्ट्र निवास ' म्हणजे मराठी माणसाचे माहेरघरच. हावरा स्टेशनवर कोणत्याही टॅक्सीवाल्याला महाराष्ट्र निवास, हजरा रोड सांगितले की टॅक्सी अचूक निवासाचे दारात येऊन उभी राहते. स्टेशन पासून ' हे ' थोडे दूर असले तरी एकदा तेथे पोहोचल्यावर तुम्हाला कशाचीही काळजी करावी लागत नाही. समोरासमोर उभ्या असलेल्या दोन तीन मजली इमारतींत १५० लोकांची सोय होत असली तरी आयत्यावेळी गेले तरी सहसा कोणाला " जागा नाही " म्हणून विन्मुख परतविले जात नाही. वेळ पडली तर सभागृह, त्याचा रंगमंच, प्रसंगी व्हऱ्यांड्यातही पथारी पसरण्यापुरती का होईना पण जागा करून दिली जाते. पुण्या-मुंबई सारख्या ठिकाणाहून डायरेक्ट फोन करून अथवा पत्र पाठवून तुम्ही रूमचे रिझर्वेशन करू शकता (पत्ता १५ हजरा रोड, कलकत्ता ७०००२६ फोन नं. ४७-४५३२, ४७-००७१ Gram : MAHANIWAS ) पत्रोत्तरही तुम्हाला लगेच येईल; पण गर्दीमुळे स्वतंत्र खोली मिळेलच याची खात्री नाही. सिझनमधे सहज २००-२५० लोक येथे मुक्कामाला असतात.

खेळीमेळीचे वातावरण, स्वच्छ पांढरे कपडे घातलेल्या बिहारी आचाऱ्यांनी

केलेले महाराष्ट्रीयन पद्धतीचे रुचकर जेवण; त्यांचे ते आग्रहपूर्वक वाढणे. रविवार व सुट्टीचे दिवशी जेवण उशीरा म्हणून सकाळी ९ वा. चहा-नाष्टा. दोन वेळा चहा वा कॉफी. या सगळ्यांसाठी दरडोई ३२ रु. दर आकारला जातो; मग तुम्ही स्पेशल रुममध्ये रहात असा अथवा कॉमन हॉलमध्ये. चार्जेस् तेच. तिच आत्मियतेची वागणूक. जे काय मागाल ते विनातक्रार देण्याचा येथे प्रयत्न केला जातो. हे लोक परतीची अथवा कलकत्त्याहून दार्जिलिंग, जगन्नाथपुरी यासारख्या पुढील प्रवासासाठीची रिझर्वेशन्सही हवी असल्यास करून देतात. बरोबरचे अवजड सामान कलकत्त्यास सोडून पुढे कुठे जायचे असल्यास त्यासाठी निवासात एका क्लोक रूमची सोय असून तित नाममात्र दराने सामान ठेवता येते. ट्रॅम, बस, बाजार, इ. दैनिक गरजेच्या गोष्टी महाराष्ट्र निवासापासून पांच मिनिटांचे अंतरावर आहेत. टॅक्सीज् तर निवासाचे बाहेर कायम उभ्या असतात. दररोज सकाळी कलकत्ता शहरातील प्रेक्षणीय स्थल दर्शनाच्या ट्रिप्सही येथून निघतात. महाराष्ट्रीयनांनी परप्रांतात चालविलेली एवढी मोठी संस्था बघून उर अभिमानाने भरून येतो.

या प्रचंड व्यापाचा डोलारा समर्थपणे चालविण्याचे काम डोळे बंधू व्यवस्थापक या नात्याने गेली अनेक वर्षे मोठ्या कौशल्याने पार पाडत आहेत. श्री. प्रभाकर डोळे ऑफीस संभाळतात, तर श्री. यशवंत डोळे स्वयंपाकघराची देखभाल करतात.

कुठल्याही ठिकाणी थोडा मुक्काम असेल तर केव्हाही कंडक्टेड टूर घेणेच इष्ट. विशेषत: कलकत्त्यासारख्या अवाढव्य शहरात तर स्वतंत्रपणे हिंडायचे म्हणजे अनंत अडथळे येतात. ट्राफीक जाम ही तर तेथिल नित्याचीच बाब.

अनेक ऑफीसेस, बँका, म्युझियम इ. असलेला 'चौरंगी' हा कलकत्त्याचा मुख्य रस्ता. चौरंगी जवळील पार्क स्ट्रीटवर वरीचशी हॉटेल्स आहेत. म्युझियमचे विरूद्ध बाजूस थोडे पुढे मैदान मार्केट हा मोठा बाजार आहे. येथून एस्प्लनेड (Esplande) अगदी जवळ असून तेथिल मोठ्या चौकात सुभाषचंद्र बोस, चित्तरंजन दास, लो. टिळक यांचे पुतळे तसेच शहीद मिनार (या मिनारचे वर परवानगी काढून जाता येते) आहेत. याच चौकाचे भोवताली राजभवन, 'ईडन गार्डन' हे मुख्यत: क्रिकेटचे मैदान, इ. प्रसिद्ध ठिकाणे आहेत. ईडन गार्डन्सवर मुख्य स्टेडियम सोडून अनेक लहान मोठी क्रिकेटची पिचेस आहेत. हॉस्पिटल रोडवर परेड ग्राऊंड असून तेथे मोठाल्या सभा होतात. एकूणच कलकत्ता बकाली असले तरी हिरवळीने भरलेली मोठाली मैदाने तेथे दिसतात. या परेड ग्राऊंडसमोर 'फोर्ट विलियम्स' हा ब्रिटीशांनी बांधलेला अंडरग्राऊंड किल्ला आहे, तो म्हणे फक्त २६ जानेवारीलाच आम जनतेला पहाण्यासाठी खुला असतो.

'डलहौसी स्क्वेअर' येथे नैसर्गिक झऱ्यांतून बाहेर येत असलेल्या पाण्याचे मोठे तळे असून एके काळी रमणीय ठिकाण असलेल्या या तळ्यातील सध्याचे गंदार पाणी बघून तेथे अजिबात उभे रहावत नाही. या डलहौसी स्क्वेअर भोवती

टेलिफोन भवन, जनरल पोस्ट ऑफीस, रिझर्व बँक, सेक्रेटारिएट, विधानभवन, इत्यादींच्या ब्रिटिशकालीन भव्य इमारती आहेत.

काली घाटावरचे 'काली मंदीर' हे भाविकांचे खरे जागृत श्रद्धास्थान. बळी दिलेल्या प्राण्यांचे रक्त, मांस सगळीकडे पडलेले दिसते. या मंदीरात पंडे वगैरेंकडून कशी लुटमार होते याच्या अनेक हकीगती ऐकून तेथे जायला थोडी भीती वाटते. हे देऊळ रात्री उशीरापर्यंत उघडे असते.

'दक्षिणेश्वर टेंपल' मधेही कालीचे मंदीर आहे. हिच ती रामकृष्ण परमहंसांची कालीमाता. तसेच येथे बारा शंकरांची मंदीरेही ( ज्योर्तिलिंगे ) आहेत. या मंदीरांचे पाठीमागे संथपणे वहाणाऱ्या हुगळीवर बांधलेला घाट आहे. ऊन रणरणत असले तरी हुगळीचे पाणी अतिशय प्रसन्न, थंडगार असते. या दक्षिणेश्वर मंदिराचे आवारातील कोपऱ्यामधील एका खोलीत रामकृष्ण परमहंस रहात होते. त्यांच्या काही वस्तू तेथे बघायला मिळतात.

हुगळी नदी शहराचे दोन भाग करते. तिच्या एका तीराला 'कलकत्ता' तर दुसऱ्याला 'हावरा' म्हणतात. याच हावरा भागात प्रसिद्ध 'बेल्लूर मठ' आहे. हिन्दू धर्मगुरु तयार करण्याचे कार्य येथे चालते. शहराच्या गजबजाटापासून दूर अशी ही अत्यंत शांत, शुचिर्भूत जागा. कोणालाही पांच मिनिटे बसून अंतर्मूख होऊन विचार करावासा वाटायला लावणारे हे ठिकाण. हुगळीचे काठावर असलेल्या बेल्लूर मठाचे आवार विस्तिर्ण असून बाजारी देवळांतून कधीही न मिळणारी मन:शांति येथे मिळू शकते. स्वामी विवेकानंदांची समाधी येथेच आहे.

कलकत्याचे आणखी एक नावाजलेले स्थळ म्हणजे 'बोटॅनिकल गार्डन.' याचा आवाका इतका मोठा आहे की चालत बघायचे म्हटले तर एक दिवस लागेल. अनेक सिनेमांतून दिसलेले प्रचंड वडाचे झाड याच ठिकाणी आहे. या झाडाचे मूळ खोड कोणते असावे याचा पत्ताही लागत नाही इतक्या पारंब्या रुजून हा वटवृक्ष फोफावलेला आहे. फांद्या फुटलेली पोफळी; एखादे छोटे मुलही उभे राहू शकेल एवढी मोठी पाने असलेली पाणवनस्पती; या सारखी अनेक प्रकारची झाडे येथे मुद्दाम जोपासलेली आहेत. आंतील रस्तेही स्वच्छ, सुंदर, डांबरी आहेत.

अत्युत्कृष्ट रंगीत कोरीव काम केलेले कलकत्याचे जैन मंदीर नजरेत भरून राहते. या मंदीरात गेली अनेक वर्षे सतत तेवत असलेला एक दिवा (चिमणी) आहे. याला कधीच काजळी धरत नाही म्हणतात. बहुदा साजुक तूप घालत असल्याने असेल.

जवळ जवळ प्रत्येक मोठ्या शहरात असलेले 'म्युझियम' कलकत्यात चौरंगी-वर असून ते खूपच मोठे आहे. तेथील प्राण्यांचे दालन मुलांना विशेष आवडावे.

...५

या म्युझियम पासून जवळ असलेले 'नेहरू सायन्स म्युझियम' हे खास मुलांसाठी बनविलेले म्युझियम मोठ्यांनाही खिळवून ठेवते. मुलं तर बाहेर पडायलाच तयार नसतात. विविध प्रकारच्या देशी-विदेशी बाहुल्या; खेळणी; त्यांतील कांही मुलांना खेळतांखेळतां सायन्स शिकवून जाणारी – दार उघडताच बेल वाजणे, टेलिफोन उचलताच समोरच्या चित्रासंबंधी माहिती ऐकू येणे, इ. एका दालनांत पैसे टाकून चालणारे इंजिन, हलणारे घोडा, हत्ती यासारख्या खेळण्यांवर ठराविक वेळ बसता येते. सर्वात वरच्या मजल्यावरील दालनांत बाहुल्यांच्या रूपाने संपूर्ण रामायण आणि महाभारत उभे केलेले आहे.

'व्हिक्टोरिया मेमोरियल' हे आणखी एक म्युझियमच. जगप्रसिद्ध 'ताजमहाल' सारखे आपलेही चिरंतन स्मारक रहावे म्हणून व्हिक्टोरिया राणीने हा अतिभव्य संगमरवरी महाल बनविला. याचे आवार अतिप्रचंड असून सुरुवातीलाच व्हिक्टोरिया राणीचा पुतळा आहे. प्रत्यक्ष इमारतीत पोर्ट्रेटम्, राणी लहानपणी वापरत असलेला रोझवुडचा पिॲनो, यासारख्या अनेक वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. येथील बाहेरील विस्तिर्ण हिरवळीवर आरामात बसायला फार मजा येते.

'झू' ची भेट ही म्युझियम सारखीच बऱ्याच साईट सिईंग टुरमधे असली तरी प्रत्येक प्राणीसंग्रहालयाचे स्वतःचे असे काहीतरी वेगळेपण असतेच. कलकत्याच्या 'अलीपूर झू'चे खास आकर्षण म्हणजे 'पांढरे वाघ' या व्याघ्रराजांना बघण्यासाठी थोडी वेगळी प्रवेश फी आहे. हे झू इतके मोठे आहे की कुठून कोठे जावे हे नवख्याला एकदम उमगत नाही. येथे काही प्राण्यांना मुक्त संचार करायला सोडलेले आहे; ते सगळीकडे आरामात फिरताना आढळतात. एका प्रचंड मोठ्या हौदात अनेक प्रकारचे लहान मोठे सापही ठेवलेले आहेत.

अलीपूर झू शेजारीच कलकत्त्याची प्रसिद्ध 'नॅशनल लायब्ररी' आहे. भारतांत प्रसिद्ध होणारे प्रत्येक पुस्तक येथे पाठवावेच लागते. सर्व भाषांतील ग्रंथपाल त्यामुळे येथे आहेत. मुलांच्या पुस्तकांचा येथे खास वेगळा विभाग आहे. नॅशनल लायब्ररीचे मागिल बाजूस स्थानिक तुरुंग आहे.


कलकत्याचे आणखी एक आकर्षण म्हणजे 'रविंद्र सरोवर.' रविंद्र सरोवर म्हटलं की लगेच आपल्याला तेथे स्त्रियांवर झालेला अत्याचार आठवतो. लांबच्या ठिकाणी तर याच्या तिखट-मीठ लावलेल्या अतिरंजित बातम्या बरेच दिवस येत होत्या. या सरोवराचे क्षेत्रफळ, भोवतालची बाग इतकी मोठी आहे की त्या स्त्रियांना पळून जायला जागा कशी सापडली नसेल याचं कोडं पडावं. या शांत सरोवराचं पाणी मात्र स्वच्छ वाटत नाही. सरोवरात अनेकजण बोटींगचा सराव करताना दिसतात. संध्याकाळचे चार क्षण निवांत बसून काढायला आदर्श ठिकाण.


नेताजी सुभाषचंद्र बोसांचे घर महाराष्ट्र निवासचे पाठीमागे असलेल्या एल्गिन रोडवर असून तेथे त्यांच्या विषयीचे एक छोटे म्युझियमही केलेले आहे; जे दुपारी १॥ वाजता उघडते.

कलकत्याहून शांतिनिकेतन १०० कि. मी. दूर असून तेथे जायचे असल्यास कमीत कमी दोन दिवस तरी हवेत. पश्चिम बंगालमधील प्रेक्षणीय स्थळांच्या माहितीसाठी पुढील पत्यावर संपर्क साधावा :

Tourist Bureau
3/2, B. B. D. Bag East,
Calcutta – 700 001.
Phone : 238271, Gram : TRAVELTIPS.

• •


कलकत्ता
मुवई
मद्रास
अंदमान आयलंडस्
निकोबार आयलंडस्


नॉर्थ अंदमान
मिडल् अंदमान
साऊथ अदमान
पोर्ट ब्लेअर
लिटल् अदमान
कार निकोबार
लिटल् निकोबार
ग्रेट निकोबार

# अंदमान-निकोबार विषयी थोडे काही

अंदमान-निकोबार हा ३२१ लहान-मोठ्या बेटांचा समुह बंगालचे उपसागरात दक्षिणोत्तर असा ७०० कि. मी. लांबीत पसरला असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ८२९३ चौ. कि. मी. आहे. पोर्ट ब्लेअर ही या द्वीपसमुहाची राजधानी. कलकत्ता ते पोर्ट ब्लेअर अंतर १२५५ कि. मी. तर मद्रासपासूनचे अंतर ११९० कि. मी. आहे. या दोन्ही ठिकाणांहून विमानाने अगर बोटीने तेथे जाता येते. याशिवाय विशाखापट्टनम् येथूनही कांही बोटी सुटतात. विमान प्रवास दोन तासांचा तर बोटीने ७२ ते ८० तास लागतात.

आठवड्यातून दोन वेळा कलकत्ता ( मंगळवार, शुक्रवार ) आणि मद्रास (रविवार, बुधवार) येथून ७३७ बोईंग विमान सेवा उपलब्ध असून ही विमाने सकाळी ६ वा. सुटतात. वरील उल्लेखलेल्या वारीच पोर्टब्लेअरहून कलकत्ता अथवा मद्रास येथे परतण्यासाठी सकाळी ८.४० ला विमान सुटते. विमानप्रवासाचे एकेरी भाडे प्रौढास सुमारे १००० रुपये आहे. इंडियन एअर लाईन्सचे विमानासंबंधीचे वेळापत्रकांत दर एप्रिल आणि नोव्हेंबर मधे फेरफार होत असतात.

अंदमानला जाण्यासाठी M. V. अंदमान, T. S. नानकौरी, M. V. हर्षवर्धन आणि M. V. अकबर या चार प्रवासी बोटी उपलब्ध असून त्या पोर्ट ब्लेअर आणि कलकत्ता-मद्रास-विशाखापट्टनम्चे दरम्यान सतत फिरत असतात. हा प्रवास सुमारे तीन दिवसांचा असून त्या बहुदा पोर्ट ब्लेअर बंदरात तीन दिवस मुक्काम करतात. या बोटी वर्षातून सुमारे ३६ राऊंड ट्रिप्स मुख्य भूमीकडे करतात. म्हणजे दहा दिवसांतून एकदा प्रवाशांसाठी बोटींची सेवा उपलब्ध आहे. बोटींचे वेळापत्रक निश्चित नसून त्या संबंधीची माहिती खालील पत्त्यावर मिळू शकते.

(1) The Manager, The Shipping Corporation of India Ltd., Nihat House, No. B Strand Road, Calcutta–1 (2) M/s. KPV Shaik Mohammed Rowther & Co., No 41, Lingi Chetty Street, Madras – 1 ( Agent of the Shipping Corpn. of India Ltd. )

(3) The Manager, Shipping Corporation of India Ltd., Aberdeen Bazar, Port Blair - 744101, Andamans (4) M/s. A. V. Bhanojiraw & Guruda Pattabiramayya & Co., Post Box No. 17, Visakhapatnam (Agent of the Shipping Corporation of India Ltd ) बोटींची भाडी प्रवासी वर्गाप्रमाणे प्रत्येकी ६९ रु. (ऑर्डीनरी बंक) ते ५५८ रु. (डिलक्स केबिन विथ् अॅटॅचड् टॉयलेट) असून या दरांत बोटीप्रमाणे थोडाफार फरक पडतो. विद्यार्थ्यांना बोटीचे भाड्यांत ५०% सुट मिळते. बोटीचे प्रवासांत स्वत:चे खिशाला परवडेल असे तिकीट प्रवासी काढू शकत असला तरी या भाडेखर्चाशिवाय केबिन आणि बंक क्लासचे प्रवाशास दररोज दरडोई अनुक्रमे ३२ आणि ९ रु. जेवणासाठी खर्च करावा लागतो. बोटीने प्रवास करू इच्छिणाऱ्यांनी केबिनसाठी Assistant Secretary (Public), A & N Administration, Chief Commissioners' Secretariate, Port Blair यांचेकडे तर बंक क्लाससाठी The Manager, Shipping Corporation of India Ltd., Port Blair यांचेकडे अर्ज करावेत. बंक क्लाससाठी अर्ज करताना स्वत:चे नांव, वडिलांचे नांव, संपूर्ण पत्ता, नागरिकत्व, प्रवासाचा उद्देश, प्रवासाची संभाव्य तारीख आणि कलकत्ता, मद्रास आणि विशाखापट्टनम् यापैकी कुठल्या बोटीवर / बंदरावर चढणार यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

अंदमानला जाण्यासाठीचा सर्वांत चांगला सिझन म्हणजे नोव्हेंबर ते फेब्रुवारी. या काळांत हवामान तापदायक नसते; तसेच समुद्रही शांत असतो. भारतीय नागरिकांस अंदमान द्वीपसमुहावर प्रवासी म्हणून जाण्यास कोणतीही आडकाठी नाही, परंतु लिटील् अंदमान बेटांचा कांही भाग आणि निकोबार बेटांवर बऱ्याच ठिकाणी आदिवासींची वस्ती असल्याने हा टापू संरक्षित म्हणून जाहिर करण्यात आला आहे. या ठिकाणी जायचे असल्यास अंदमान द्वीपसमुहातील संरक्षित भागासाठी Deputy Commissioner, Andamanas District तर निकोबार द्वीपसमुहातील संरक्षित भागांसाठी Deputy Commissioner, Nicobar District यांचेकडे अर्ज करावा लागतो.

सर्व परदेशीय नागरिकांना पोर्ट ब्लेअर शहर सोडून दुसऱ्या कुठल्याही ठिकाणी जायचे असल्यास त्यांना गृह मंत्रालयाकडून (Ministry of Home Affairs, Govt. of India) खास परवानगी घ्यावी लागते. या परदेशिय नागरिकांना आदिवासी लोक रहात असलेल्या भागांत जायला मात्र संपूर्ण मनाई आहे.

अंदमान-निकोबार ही बेटे सपाटच असून टेकड्या तशा अभावानेच आढळतात. येथील सर्वात ऊंच शिखर ७३२ मीटर्स ऊंच आहे. १९८१ चे शिरगणतीप्रमाणे या बेटांची लोकसंख्या १,८८,२५४ होती. या बेटांवरील मूळच्या आदिवासी जमाती सोडल्या तर बाकीच्या मध्याचे बहुसंख्य स्थानिक लोकांचे पूर्वज ब्रिटिशांनी कैदी

म्हणून येथे आणलेले होते. त्यांना शेतीसाठी जमिन; उद्योगधंद्यांसाठी कर्जे वगैरे मिळाल्याने ते येथेच स्थायिक झाले. किंबहुना त्यांनी मुख्य भूमिवर परत जाता कामा नये ही त्यांच्या शिक्षेची प्रमुख अट असायची. शिक्षा संपल्यावरही चांगले स्थिरस्थावर झाल्यामुळे अनेकांनी मुख्य भूमिस परत न जाता त्यांच्या कुटुंबियांसच इकडे बोलावून घेतले. मुख्य भूमीवरून विविध जाती–जमातींचे लोक येथे आले असल्याने सर्वधर्म समभाव चांगला रुजलेला आढळतो. जातीभेद जवळ जवळ नाहीच. बहुतेक सर्व व्यवहार हिंदीतून चालतात. इंग्रजीही बऱ्याच जणांना समजते. स्वातंत्र्यानंतर कामधंद्याचे निमित्ताने गेलेला बहुसंख्य कामगार वर्ग हा बंगाली आणि मद्रासी. केरळीयन लोकंही बरेच दिसतात.

येथील हवामान उष्णच. तपमान २३° ते ३१° सेंटिग्रेड. हवेतील आर्द्रता ७६% पर्यंतही वाढते. पाऊस वर्षाला १२५ इंच; तोही बारा महिन्यांतील नऊ महिने. मात्र हा पाऊस धो-धो पडून गेल्याने तापदायक वाटत नाही. सगळीकडे गर्द झाडी. ९०% प्रदेश संरक्षित जंगल म्हणून राखून ठेवण्यात आला आहे. यापैकी ३६% संरक्षित जंगले आदिवासींचा मूळचा वंश जपला जावा म्हणून खास संरक्षित टापू म्हणून राखून ठेवलेली आहेत.

पोर्ट ब्लेअरमधे रहाण्यासाठी सर्वसामान्य मध्यमवर्गीय पर्यटकांच्या खिशाला परवडतील अशा दरांत सुखसुविधांनी युक्त अशी सरकारी टुरिस्ट होम्स, गेस्ट हाऊसेस मिळू शकतात. समुद्राचे काठी, बंदराचे पार्श्वभूमीवरील एका छोटया टेकडीवर दोन टुरिस्ट होम्स आहेत; तर शहरापासून ५ किलोमिटरवर असलेल्या 'कार्बिन्स कोव्ह' या निसर्गरम्य बीचवरही एक गेस्ट हाऊस आहे. या टुरिस्ट होममधे असलेल्या इन्फर्मेशन सेंटरमधे प्रवाशांना सर्व प्रकारची माहिती मिळावी म्हणून सोय करण्यात आली आहे. तसेच त्यांच्यातर्फे प्रेक्षणीय स्थलदर्शनासाठीच्या ट्रिप्सचे आयोजनही करण्यात येते. पोर्ट ब्लेअर येथील सरकारी गेस्ट हाऊसेस् आणि टुरिस्ट होम्सचे रिझर्वेशन्ससाठी The Asst. Secretary (Public), A & N Administration, Chief Commissioner's Secretariate, Port Blair अथवा The Executive Engineer, Port Blair, North Division, APWD, Port Blair 744101 यांचेकडे अर्ज करावेत. या रुम रिझर्वेशन्स संबंधीची माहिती Tourist Information Centre, Tourist Home, Port Blair 744102 यांचेकडेही मिळू शकते.

या सरकारी टुरिस्ट होम्समधे जागा मिळणे मात्र फारच दुरापास्त. जागा नसल्याचे नकारात्मक पत्र आले तरी तुम्ही फारच भाग्यवान. या जागांसाठीचे जेवणा-खाण्या व्यतिरिक्त दर पुढील प्रमाणे आहेत.

(१) निकोबारी कॉटेज (२ कॉटेजेस्) : १६० रु./ कॉटेज ( a/c ).

(२) मेगॅपॉड नेस्ट (२० बेडस्) : ५५ रु. / बेड (a/c); ४० रु. / बेड (non a/c).

(३) टुरिस्ट होम (३६ बेडस्) : १० रु. / बेड; भारतीय नागरीकांसाठी २५ रु./ बेड; परदेशिय नागरीकांसाठी ५·५० रु. फक्त ड्युटीवरील सरकारी नोकरांसाठी.

(४) गेस्ट हाऊस नं. १ (८ बेडस्) : १० रु. / बेड; ५·५० रु. ड्युटी-वरील सरकारी नोकरांसाठी.

(५) गेस्ट हाऊस नं. २ (६ बेडस्) १० रु. / बेड; ३·५० रु. ड्युटी-वरील सरकारी नोकरांसाठी.

याशिवाय ट्रॅव्हल कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने ( टी. सी. आय्.) चालविलेले कार्बिनस् कोव्ह बीचवरील ' अंदमान बीच रिसॉर्ट ' आणि इंडियन टुरिस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे चालविले जाणारे ' वेलकम ग्रुप बेआयलंड हॉटेल ' ही आलीशान तारांकीत हॉटेल्सही पोर्ट ब्लेअरमधे उपलब्ध असून त्यांचे दर डबल रुमला रोजी सुमारे ३५० रु. चे आसपास आहेत. गोव्यासारखे अंदमान अजून परदेशीयांच्या लोंढयाने भरले नसल्याने की काय पण ही तारांकीत हॉटेल्स तशी रिकामीच असावीत कारण ऐअरपोर्टरवरही या हॉटेल्सचे एजन्टस् त्यांचे हॉटेलमधे चलण्या-विषयी प्रवाशांना विनवण्या करताना दिसतात.

पोर्ट ब्लेअर येथे ' युथ हॉस्टेल 'ची ब्रँचही आहे; पण तेथे स्वतंत्र खोल्या नसून मोठे हॉल्स आहेत. त्यांत ५२ लोकांची सोय होऊ शकते. यासाठी Warden, Youth Hostel, Aberdeen Bazar, Port Blair यांचेशी पत्रव्यवहार करावा.

थोडयांच दिवसात येथील स्थानिक महाराष्ट्र मंडळाच्या ' सावरकर स्मृति ' या वास्तूमधील डॉर्मेटरी टाईप हॉलमधे रहाण्याची सोय होईल. यासाठी अध्यक्ष, महाराष्ट्र मन्डळ, पोर्ट ब्लेअर यांच्याशी संपर्क साधावा.

सामान्य प्रवाशाने पोर्ट ब्लेअरमधे रहाण्यासाठी जागा मिळण्याची खात्री असल्याशिवाय अन्दमानला जाऊ नये.

अंदमान-निकोबार द्वीपसमुहातील इतरही छोटया-मोठया बेटांवर रेस्ट हाऊसेस असून ती फॉरेस्ट आणि ए. पी. डब्ल्यु. डी. खात्यातर्फे चालविली जातात. यापैकी काहींची माहिती मुद्दाम पुढे दिलेली आहे.

| Sr. No. | Name of the Inspection House | Localities | Class | Designation of officer to whom applications should be made |
|---|---|---|---|---|
| 1 | Inspection House | Haddo | I | Executive Engineer, Maintainance Division, Port Blair. |
| 2 | – do – | – do – | II | – do – |
| 3 | – do – | South Point | II | – do – |
| 4 | – do – | Hovelock | III | E. E., Development Division, Port Blair. |
| 5 | – do – | Mahmarghat | III | E. E., Construction Divn. No. II, Port Blair. |
| 6 | – do – | Hamphregunj | III | – do – |
| 7 | – do – | Foragunj | III | – do – |
| 8 | – do – | Rangat | II | E. E., Construction Divn. I, Rangat. |
| 9 | – do – | Betapur | III | – do – |
| 10 | – do – | Kadamtala | III | – do – |
| 11 | – do – | Mayabunder | III | E. E., North Andamanas Constns. Divn., Mayabunder. |
| 12 | – do – | Tugapur | III | – do – |
| 13 | – do – | Diglipur | III | – do – |
| 14 | – do – | Car Nicobar | II | E. E., Constn. Divn., ( Marine Works ), Car Nicobar. |
| 15 | – do – | Nancowry | III | – do – |
| 16 | – do – | Neil Island | II | A. P. W. D. Guest House, Neil Island. |

पोर्ट ब्लेअर येथील डिपार्टमेंट ऑफ इन्फर्मेशन, पब्लिसिटी अँड टुरिझम यांचेतर्फे शहर आणि आसमंतातील प्रेक्षणीय स्थलदर्शनांच्या सहलींचे नियमितपणे आयोजन केले जाते. हे डिपार्टमेंट जर कमीत कमी दहा इच्छुक असतील तर पोर्ट ब्लेअरच्या सगळ्या जेट्टींवरून फिरवून आणणारी Harbour Cruise ही अडीच तासांची सहल प्रत्येकी फक्त ५ रु. दरात आयोजित करत असल्याचा उल्लेख त्यांच्या प्रसिद्धी पत्रकांत सापडतो.

बोट हेच या बेटाबेटांमधील वाहतुकीचे एकमेव साधन. पोर्ट ब्लेअरपासून खाली दक्षिणेकडे निकोबार बेटे इतक्या दूरवर पसरलेली आहेत की ग्रेट निकोबार या शेवटच्या बेटापर्यंत बोटीने जायला सुमारे चार दिवस लागतात. 'नानकौरी' हे दक्षिणेकडील महत्त्वाचे बंदर. सेवानिवृत्त लष्करी सैनिकांची या भागांत वसाहत करण्यात आली आहे. निकोबार बेटे पर्यटकांनी विशेष न हाताळल्यामुळे तेथे निसर्ग अजूनही त्याच्या जास्त नैसर्गिक अवस्थेत बघायला मिळतो परंतु बोटी सुटायच्या वेळा लहरी निसर्गावरच अवलंबून असल्यामुळे कोणताही प्रोग्रॅम अगोदर पक्का करता येत नाही. यासाठी निकोबार द्वीपसमुहाचा दौरा करू इच्छिणाऱ्या प्रवाशांनी भरपूर वेळ काढूनच जायला हवे. शिवाय अनेक बेटांजवळ उथळ पाण्यामुळे मोठाल्या बोटी जाऊ शकत नसल्याने दोरीच्या शिडीवरून लहान बोटींत उतरून जाण्याची कसरत करावी लागते.

अंदमान-निकोबार द्वीपसमुहांवरील आदिवासी हा या बेटांविषयीच्या कुतुहलाचा आणखी एक भाग. या आदिवासींनी केलेल्या खऱ्या-खोट्या अत्याचाराच्या हकिगती येथील अनेकजण मोठ्या भीतीयुक्त रंजकतेने सांगत असतात. त्यामुळे लहान मुलांना गोष्टीतील राक्षस, चेटकीण, इ. ची जशी भीती वाटते तसेच सामान्य प्रवाशांना या आदिवासी लोकांबद्दल वाटू लागते.

या बेटांवर बाहेरील लोकांचा संपर्क जसजसा वाढू लागला तसतसे हे मूळचे आदिवासी जास्त जास्त जंगलांच्या अंतर्भागांत जाऊन वास्तव्य करू लागले. यापैकी बरेचसे आदिवासी अजूनही अश्मयुगात वावरत असल्यासारखे आयुष्य जगतात. वंशपरत्वे या आदिवासींचे सहा गट पाडलेले आहेत. (१) अंदमानी (२) जारवा (३) ओंगी (४) सेंण्टीनेलीज् (५) निकोबारी (६) शॉम्पेन. यापैकी पहिल्या चार जमातीत अंदमान ग्रुपमधील बेटांवर तर शेवटच्या दोन निकोबार ग्रुपमधील बेटांवर रहातात.

अंदमान बेटांवरील जमाती नेग्रिटो वंशिय आहेत. 'अंदमानीं'ची लोकसंख्या सध्या केवळ २८ असून ते 'स्ट्रेट आयलंड' या बेटावर स्थायिक झाले आहेत. 'ओंगी' हे संख्येने १०० चे आसपास असून ते लिटिल् अंदमान बेटांवर आढळतात. 'जारवा' ही सुधारलेल्या माणसाला अजूनही वैरी म्हणून समजणारी आणि असा माणूस दिसला की शत्रू म्हणून त्याच्यावर हल्ला चढविणारी जमात. हे जारवा

सुमारे २५० असून त्यांच्यातील एक ग्रुप नुकताच मित्रत्वाने वागू लागला आहे. सेंण्टीनेलीज्ची संख्या १०० असल्याचा अंदाज वर्तवला जातो. हे लोक नॉर्थ सेण्टीनल या दूरच्या बेटांवर वास्तव्य करून असून आजही अगदी प्राचीन युगातील जीवनक्रम व्यतित करतात. हेही लोक सुधारलेल्या माणसाला शत्रूपक्ष समजत असले तरी मैत्रिच्या कांही खाणाखुणा यांच्यात दिसू लागल्या आहेत.

'निकोबारीं'ची वस्ती सुमारे २२,००० असून ही तशी खूपच सुधारलेली जमात म्हणून ओळखली जाते. यांच्यात शिक्षणाचे प्रमाणही बरेच आहे. शॉम्पेन ही जमात ग्रेट निकोबार बेटांचे घनदाट अरण्यात आढळते. हे बुजरे लोक अजूनही भटकंतीचे आयुष्य काढत आहेत. निकोबार बेटांवरील या दोन्ही जमाती मंगोलीयन वंशाच्या आहेत.

हे झालं अंदमानचं भौगोलीक आणि प्राकृतिक वर्णन. परंतु तेथील स्फटिकासारखे स्वच्छ, सुंदर, नितळ, निळे पाणी; गर्द हिरव्यागार झाडीने भरलेली धरती; आणि तेथे राहणारी ती निर्मळ मनाची माणसं बघून अंदमानशी माझी नाना भावनिक नाती जडली. हे ॠणानुबंध आधिक घट्ट करण्यासाठी आता मला निकोबारलाही भेट द्यायलाच हवी.

● ●

[illegible library stamp]

# – आ वा ह न –

अंदमान–निकोबार द्वीपसमुहाच्या पोर्ट ब्लेअर या राजधानीच्या ठिकाणी अनेक प्रांतांतिल लोक नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झाले असले तरी त्यांत फारच मोजके मराठी आहेत. बंगाल, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ, वगैरे प्रादेशिक मंडळींनी आपापल्या लोकांच्या सोईसाठी स्वतःच्या वास्तू उभ्या केलेल्या आहेत. महाराष्ट्र मंडळानेही आपल्या मायबोली मराठी संस्कृतिची जोपासना करण्यासाठी एका वास्तू निर्मितीचा संकल्प सोडला आहे.

स्वा. सावरकर आदी क्रांतिवीरांचे स्मारक अंदमानात होणे औचित्याचे म्हणून महाराष्ट्र मंडळाच्या वास्तूला 'सावरकर स्मृति–सदन' असे नांव दिले आहे.

या वास्तूमुळे सध्या कुणाच्या तरी खाजगी निवासस्थानी पार पाडावे लागणारे सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक कार्यक्रम मंडळाच्या जागेत करता येतील; मंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या जिजामाता वाचनालयासाठी स्वतःची जागा उपलब्ध होऊ शकेल, सेल्यूलर जेल राष्ट्रीय स्मारक व बेटे पहावयास येणाऱ्या विशेषतः महाराष्ट्रीयन पर्यटकांची निवासादींची अल्प खर्चात व्यवस्था करता येऊ शकेल; खाजगी कामासाठी आलेल्यांना व मराठी सैनिकांना मूख्य भूमीस जाण्यासाठी जहाजाची दहा-दहा दिवस प्रतीक्षा करावी लागते त्यांची सोय होऊ शकेल.

महाराष्ट्र मंडळाच्या या वास्तूसाठी अंदमान प्रशासनाने शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी ४०० चौ. मि. क्षेत्रफळाचा भू-खंड अल्प किंमतीत दिला आहे. यावर ही नियोजित वास्तू उभी करण्यास सुमारे आठ लक्ष रुपये लागतील असा प्राथमिक अंदाज आहे. वास्तूस लागणारे बरेचसे बांधकाम साहित्य मूख्यभूमीवरूनच आणावे लागते. वस्तूंच्या किंमती दिवसेंदिवस वाढतच आहेत. त्यामुळे या प्रकल्पाचाही खर्च वाढणे अपरिहार्य आहे. म्हणून आपणास नम्र विनंती की या सत्कार्यास आपण यथाशक्ति, सढळ हाताने मदत खालील पत्त्यावर पाठवावी. आपणाकडून भरघोस प्रतिसाद मिळेल अशी खात्री आहे.

अध्यक्ष,
महाराष्ट्र मंडळ
पोर्ट ब्लेअर, अंदमान.

पुण्यातील संपर्क –

**वासंती घैसास**
६४/२०, 'सुमन' कर्वे रोड,
एरंडवणे, पुणे ४.
फोन नं. ५४६३१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५३
दा. क्र. २७३३३

REFBK 0024333

REFBK-0024333